मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# महासागर

**मुंबई कार्यालय**
बोरा बजार स्ट्रीट, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.
फोन : ०२२ ३१८५ ०७३५

**पालघर कार्यालय**
२०८/बी, लोकमान्य बिल्डींग, तालुका पंचायत समिती कार्यालयासमोर, पालघर, ४०१४०४ मो. ९८९२९६८७२५

**नाशिक कार्यालय**
'आनंदी', कोतवाल पार्क, टिळकवाडी, वेद मंदिरासमोर, धामणकर कॉर्नर, नाशिक ४२२००२. मो. ९८९०१०९९७८

**वितरण**
मो. नं. ८४२४९३६४३६

मुंबई | RNI No.: MAHAMAR/2016/79101 | मंगळवार, २४ जून २०२५ | वर्ष: १० | अंक: ५५ | पाने-८ | किंमत रू. २ + वितरण खर्च रू. १ एकूण रू.३

## पुणे स्टेशनच्या नामांतराचा वाद पेटणार

**पुणे , दि. २३ प्रतिनिधी**

भाजप खासदार मेधा कुलकर्णी यांनी केलेल्या पुणे स्टेशनच्या नामांतरणाच्या मागणीनंतर आता वाद पेटण्याची शक्यता आहे. पुणे स्टेशनला श्रीमंत थोरले बाजीराव पेशवे यांचे नाव द्यावे असी मागणी मेधा कुलकर्णी यांनी केली. त्यांच्या या मागणीला संभाजी ब्रिगेडने विरोध केला असून पुणे स्टेशनला क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिराव फुले यांचे नाव द्यावे अशी मागणी त्यांनी केली. पुणे शहराला ऐतिहासिक वारसा लाभलेला आहे.त्यामुळे रेल्वे स्टेशनला श्रीमंत थोरले बाजीराव यांचे नाव देण्याची मागणी भाजपच्या खासदार मेधा कुलकर्णी यांनी केली. त्यावरुन आता वेगवेगळया मागण्या समोर येत असल्याचं चित्र आहे. पुणे रेल्वे स्थानकाला थोरले बाजीराव पेशवे यांचे नाव देऊ नये असं म्हणत रिपब्लिकन खरात गटाने मेधा कुलकर्णींच्या मागणीला विरोध केला. पुणे रेल्वे स्थानकाला क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिराव फुले यांचेच नाव द्यावे अशी मागणी सचिन खरात यांनी केली.

**अग्राग्रलेख**

## खरीखरी

## वारी, वारीच आणि वारी

अबू असीम आझमी समाजवादी पार्टीचे हमखास निवडून येणारे आमदार आहेत. त्यांनी काल जे विधान केलेले आहे. ते महाराष्ट्राच्या यच्चयावत अस्मितेला दुखावणारे आहे. ते म्हणाले की, वारीमुळे रस्त्यावर वाहतूक कोंडी होते. ट्रॅफिक जाम होत असतो. मग मुसलमानांच्या दहा मिनिटांच्या नमाजासाठी शासन परवानगी का देत नाही. मात्र वारीसाठी परवानगी कशी काय, असा त्यांचा प्रश्न आहे. आझमी साहेब आपण महाराष्ट्राचा इतिहास वाचलेला नसावा किंवा त्याचा तुम्हाला अजिबात अभ्यास नसावा. या महाराष्ट्रात जी विधानसभा आहे. त्या विधानसभेचे तुम्ही सदस्य आहात. त्या महाराष्ट्राच्या इतिहासात वारी ही काय चीज आहे. हे जरा अनुभव घेऊन समजून घ्या. त्यासोबतच असेही अत्यंत नम्रपणे नमूद करावेसे वाटते, 'ज्ञानदेवे रचिला पाया, तुका झालासे कळस' या संत वचनाप्रमाणे पंढरीच्या विठ्ठला प्रति आपला भक्तिभाव प्रकट करण्यासाठी शेकडो वर्षांपासून हजारो, लाखोंच्या वर वारकरी आपले सर्व पाश तोडून वारीत रममाण होत असतात. या वारीचे वैशिष्ट्य म्हणजे यात जात-पात, पंथ नाही. कोणताही धर्म नाही. अखिल महाराष्ट्राच्या भक्तीभावाची ही उज्ज्वल निशाणी आहे. या वारीच्या भक्ती यात्रेमध्ये मुस्लिम कीर्तनकार आणि मुस्लिम महिलाही सामील होतात. वारीमध्ये चालताना पूर्णतः शिस्तीचे पालन होते. ही वारी तुमच्या डोळ्यात कशी काय खुपते आहे. हे आम्हाला कळतच नाही. सर्व वारकरी अत्यंत भक्तीभावाने दर्शनाची आशा घेऊन विठ्ठलाच्या चरणी पंढरपुरात येत असतात. केवळ महाराष्ट्रच नाही, तर कर्नाटक पासून वारकरी येतात. परदेशातून ही वारी पाहण्यासाठी अनेक परदेशी पर्यटक वारकरी बनून येत असतात. कारण हा वैष्णवांचा मेळा महाराष्ट्राच्या अस्मितेचा प्रश्न आहे. या सर्व निघणाऱ्या वाऱ्या भिन्नभिन्न ठिकाणाहून निघतात. पंढरपुराच्या वाळवंटी सर्व वारकऱ्यांचे मनोमिलन होते. आमदार आझमी यांना वारीचा अर्थ समजला असता. तर त्यांनी असे विधान केलेच नसते. आजच्या घडीला केवळ महाराष्ट्रातच नाही. तर संपूर्ण देशात भक्तीभावाचा, भक्तिरसाचा असा काही अपूर्व सोहळा साजरा होतोय. त्यामुळे संपूर्ण महाराष्ट्र भक्तीरसात न्हाहून निघत असतो. राहिला प्रश्न तो आझमी साहेब म्हणतात, त्याप्रमाणे नमाजाचा. तर मुस्लिम समाजासाठी मशिदींची व्यवस्था आहे. एखाद्या ठिकाणी पोलिसांनी आवरले असेल. तर पोलिसांना सहकार्य करणे. हे आपले कर्तव्य समजले पाहिजे. ती शिस्त वारकरी पाळतात. ते कधीही सरकारी सूचनेचे आणि आदेशाचा अनादर करीत नाहीत. वारी म्हणजे विठुरायाच्या भक्तीसाठी चालणारा जनसागर असतो. या वारीचा महिमा मराठीतील सर्वच सच्च्या संतांनी मुक्तकंठाने गौरविलेला आहे. वारीवर आक्षेप घेत असताना आझमी यांनी नको त्या वादाचे तोंड उघडलेले आहे. आता जी क्रूर शब्दांची उधळण अबू आझमी याने केलेली आहे. ती पाहता आमच्या वारकऱ्यांना तर अधिक उत्साहाचे भरते येईल. हे वारकरी १००% निरुपद्रवी असतात. मानसिक, शारीरिक किंवा बौद्धिक रीतीनेही वारकरी कधीही बेशिस्त वर्तन करीत नाहीत. आमदार आझमी यांनी एकदा दीड-दोन दिवसांकरिता का होईना. या वारीचा आणि वारकऱ्यांचा अनुभव घ्यावा. ही पांडुरंगाची वारी त्यांच्या मनातील संभ्रम घालवून देईल. यात कोणाच्याही मनात कोणतीच कोणती शंका नाही. अबू असीम आझमी यांनी वारी आणि पांडुरंगाची वारी आणि खरीखरी वारीच करावी. म्हणजे एकदा तरी वारी करावी. तीच आमची मनीषा आहे.

nagpurpost@gmail.com
Mob.No.9922970023


# साहित्यिक एकवटले

## हिंदी सक्तीविरोधात शासनाचा पुरस्कार परत करणार

**मुंबई, दि. २३ (गजानन तुपे)**

**राज्यातील नव्या शैक्षणिक धोरणात पहिलीपासूनच्या वर्गातील मुलांना तिसरी भाषा शिकणे बंधनकारक केले आहे. त्यातच हिंदी भाषेशिवाय जर एखाद्याला अन्य भाषा शिकायची असेल तर २० विद्यार्थ्यांनी तशी मागणी करणे गरजेचे आहे अशी अट शासनाने घातली आहे. त्यातूनच अप्रत्यक्षपणे पहिलीपासून मुलांना हिंदी सक्तीने शिकावी लागणार आहे. राज्य शासनाने घेतलेल्या या भूमिकेचा सर्वच मराठी भाषा प्रेमींकडून विरोध होत आहे. मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी यावर आक्रमक भूमिका घेतली आहे. आता मराठी साहित्यिकांनीही त्या विरोधात एल्गार पुकारल्याचे दिसून येत आहे.**

हिंदी सक्तीच्या मुद्द्यावरून लेखक, कवी हेमंत दिवटे यांनी महाराष्ट्र शासनाने दिलेला पुरस्कार परत करणार असल्याची घोषणा त्यांच्या सोशल मीडियावर केली आहे. हिंदी भाषेला तिसरी भाषा म्हणून लादण्याच्या निर्णयाचा निषेध म्हणून मला पॅरानोया ह्या कवितासंग्रहासाठी मिळालेला महाराष्ट्र शासनाचा पुरस्कार रकमेसकट परत करीत आहे. सरकारने निर्णय मागे घेतला तरच मी माझा निर्णय मागे घेईन असं त्यांनी जाहीर केले आहे. दिवटे यांच्या भूमिकेचे अनेकांनी कौतुक केले आहे. राज्य सरकारकडून हिंदी सक्ती केल्याने पालकांमध्येही नाराजी पसरली आहे.



तर शासनाच्या पहिली पासून हिंदी भाषा तिसरी भाषा म्हणून अनिवार्य करण्याला विरोध आहे. सरकारने २० विद्यार्थी जमले तर पर्याय देऊन शब्दछळ केला. हिंदी भाषा शिकण्याला नाही तर मुलं थोडी मोठी झाली की ५ वी नंतर हिंदी शिकवा. आमचा विरोध प्राथमिक शिक्षणात समावेशाला आहे. सरसकट हिंदी भाषेला नाही. कोवळ्या वयात मुलांना मराठी लिपी, व्याकरण याचा अदमास यायला पुरेसा वेळ मिळावा. मातृभाषेचा पाया घट्ट व्हावा यासाठी प्रयत्न होणे आवश्यक आहे त्याच वेळी इंग्रजी आणि त्यावर हिंदी अशा भाषांचे ओझे का द्यायचे? मराठी आणि हिंदी लिपी (देवनागरी) सारखी असली तरी व्याकरण चिन्हे व काही उच्चार वेगळे आहेत. एक भाषा शिकताना दुसऱ्या भाषेतील फरक मुलाना गोंधळात पाडू शकेल. इयत्ता म्हणायची की कक्षा? शिक्षा म्हणजे दंड की शिक्षण? विमान की हवाई जहाज. ससा की खरगोश. धनुष्य की धनुष. असे असंख्य गोंधळ लहान वयात निर्माण होण्याऐवजी एका भाषेची सवय होऊ द्या मग नवी भाषा आत्मसात लवकर होईल. उगाच या धोरणाला विरोध म्हणजे हिंदीला विरोध असा बालिश तर्क काढून याला राजकीय स्वरूप देऊ नका. हा सामाजिक प्रश्न आहे राजकीय नाही अशा शब्दात प्रसिद्ध लेखक सचिन गोस्वामी यांनीही सरकारला फटकारले आहे.

दरम्यान, हिंदीच्या अट्टाहासापायी विद्यार्थ्यांचे नुकसान का करताय? महाराष्ट्र शासनाने पहिलीपासून हिंदी भाषा शिकविण्याचा निर्णय घेतला असून मागच्या दाराने शिक्षणात त्रिभाषा सूत्र घुसडले आहे. सर्वात काळजीची बाब म्हणजे त्रिभाषा सुत्राबाबतचा हट्ट पुरविण्यासाठी कार्यानुभव, खेळ आणि कला या विषयांसाठीचे तास कमी करण्यात आले आहेत. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा, त्यांचे व्यक्तिमत्त्व बहरावे यासाठी हे तास अतिशय महत्त्वाचे आहेत. परंतु ते कमी करण्यात येत असल्याने शासनाचे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाबाबत नेमके काय धोरण आहे असा प्रश्न खासदार सुप्रिया सुळे यांनी उपस्थित केला आहे.

## अबू आझमींच्या वक्तव्याविरोधात आंदोलन

**सोलापूर, दि. २३ प्रतिनिधी**

अबू आझमी यांच्या वादग्रस्त वक्तव्याविरोधात सोलापुरातील वारकरी रस्त्यावर उतरत आक्रमक झाल्याचे पाहायला मिळत आहे. अबू आझमी यांच्या 'वारीमुळे रस्ता जाम होतो' या वक्तव्याच्या विरोधात वारकऱ्यांनी टाळ वाजवत निषेध आंदोलन केले आहे. सोलापुरातील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात हे आंदोलन करण्यात आले. अबू आझमी यांनी त्यांचे विधान मागे घेतले नाही तर राज्यभरातील प्रत्येक जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन करण्याचा इशारा यावेळी देण्यात आला आहे.



**कोल्हापूरच्या चपलेने त्यांचे तोंड फोडले जाईल- शरद कोळी**

समाजवादी पक्षाचे आमदार अबू आझमी यांनी वारी संदर्भात केलेल्या वादग्रस्त वक्तव्यावर आता शिवसेना (ठाकरे गट) आक्रमक झाला आहे. ठाकरे गटाचे उपनेते शरद कोळी यांनी अबू आझमींना थेट इशारा दिला आहे. "अबू आझमी यांनी जर राजकीय विषयावर बोललं असतं, तर ते खपून घेतलं असतं. पण त्यांनी पांडुरंगाच्या वारीवर केलेली टीका खपवून घेतली जाणार नाही, असे त्यांनी म्हटले आहे.

शरद कोळी म्हणाले की, अबू आझमी तुम्ही दुसऱ्या कुठल्याही राजकीय विषयावर बोलले असते तर आम्ही खपवून घेतले असते. परंतु, तुम्ही पांडुरंगाच्या वारी वर बोलला आहात, हे खपवून घेतले जाणार नाही. अबू आझमी ज्या पद्धतीने बोलले आहेत, त्याच पद्धतीने कोल्हापूरच्या कातड्याची चप्पल आणून त्यांचं तोंड फोडल्याशिवाय शिवसैनिक शांत बसणार नाही, असा इशारा त्यांनी दिला आहे. अबू आझमींच्या वक्तव्याने संपूर्ण महाराष्ट्रातल्या मराठी समाज बांधवांच्या आणि हिंदूंच्या भावना दुखावलेल्या आहेत. त्याला शिवसैनिक कधीच माफ करणार नाहीत. ते ज्या ठिकाणी दिसतील, त्या ठिकाणी त्यांना चपलांचा हार घालण्यात येईल. कोल्हापूरच्या चपलेने त्यांचे तोंड फोडले जाईल, असे देखील शरद कोळी यांनी म्हटले आहे.

**पुन्हा एकदा कानाखाली द्यावी लागेल- देशपांडे**

अबू आझमींना पडलेली कानाखाली विसरले असतील तर पुन्हा एकदा आम्हाला कानाखाली द्यावी लागेल. त्याशिवाय त्यांची अक्कल ठिकाणावर येणार नाही, असे म्हणत अबू आझमींच्या वारीसंदर्भातील वक्तव्यावरुन संदीप देशपांडे यांनी इशारा दिला आहे.

**महाराष्ट्राला लागलेली कीड - परांजपे**

अबू आझमी ही महाराष्ट्राला लागलेली कीड असून कायम प्रक्षोभक वक्तव्य करून महाराष्ट्रातील वातावरण खराब करण्याचे काम करत असल्याने सरकारने त्यांच्यावर कडक कारवाई करावी, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेसचे मुख्य प्रवक्ते आनंद परांजपे यांनी माध्यमांशी बोलताना आज केली.

आषाढी वारीला ८०० वर्षांची परंपरा आहे. आषाढी वारी ही महाराष्ट्राची सांस्कृतिक, धार्मिक, आध्यात्मिक ओळख आहे. संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊलींच्या आळंदीवरुन पालखी निघते.संत तुकारामांच्या देहू येथूनही पालखी निघते. लाखो वारकरी पायी चालत पंढरपूरला विठुरायाच्या दर्शनासाठी जातात. त्यावेळी मुस्लिम समाजाचे अनेक बांधव त्या वारीत सहभागी होतात आणि वारकऱ्यांना सेवा देतात याची आठवणही आनंद परांजपे यांनी अबु आझमी यांना करून दिली आहे. कायम हिंदू - मुस्लिम राजकारण करून अबु आझमी प्रक्षोभक वक्तव्य करत आहेत त्यामुळे त्यांच्यावर कडक कारवाई सरकारने करावी, असे पत्रकारांच्या प्रश्नांना उत्तर देताना परांजपे यांनी स्पष्ट केले.

**आम्ही उद्या हज यात्रेवर प्रश्न उपस्थित केला तर चालेल का?- राणे**

अबू आझमींनी वारीच्या पालख्यांसंदर्भात केलेल्या वक्तव्यावरूनही राणेंनी संताप व्यक्त केला. दर शुक्रवारी जे गॅस सिलेंडर वरती येतात त्यावर आझमी सारखे कारटे काहीच बोलताना दिसत नाही. आमच्या महाकुंभवर, आमची वारी सुरू झाली तर त्यावर आक्षेप घ्यायचा. आमची वारी वर्षभर असत नाही पण तुमच्या दररोज वर येणाऱ्या गॅस सिलेंडरवर बोला, त्यावर अबू आझमीने आपलं थोबाड उघडावं, अशा शब्दात नितेश राणेंनी अबू आझमीच्या वक्तव्यावरुन पलटवार केला आहे. तसेच, हे आम्ही इथे खपवून घेणार नाही, आम्ही उद्या हज यात्रेवर प्रश्न उपस्थित केला तर चालेल का? असा सवालही नितेश राणेंनी उपस्थित केला. तर, वारी वर बोलण्याची हिंमत कोणी करू नये, आमची वारी अशीच सुरू राहणार असल्याचेही त्यांनी म्हटले.

## मी नाराज आहे, या बातम्यांमध्ये तथ्य नाही- भास्कर जाधव

**रत्नागिरी, दि. २३ प्रतिनिधी**

गेल्या काही दिवसांपासून ठाकरे गटात नाराज असल्याची चर्चा असणारे कोकणातील ज्येष्ठ नेते भास्कर जाधव यांनी एक सूचक वक्तव्य केले आहे. नियतीच्या पोटात उद्या काय दडलंय हे कोणाला सांगता येत नाही. मी गोष्टी आधी करतो आणि नंतर सांगतो. मी ठाकरे गटात नाराज असल्याच्या चर्चांना अर्थ नाही. माझ्या वक्तव्यावर कोण काही सातत्याने बोलत असेल तर त्याबाबत भाष्य करण्याची आवश्यकता मला वाटत नाही. मी नाराज आहे, या बातम्यांमध्ये तथ्य नाही. ज्या गोष्टी माझ्या मनात नाहीत, त्यावर मी खुलासा करत नाही, असे भास्कर जाधव यांनी म्हटले. ते सोमवारी रत्नागिरीत आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत बोलत होते.



भास्कर जाधव यांनी आज रत्नागिरी जिल्ह्यातील आपल्या समर्थकांना घरी बोलावून घेतले होते. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांबाबत चर्चा करण्यासाठी मी ठाकरे गटातील स्थानिक पदाधिकाऱ्यांना बोलावून घेतल्याचे भास्कर जाधव यांनी सांगितले. तसेच भास्कर जाधव यांनी परस्परच आपण रत्नागिरीतील जिल्हा परिषद, नगरपालिका आणि पंचायत समितीच्या निवडणुकीची जबाबदारी अंगावर घेत असल्याची घोषणा केली. मी हीच चर्चा करण्यासाठी पक्षातील माझ्या सहकाऱ्यांना बोलावून घेतल्याचे भास्कर जाधव यांनी म्हटले. मी ही जबाबदारी नुसती अंगावर घेऊन थांबणार नाही तर पक्षाला यश मिळवून देईल, असे जाधव यांनी म्हटले. एकीकडे भास्कर जाधव हे आपण ठाकरे गटात नाराज नसल्याचे सांगत असले तरी त्यांनी परस्पर आपण रत्नागिरीतील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची जबाबदारी खांद्यावर घेतल्याची घोषणा केली. त्यामुळे राजकीय वर्तुळात तर्कवितर्कांना उधाण आले आहे. शिवसेनेच्या वर्धापन दिन सोहळ्यातील माझ्या भाषणात नाराजीचा लवलेश दिसला का? मी कशाला नाराज होईन? मी ही जबाबदारी घेणार असेल तर मला माझ्या सहकाऱ्यांशी बोलावे लागले. परस्पर एखादा निर्णय घेण्याचा किंवा घोषणा करण्याचा माझा स्वभाव नाही. मी सगळ्यांशी बोलून आणि विश्वासात घेऊन माझा निर्णय योग्य की अयोग्य, हे पडताळून पाहत आहे. त्यामुळे मी नाराज असल्याच्या बातम्यांमध्ये तथ्य नाही, असे भास्कर जाधव यांनी ठणकावून सांगितले.

## संदीप देशपांडेंचे वादग्रस्त विधान, 'षंढ' शब्दामुळे सत्ताधारी आक्रमक

**मुंबई, दि. २३ प्रतिनिधी**

मनसे नेते संदीप देशपांडे यांच्या नेतृत्वाखाली दादरच्या एका शाळेबाहेर हिंदी सक्तीच्या विरोधात स्वाक्षरी मोहीम राबवण्यात आली. यावेळी सरकारच्या हिंदी सक्ती धोरणावर टीका करताना त्यांनी षंढ हा शब्द वापरला. या शब्दावरून आता राजकारण सुरू झालं आहे. भाषा समजण्यासाठी तुम्हाला निवडून यावं लागेल, अशी खोचक टीका नीलम गोऱ्हे यांनी केली. तर षंढ या शब्दावरून हक्क भंग आणू, असा इशारा मंत्री गुलाबराव पाटील यांनी मनसेला दिला आहे. यावर आपण व्यक्ती बद्दल नाही तर प्रवृत्ती बद्दल बोललो होता, असा खुलासा संदीप देशपांडे यांनी केला आहे. तसेच माझा शब्द चुकला असेल; पण तुम्ही विचार करा. मी मराठी भाषेसाठी कोणत्याही कारवाईला सामोरे जाईन, असा निर्धार त्यांनी व्यक्त केला आहे.



हिंदी सक्तीविरोधात स्वाक्षरी मोहिम कार्यक्रमावेळी संदीप देशपांडे म्हणाले की, महाराष्ट्र नवनिर्माण सेना शांततेच्या मार्गाने आंदोलन करत आहे. सरकारने याची दखल घ्यावी. उद्या महाराष्ट्रभर आम्हाला उग्र आंदोलन करण्यास भाग पाडू नये. आम्ही रस्त्यावर उतरलो तर त्याची जबाबदारी सरकारची असेल. मराठी माणसाला आणि महाराष्ट्र सैनिकांना आवरण सरकारला कठीण होईल, असा इशारा संदीप देशपांडे यांनी दिला. सर्व षंढ लोक सरकारमध्ये बसले असतील तर मराठी माणसाने करायचं काय? असा सवालही त्यांनी यावेळी केला.

संदीप देशपांडे यांनी राज्य सरकारवर केलेल्या बोचऱ्या टीकेवर मंत्री गुलाबराव पाटील यांनी मनसेला इशारा दिला आहे. संदीप देशपांडे यांनी महाराष्ट्र विधीमंडळाचा अवमान केला आहे. षंढ या शब्दावरून हक्क भंग आणू , असे त्यांनी म्हटले आहे. तर भाषा समजण्यासाठी तुम्हाला निवडून यावं लागेल, अशी खोचक टीका शिवसेना नेत्या नीलम गोर्हे यांनी केली आहे.

**मी व्यक्तीबद्दल नाही प्रवृत्ती बद्दल बोललो : संदीप देशपांडे**

षंढ हा शब्द मी व्यक्तीबद्दल नाही प्रवृत्तीसाठी बोललो आहे. त्याबद्दल मला जेलमध्ये जावे लागले तरी चालेल मी तयार आहे, असे स्पष्ट करत संदीप देशपांडे यांनी पुन्हा एकदा हिंदी सक्तीच्या मुद्यावर राज्य सरकारवर टीका केली. मी कुठल्या ही कारवाईला सामोरे जाण्यास तयार आहे. माझा शब्द चुकला असेल; पण तुम्ही विचार करा. मी मराठी भाषेसाठी तुरूगात जाईन. कोणताही कार्यक्रम महाराष्ट्रात होत आहे तर तिथे मराठी असायला पाहिजे. लोकलमध्ये तीन भाषेत सूचना लिहिलेली असते. विमानतळावरही तीन भाषेतच लिहिले जाते. महाराष्ट्र विधीमंडळातील कार्यक्रमात हिंदी आणि इंग्रजी भाषेत मजकूर लिहिला जातो. आपली भाषा आपण जपली पाहीजे. बिहारचे लोक येऊन आपली भाषा जपणार आहेत का, असा सवालही संदीप देशपांडे यांनी केला.

## देशातील सर्व विमानांचे डीजीसीए करणार सेफ्टी ऑडिट

**नवी दिल्ली, दि. २३ वृत्तसंस्था**

भारताच्या विमान वाहतूक सुरक्षेच्या देखरेखीला बळकटी देण्यासाठी एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलत, नागरी विमान वाहतूक महासंचालनालयाने (डीजीसीए) व्यापक विशेष ऑडिटसाठी एक नवीन चौकट तयार केली आहे. अलिकडच्या एअर इंडिया अपघाताच्या पार्श्वभूमीवर विमान वाहतूक सुरक्षा मानकांवर वाढत्या तपासणीनंतर हा उपक्रम राबविला जात आहे आणि डेटा-चालित, जोखीम-आधारित आणि जागतिक स्तरावर संरेखित दृष्टिकोनाद्वारे देशातील सुरक्षा यंत्रणांमध्ये सुधारणा करण्याचा उद्देश आहे.

भारताच्या सर्वोच्च विमान वाहतूक नियामक डीजीसीए ने म्हटले आहे की नवीन चौकट विमान कंपन्या, विमानतळे आणि इतर भागधारकांमधील सुरक्षा प्रोटोकॉल, ऑपरेशनल कार्यक्षमता आणि नियामक अनुपालन तपासून विमान वाहतूक क्षेत्राचे समग्र मूल्यांकन प्रदान करेल.



जारी केलेल्या परिपत्रकानुसार, ऑडिटची रचना प्रणालीगत भेद्यता सक्रियपणे ओळखण्यासाठी, लवचिकता वाढविण्यासाठी आणि आंतरराष्ट्रीय नागरी विमान वाहतूक संघटना मानके आणि शिफारस केलेल्या पद्धती , तसेच भारताच्या राष्ट्रीय विमान वाहतूक सुरक्षा योजनेचे कठोर पालन सुनिश्चित करण्यासाठी केली आहे.

“हा उपक्रम सर्व भागधारकांशी सहयोगी सहभागाद्वारे सुरक्षा संरचना सतत मजबूत करण्याच्या डीजीसीएच्या अढळ वचनबद्धतेवर भर देतो,” असे नियामकाने म्हटले आहे.

## औरंगजेब पवित्र व्यक्ती, पण राजकारणासाठी बदनाम केले - माजी आमदाराचे वादग्रस्त विधान

**नाशिक, दि. २३ प्रतिनिधी**

मालेगावचे माजी आमदार आसिफ शेख यांनी औरंगजेबविषयी वादग्रस्त विधान करून नवा वाद ओढवून घेतला आहे. औरंगजेबने प्रामाणिक जीवन जगले. सर्वधर्म समभाव ठेवला. टोप्या शिवून ते आपला उदरनिर्वाह करायचे. आणि दोन वेळेचे जेवण करायचे, ते एक पवित्र व्यक्ती होते. परंतु राजकारणासाठी त्यांना बदनाम केले जात आहे, असे शेख यांनी म्हटले आहे. त्यांच्या या विधानामुळे राज्याच्या राजकारणात पुन्हा एकदा नव्या वादाला तोंड फुटण्याची शक्यता आहे.



मालेगाव येथे मायनॉरिटी डिफेन्स कमिटीच्या वतीने उत्तर महाराष्ट्र चिंतन शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी शेख पत्रकारांशी बोलत होते. दरम्यान, माझ्या विधानावर मी ठाम आहे. जे आहे ते आहे, तेच मी सांगितले आहे. आम्ही संविधानाला मानणारे आणि या देशावर प्रेम करणारे आहोत, असे त्यांनी सांगितले.

शेख यांनी इस्लाम (इंडीयन सेक्युलर लार्जेस्ट असेंबली ऑफ महाराष्ट्र) नावाचा राजकीय पक्ष काढला आहे. त्यांनी २०२४ ची विधानसभा निवडणूक लढवली आहे. शेख हे काँग्रेसचे माजी आमदार आहेत. मधल्या काळात त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला होता. राष्ट्रवादी शरद पवार गटाचा राजीनामा देऊन त्यांनी अपक्ष उमेदवार म्हणून निवडणूक लढवली होती. एमआयएमचे उमेदवार मौलाना मुफ्ती मोहम्मद इस्माईल यांनी शेख यांचा थोड्या मतांनी पराभव केला होता.

दरम्यान, शेख यांच्या वादग्रस्त विधानावर तीव्र प्रतिक्रिया उमटू लागल्या आहेत. काँग्रेसचे ज्येष्ठ नेते विजय वडेट्टीवार यांनी आम्ही केवळ छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास वाचला आहे. ओरंगजेबचा इतिहास वाचलेला नाही, अशी प्रतिक्रिया दिली आहे.

## विकासाचा प्रत्येक रुपया सर्वसामान्यांपर्यंत पोहचला पाहिजे- उपमुख्यमंत्री शिंदे

**मुंबई, दि. २३ प्रतिनिधी**

“विकासासाठी खर्च होणारा प्रत्येक रुपया सर्वसामान्यांपर्यंत पोहोचला पाहिजे. जनतेच्या कल्याणासाठी दिलेल्या घोषणा, योजना आणि तरतुदी प्रत्यक्षात उतरल्या जात आहेत की नाही, याची खात्री करून घेण्याचे काम अंदाज समित्यांमार्फत होत असते. त्यामुळेच या समित्यांना लोकशाहीचा आत्मा म्हणणे वावगे ठरणार नाही,” असे स्पष्ट मत राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केले.



आज संसद तसेच विविध राज्यांच्या प्राक्कलन (अंदाज) समित्यांच्या राष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी ते विधानभवनातील सभागृहात बोलत होते. या दोन दिवसीय परिषदेची सुरूवात आज झाली असून या वेळी लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला, राज्यसभेचे उपसभापती हरिवंश सिंह, विधानपरिषद सभापती प्रा. राम शिंदे, विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, विधानपरिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे, लोकसभा अंदाज समितीचे प्रमुख डॉ. संजय जयस्वाल, राज्य अंदाज समिती प्रमुख अर्जुन खोतकर यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री शिंदे यांनी आपल्या भाषणात नमूद केले की, "पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देशाचा विकास दुप्पट वेगाने होत आहे. या ‘अमृतकाळात’ आर्थिक शिस्त, पारदर्शकता आणि जबाबदारी या निकषांवर आधारित कारभाराचे महत्त्व अधिक वाढले आहे. या पार्श्वभूमीवर अंदाज समित्यांचे कार्य अत्यंत महत्त्वाचे ठरते."

"अंदाज समित्या म्हणजे छोटी संसद किंवा लघु विधिमंडळे आहेत. त्या शासनाच्या आर्थिक कामकाजावर बारीक नजर ठेवतात. अंदाजपत्रकातील तरतुदी योग्य वेळेत आणि योग्य पद्धतीने वापरल्या जात आहेत का, हे पाहणे त्यांचे मुख्य काम असते," असे शिंदे यांनी सांगितले.

# पेण देवनगरी येथे नव्याने नियोजित उद्यानाचा भूमिपूजन सोहळा संपन्न



**महासागर प्रतिनिधी,**

पेण: पेण नगरपरिषद हद्दीतील देवनगरी येथील सर्वे नंबर १०९ मध्ये नव्याने नियोजितरित्या तयार होणाऱ्या उद्यानाचा भूमिपूजन सोहळा रविवार दिनांक २२ जून रोजी संपन्न झाला. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष तथा रायगडचे खासदार सुनिल तटकरे यांच्या नेतृत्वाखाली आणि मंत्री अदिती तटकरे व माजी आमदार अनिकेत तटकरे यांच्या पुढाकाराने तसेच राष्ट्रवादीचे पेण शहराध्यक्ष जितेंद्र ठाकूर यांच्या प्रयत्नातून या उद्यानासाठी नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या परिक्षेत्रात अधिसूचित विशिष्ट नागरिक सेवा व सुविधा पुरवण्यासाठी महाराष्ट्र शासन नियोजन विभागाकडून २० लाखाचा निधी उपलब्ध करण्यात आला आहे. खासदार सुनील तटकरे यांचे पेण तालुक्यावर विशेष प्रेम असून तालुक्याला व शहराला नेहमी झुकते माप दिले आहे. खासदार सुनिल तटकरे यांच्या माध्यमातून शहरात विविध विकास कामे करू असा विश्वास राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष जितेंद्र ठाकूर यांनी दाखविला आहे. या भूमिपूजन कार्यक्रमाप्रसंगी देवनगरी येथील अध्यक्ष मधुकर पाटील, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या जिल्हा चिटणीस मीनाक्षी पाटील, जे एस पाटील, ध्वजा गुरखा, राजा देशमुख, मुकुंद टेमघरे, माणिक पवार, कैलास पाटील, काशिनाथ महाडिक आदी मान्यवर आणि राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे पदाधिकारी यावेळी उपस्थितीत होते.

# आमदार प्रशांत ठाकूर चषक २०२५ वक्तृत्व स्पर्धेचा शानदार शुभारंभ

**महासागर प्रतिनिधी,**

पनवे: कोशिश फाउंडेशनच्या वतीने आयोजित आमदार प्रशांत ठाकूर चषक २०२५ -वक्तृत्व स्पर्धेच्या पहिल्या टप्प्याची सुरुवात सोमवारी कामोठे मधील लोकनेते रामशेठ ठाकूर इंग्लिश मिडियम स्कूलमध्ये झाली. विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, संवाद कौशल्य व व्यक्तिमत्त्व विकास घडविणाऱ्या या उपक्रमातील वर्ग अंतर्गत फेरी अतिशय उत्साही वातावरणात पार पडली. विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, वक्तृत्वकौशल्य आणि नेतृत्वगुणांची जोपासना व्हावी या हेतूने पनवेल महानगरपालिका आणि कोशिश फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आमदार प्रशांत ठाकूर चषक २०२५ वक्तृत्व स्पर्धा २३ जून ते ३१ जुलैपर्यंत भव्य स्वरूपात आयोजित करण्यात आली आहे. कोशिश फाउंडेशनचे अध्यक्ष परेश ठाकूर यांच्या पुढाकाराने आणि मार्गदर्शनाखाली ही स्पर्धा दरवर्षी यशस्वीपणे राबवली जाते. या वर्षी स्पर्धेचे तिसरे वर्ष असून १८ शाळांमधून सुमारे १४



हजार विद्यार्थी सहभाग घेणार आहेत. स्पर्धा विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी एक महत्त्वपूर्ण व्यासपीठ ठरणार आहे. स्पर्धा वर्ग अंतर्गत फेरी, शाळा अंतर्गत फेरी आणि शालेय अंतिमफेरी होणार असून निवडक ६०० स्पर्धकांमधून अंतिम६० विजेते ठरणार आहेत. त्या अनुषंगाने नियोजन करण्यात आले आहे. त्या अंतर्गत सोमवारी या स्पर्धेच्या वर्ग अंतर्गत फेरीला सुरुवात झाली. यामध्ये पहिली ते दहावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांनी विविध विषयांवर प्रभावी भाषणे सादर करत आपली मते प्रभावीपणे मांडली. मुलांचे सादरीकरण, तयारी आणि आत्मविश्वास पाहून शिक्षक, पालक आणि परीक्षक भारावून गेले. या उपक्रमामध्ये गेल्या वर्षी हजार विद्यार्थी सहभागी झाले होते, तर यावर्षी सुमारे हजार विद्यार्थ्यांचा सहभाग अपेक्षित आहे. या उपक्रमात पनवेल महानगरपालिका अंतर्गत शाळांचाही समावेश आहे. या स्पर्धेची पुढील फेरी म्हणजे शाळा अंतर्गत फेरी लवकरच घेण्यात येणार आहे, ज्यामध्ये प्रत्येक वर्गातील निवडक विद्यार्थी पुढे जातील. त्यानंतर अंतिम फेरीत सर्वोत्तम वक्ते निवडले जातील. यावेळी युवा मोर्चाचे रायगड जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, समाजसेवक भाऊ भगत, मुख्याध्यापिका स्वप्राली म्हात्रे, प्राचार्य अविनाश कुलकर्णी, मनोहर शिंगाडे, विनोद खेडकर, युवा मोर्चा कामोठे शहर अध्यक्ष तेजस जाधव, कृष्ण शिरसागर, प्रवीण कोरडे, राहुल बुधे, किरण जाधव यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

# १६ टन एसटी बस साळाव पुलावरून सोडण्यासाठी

## मनसे तर्फे बांधकाम खात्यास निवेदन



**महासागर प्रतिनिधी,**

मुरुड जंजिरा: साळाव पुलाच्या नूतनीकरणाच्या निमित्ताने या पुलावरून अवजड वाहतुकीस आपण प्रतिबंध केलेला होता, पण सध्या नूतनीकरणाचे काम पूर्ण झालेले असल्यामुळे त्या पुलावरून एसटी महामंडळाच्या नवीन गाड्या चे वजन हे १६ टन पर्यंत असल्यामुळे, एसटी महामंडळाकडून वारंवार पत्रव्यवहार होऊनहीं अद्याप आपल्या खात्याने नवीन एसटी गाड्यांना सदर पुलावरून जाण्यास आपली परवानगी दिलेली नाही, नूतनीकरणानंतर सदर पुलावरून इतर अवजड वाहतूक ही सुरळीत सुरू आहे. परंतु फक्त एसटी वाहतुकीस प्रतिबंध करण्यात आला आहे. आपल्या खात्यामार्फत एसटी महामंडळास पत्र देण्यात यावे अशी प्रमुख मागणी मुरुड तालुका महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे सचिव राजेश तरे यांनी कार्यकारी अभियंता याना दिलेल्या निवेदनातून करण्यात आले आहे .यावेळी त्यांच्यासमवेत मनसेचे रायगड जिल्हा उपाध्यक्ष शैलेश खोत सुद्धा उपस्थित होते. यावेळी या निवेदनात नमूद करण्यात आले आहे कि, सदर पूल हा १६ टना वरील वाहतुकीस योग्य नसल्यास आपल्या विभागाकडून तशा सूचनेचा फलक पुलाच्या दोन्ही बाजूस का लावला गेलेला नाही याचा खुलासा करावा. तसेच इतर अवजड व लोडेड गाड्या आज सुद्धा साळाव पुलावरून बिन्दास्त पणे सुरु असताना फक्त एसटी सेवेला बंधन का हा प्रश्न या निवेदनातून विचारण्यात आला आहे. लोक हिताचा जास्तीत जास्त विचार करून आपण एसटी वाहतुकीस परवानगी द्यावी अशी आग्रहाची मागणी मनसे तर्फे करण्यात आली आहे.

# डिजिटल पेमेंटमध्ये उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल अर्थ मंत्रालयाच्या वित्तीय सेवा विभागाकडून इंडसइंड बँकेचा सन्मान

**महासागर प्रतिनिधी,**

पनवेल (प्रतिनिधी) भारत सरकारच्या अर्थ मंत्रालयाच्या वित्तीय सेवा विभागाकडून २०२३-२४चा डिजिटल पेमेंट्स पुरस्कार मिळाल्याची घोषणा इंडसइंड बँकेने केली आहे. २०२३-२४ या आर्थिक वर्षात डिजिटल पेमेंटमध्ये उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल खासगी क्षेत्रातील बँकांमध्ये या बँकेने तिसरा क्रमांक पटकावला. नवी दिल्लीतील विज्ञान भवन येथे झालेल्या या पुरस्कार सोहळ्याला केंद्रीय अर्थमंत्री श्रीमती निर्मला सीतारमण प्रमुख पाहुण्या म्हणून आणि अर्थ राज्यमंत्री श्री. पंकज चौधरी सन्माननीय अतिथी म्हणून उपस्थित होते. डिजिटल क्षमता वाढवण्याच्या आणि देशभरातील लाखो लोकांना सक्षम बनवणाऱ्या सुरक्षित, स्केलेबल तसेच नावीन्यपूर्ण डिजिटल पेमेंट सोल्यूशन्स प्रदान करण्याच्या इंडसइंड बँकेच्या अढळ वचनबद्धतेचा हा पुरस्कार म्हणजे एक पुरावा आहे. वित्तीय सेवा विभागाने जारी केलेल्या अधिकृत स्कोअरकार्डनुसार, बँकेने आर्थिक वर्ष २३-२४ मध्ये डिजिटल व्यवहाराचे १२० टक्के लक्ष्य साध्य केले - जे भारतातील सर्व खासगी क्षेत्रातील बँकांमध्ये सर्वाधिक आहे. डिजिटल पेमेंट्स पुरस्कार समारंभात इंडसइंड बँकेच्या श्री. रितेश राज सक्सेना, डायरेक्ट बँकिंग प्रमुख आणि श्री. देव रतन सुरी, प्रमुख - एसडीजी (पेमेंट्स, कार्ड्स आणि सरकारी व्यवसाय) यांना श्री. एम. नागराजू, सचिव, वित्तीय सेवा विभाग आणि डॉ. अभिजित फुकोन, आर्थिक सल्लागार, डीएफएस यांनी हा पुरस्कार प्रदान केला. या कामगिरीबद्दल इंडसइंड बँकेचे ग्राहक बँकिंग आणि विपणन प्रमुख सौमित्र सेन म्हणाले, "हा पुरस्कार आम्हाला दिल्याबद्दल आणि देशभरात डिजिटल स्वीकार वाढवण्यासाठी इंडसइंड बँकेच्या प्रयत्नांना मान्यता दिल्याबद्दल आम्ही अर्थ मंत्रालयाच्या वित्तीय सेवा विभागाचे आभारी आहोत. आयएनडीआयइ सारख्या आमच्या वेगळ्या प्लॅटफॉर्मद्वारे सतत नावीन्यपूर्ण आणि आमच्या ग्राहकांना अंतर्ज्ञानी, सुरक्षित आणि वैयक्तिकृत बँकिंग अनुभव देण्याच्या आमच्या संकल्पाला ही मान्यता बळकटी देते. भारताच्या डिजिटल प्रवासाला पाठिंबा देण्यासाठी आणि समाजातील प्रत्येक घटकासाठी बँकिंग सुलभ आणि सहज बनवण्यासाठी आम्ही वचनबद्ध आहोत." डिजिटल २.० धोरणाअंतर्गत, इंडसइंड बँकेने अखंड, सर्वसमावेशक आणि नावीन्यपूर्ण आर्थिक अनुभव देत आहे. आमचे प्रमुख ॲप, आयएनडीआयइ हे ॲप स्टोअरवरील सर्वाधिक रेटेड ॲप आहे. १. ६ दशलक्ष सक्रिय वापरकर्त्यांसह रिटेल बँकिंगची पुनर्परिभाषा करत आहे. पूर्णपणे डिजिटल होण्याच्या प्रवासांतर्गत बँकेच्या डिजिटल क्रेडिट प्लॅटफॉर्मने दरमहा १. २ दशलक्ष अर्जांवर प्रक्रिया केली. ९३ टक्के (३१ मार्च २०२५ पर्यंत) एकूण डिजिटल व्यवहारांसह, इंडसइंड बँक भारतातील डिजिटल पेमेंट क्षेत्रात आघाडीवर आहे.

# परीमंडळ २ पनवेलच्या सहाय्यक पोलीस आयुक्तपदी भाऊसाहेब ढोले यांची नियुक्ती



**महासागर प्रतिनिधी,**

पनवेल : नवी मुंबई पोलीस ठाणे अंतर्गत परीमंडळ २ पनवेल येथील सहाय्यक पोलीस आयुक्तपदी भाऊसाहेब ढोले यांची नियुक्ती करण्यात आली असून त्यांनी नुकताच पदभार स्वीकारला आहे. या पूर्वी असलेलले सहाय्यक पोलीस आयुक्त अशोक राजपूत यांची आर्थिक गुन्हे शाखा नवी मुंबई येथे बदली करण्यात आली असून त्यांच्या जागी नवी मुंबई आर्थिक गुन्हे शाखेत कार्यरत असणारे सहाय्यक पोलीस आयुक्त भाऊसाहेब ढोले यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांनी पदभार स्वीकारताच विविध राजकीय पक्षाचे पदाधीकारी, सामाजिक कार्यकर्ते, पत्रकार आदींनी त्यांची भेट घेऊन त्यांना शुभेच्छा दिल्या आहेत.

# शाळेतील विद्यार्थ्यांना वह्या वाटप



**महासागर प्रतिनिधी,**

सुधागड:सुधागड तालुक्यातील रा. जि. प. शाळा तिवरे येथे जय भवानी ग्रामविकास सामाजिक व सांस्कृतिक मंडळ रासळवाडी यांच्या कडून नुकतेच विद्यार्थ्यांना वह्या वाटप करण्यात आल्या. हे मंडळ मागील १२ वर्षापासुन विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासासाठी विविध उपक्रम राबवत आहे. या कार्यक्रमासाठी सुधागड तालुक्याचे तहसीलदार उत्तम कुंभार, तिवरे माजी सरपंच मनोहर देशमुख यांच्यासह चंद्रकांत जाधव, कृष्णा मोरे, अरुण मोरे, पेडली तलाठी, मंडळ अधिकारी, पोलिस पाटील, यावेळी मुख्याध्यापिका श्रावणी मोरे, शिक्षक रविंद्र आंधळे, शाळा व्यवस्थापन समिती सदस्य, पालक व ग्रामस्थ तिवरे मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी मुख्याध्यापिका श्रावणी मोरे यांनी मंडळ अध्यक्ष श्रीकांत मोरे, चंद्रकांत जाधव, कृष्णा मोरे, अरुण मोरे, अशोक मोरे, किशोर मोरे, अनिल मोरे, सुनील मोरे, रामदास मोरे, अमृत मोरे, सखाराम मोरे, ज्ञानेश्वर मोरे, भागवत मोरे, अनंत मोरे, राजेश मोरे, रमेश मोरे, शैलेश मोरे, शिरीष मोरे, ऋषिकेश मोरे, कार्तिक मोरे, सौरभ मोरे या सर्वांचे आभार मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षक रविंद्र आंधळे यांनी केले.

# माथेरान शार्लेट लेक ओव्हर फ्लो चा सुरक्षित धबधबा पर्यटकांसाठी बंद



**महासागर प्रतिनिधी,**

माथेरान: सध्या पावसाळी पर्यटनाचा आनंद घेण्यासाठी मुंबई पुण्यापासून अगदी जवळचे हिल स्टेशन असलेल्या माथेरान मध्ये विकेंडच्या दिवसात प्रचंड प्रमाणात गर्दी पाहाव्यास मिळत आहे. येथील महत्त्वाच्या प्रेक्षणीय स्थळापैकी पर्यटनाचा प्रमुख केंद्रबिंदू असलेल्या शार्लेट लेक तलावावरील ओव्हर फ्लो ने तयार झालेला कृत्रिम व सुरक्षित मानला जाणारा धबधबा हा येथील पावसाळी पर्यटनाचे खास आकर्षण आहे. मात्र काही दिवसांपासून या धबधब्याकडे जाणाऱ्या मार्गांवर माथेरान नगरपरिषदेने तारेचे कुंपण करून पर्यटकांना मज्जाव केला आहे. परिणामी शार्लेट लेक तलावाच्या परिसरात ज्या ठिकाणी कोणतेही तारेचे कुंपण किंवा सुरक्षा रक्षकच तैनात नाही व जेथे पाण्याची खोली देखील जास्त आहे अशा ठिकाणी तलाव पात्रात सेल्फी,फोटो काढण्यासाठी मोठया प्रमाणात पर्यटक हमखास उतरताना दिसत आहे. यामुळे खास पावसाळी पर्यटनाचे आकर्षण व सुरक्षित मानला जाणाऱ्या शार्लेट लेक तलावाच्या ओव्हर फ्लो धबधब्यावर आनंद घेण्यासाठी दरवर्षी माथेरानला येणाऱ्या पर्यटकांना मज्जाव करण्यासाठी तारेचे कुंपण करून या ठिकाणी माथेरान संयुक्त वन व्यवस्थापन समितीच्या नावाने तलावात मगर असल्याचे खोटे सूचना फलक लावून येथील प्रशासन आपली जबाबदारी झटकत असल्याचे व पर्यटकांच्या सुरक्षेते बाबत फक्त दिखावा करत असल्याचे नागरिकांकडून बोलले जात आहे. व त्याचा थेट परिणाम येथील पर्यटनासह स्थानिकांच्या व्यवसायावर होत असल्याने माथेरान नगरपरिषदेच्या या भोंगळ कारभाराबाबत स्थानिक व्यवसायिक तसेच पर्यटकांकडून तीव्र नाराजी व्यक्त केली जात असून गेले कित्येक वर्षापासून पावसाळी पर्यटनात येथे येणाऱ्या पर्यटकांचे खास आकर्षण व येथील व्यवसायिकांचे आर्थिक स्तोत्र चालवणारा माथेरानचा हा सुरक्षित मानला जाणारा धबधबा पर्यटनासाठी त्वरित खुला करावा अशा मागणीला देखील आता जोर धरू लागला आहे

# मुरुड शहरातील नागरिकांची मागणी प्रसन्न पुलेकर याच्यावर कायदेशीर कार्यवाही व्हावी

**महासागर प्रतिनिधी,**

मुरुड शहरातील असंख्य नागरिकांनी प्रसन्ना मोहन पुलेकर नामक स्थानिक व्यक्तीने शेअर मार्केट मधील गोल्डन बुल्स या कंपनी मध्ये ट्रेडींग करुन मुरुड शहरातील नागरिकांना एक लाख रुपयास प्रत्येक महिन्याला दहा हजार रुपये व्याज देण्याचे अमिश दाखवत कोट्यवधी रुपये जमवले काही महिने व्याज दिले परंतु तदनंतर उडवा उडवीची उत्तरे देऊन जबाबदारी झटकण्याचा प्रयत्न केल्याने असंख्य लोकांचे कोट्यवधी रुपये बुडाले असल्याची कैफियत पत्रकार परिषदेत मांडण्यात आली. पुलेकर यांच्यावर कायदेशीर कार्यवाही व्हावी अशी मागणी सुपारी संघाचे माजी चेअरमन महेश भगत,ॲड,रुपेश पाटील,ॲड.अजित चोगले ,प्रणव गुरव व समस्त उपस्थित नागरिकांनी केली आहे.

त्याच्या या अमिषाला भुलून शहर व मुरुड तालुक्यातील अन्य बाहेरील व्यक्तींनी प्रसन्ना मोहन पुलेकर यांचेकडे पैसे गुंतवायला सुरुवात केली. यामध्ये पेन्शनधारक लोकांनी आयुष्याची पुंजी सुद्धा त्याच्याकडे दिली. काहींनी एफ.डी. मोडली तर काहींनी अनेक पतपेढ्या व बँकांमधुन कर्ज काढले व लाखो रुपये त्याच्याकडे गुंतविले



आहेत. सुमारे २५० हुन अधिक लोकांनी पैसे गुंतविले व अंदाजे हि रक्कम ५० कोटी पेक्षा जास्त रक्कम गुंतविले असल्याची माहिती उपस्थित लोकांनी यावेळी पत्रकार परिषदेमध्ये दिली आहे. सुरुवातीच्या काळात पैसे देवून लोकांची मने जिंकली. परंतु तदनंतर काही दिवसातच त्याने पैसे देण्यास टाळाटाळ करू लागला. प्रसन्ना मोहन पुलेकर हा सर्वांना सांगु लागला की, ट्रेडींग मधील माझा सहकारी पळून गेला आहे, मला तुमचे पैसे देता येणार नाही अशी बतावणी करायला लागला व उर्मटपणे उत्तरे देवू लागल्यावर सर्व लोकांना समजुन आले की, ते फसले आहेत. सन २०२२ पासुन २०२५ पर्यंत या व्यक्तीने खोटी बतावणी करीत पैसे देतो देतो असे सांगून पैसे दिलेच नाही. फसवणुक झालेली सर्व मुरुडकर एकत्र आलेले असून प्रसन्ना मोहन पुलेकर याच्या विरोधात कायदेशीर कार्यवाही व्हावी यासाठी रायगड जिल्ह्याच्या जिल्हा पोलीस अधीक्षक तसेच वरीष्ठ पोलीस अधिकाऱ्यांना भेटून सदर इसमाविरुध्द एफ.आय.आर. दाखल व्हावी हि प्रमुख मागणी करणार असल्याचे यावेळी पत्रकार परिषदेत सांगण्यात आले. यावेळी उपस्थित महिलांनी सांगितले कि,पुलेकर यांच्या पत्नी रिया पुलेकर याना भेटलो असता आम्हाला त्रास दिलात तर मी आत्महत्या करेन अशी धमकी देत आहेत.मग आमचे पैसे कसे मिळणार असा सवाल यावेळी उपस्थित करण्यात आला.मुरुड दिवाणी न्यायालयात प्रसन्ना पुलेकर याच्यावर चेक बाउंस प्रकरणातील ऐकून आठ केसेस सुरु असून त्याच्यावर १३८ अन्वेय खटला सुरु असल्याची माहिती ॲड.अजित चोगले,ॲड. रुपेश पाटील यांनी पत्रकार परिषदेत दिली आहे.पुलेकर यांचे सर्व बँक खाती तपासण्यात यावी त्यांनी आपल्या नातेसंबंधात जर मालमत्ता खरेदी केली असेल तर ती शासनाने ताब्यात घ्यावी अशी मागणी सुद्धा यावेळी करण्यात आली.सदरील पत्रकार परिषदेत ६५ पेक्षा जास्त नागरिक उपस्थित होते.

# दिलीप भोईर यांनी उचलले शिवधनुष्य

**महासागर प्रतिनिधी,**

अलिबाग (रत्नाकर पाटील)

रायगड जिल्हा परिषदेचे माजी समाज कल्याण सभापती दिलीप भोईर व शिवसेना शिंदे गट आमदार महेंद्र दळवी यांची दिल जमाइ झाली असून दिलीप भोईर यांनी आपल्या हजारो समर्थकांसह शिवसेनेत जाहीर प्रवेश केला. राज्याचे रोजगार हमी योजना मंत्री भरत गोगावले यांनी त्यांचे शिवसेनेत स्वागत केले. आमदार महेंद्र दळवी व दिलीप भोईर यांनी एकमेकांना आलिंगन देत वाद मिळण्याची दीली ग्वाही. तसेच दिलीप भोईर यांच्या खांद्यावर जिल्ह्यात मोठी जबाबदारी देण्यात येईल अशे आश्वासन मंत्री भरत गोगावले यांनी दिली.

विधानसभा निवडणुकीत अलिबागची जागा शिवसेनेच्या वाटेला गेल्यानंतर भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष दिलीप भोईर बंडखोरी करीत अपक्ष उमेदवार अर्ज दाखल केला. त्यानंतर दिलीप भोईर यांच्यावर भाजपने निलंबनाची कारवाई केली. निवडणूक प्रचारात महेंद्र दळवी व दिलीप भोईर यांनी एकमेकांनवर जोरदार टीका केली. निवडणुकीत महेंद्र दळवी यांनी शेकापे उमेदवार चित्रलेखा पाटील यांचा पराभव करून विजय मिळवला. तर दिलीप भोईर सुमारे 33 हजार ५०० मते मिळवत तिसऱ्या क्रमांकावर राहिले. मागील काही दिवसापासून एकमेकांचे



विरोधक असलेले आमदार महेंद्र दळवी व दिलीप भोईर हे कार्यक्रमांमध्ये एकत्र दिसत होते. यावरून ते शिवसेनेत प्रवेश करतील अशी अटकळ बांधली जात होती. शनिवारी त्यांनी आपल्या हजारो समर्थकांच्या उपस्थिती शिवसेनेत पक्ष प्रवेश केला. यावेळी जिल्हा परिषदेच्या माजी सदस्य मानसी ताई दळवी, शिवसेनेचे अध्यक्ष राजा केणी ,महिला आघाडी प्रमुख संजीवनी नाईक, अलिबाग तालुका अध्यक्ष अनंत गोंधळी यांच्यासह शिवसेनेचे अलिबाग मुरुड रोहा तालुक्यातील पदाधिकारी उपस्थित होते.

मी सर्वसामान्यांच्या प्रश्नासाठी झटणारा कार्यकर्ता आहे. यापूर्वीच्या पक्षात काम केले ते पक्ष प्रामाणिकपणे वाढवण्यासाठी जिल्ह्यात काम केले. विधानसभेत मी कुणाचा तरी आदेश घेऊनच अर्ज भरला होता. आता शिवसेनेत प्रवेश करत आहोत. आमदार महेंद्र दळवी व मी एकाच गुरुचे शिष्य आहोत. आमच्यातील मतभेद आता संपले असून "संघर्ष संपला, पाठिंबा वाढला" आहे.

दिलीप भोईर
माजी समाज कल्याण सभापती

दिलीप भोईर यांच्या पक्षप्रवेशामुळे जिल्ह्यात शिवसेनेची ताकद वाढणार आहे. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत याची प्रचिती येईल. दिलीप भोईर सर्वसामान्य जनतेत मिसळणारे नेते आहेत. त्यांना व त्यांच्या कार्यकर्त्यांना पक्षात योग्य तो सन्मान दिला जाईल. पक्ष जिल्ह्याची माझ्यावर जबाबदारी देणार होता ती जबाबदारी दिलीप भोईर यांना देण्यात येईल.

महेंद्र दळवी
आमदार

शिवसेनेत दिलीप भोईर यांचे स्वागत आहे. भोईर यांच्या खांद्यावर जिल्ह्यात मोठी जबाबदार देण्यात येईल. आगामी निवडणुकीत महायुती म्हणून जर प्रेमाने आले तर सर्वांना सोबत घेऊ.मात्र कुणी आगळीक केलीच तर आपला निर्णय आपण घेऊ. निवडणुकीची तुम्ही तयारी सुरू करा. भोईर त्यांच्या पक्षप्रवेशामुळे आपली ताकद वाढली आहे.

ना. भरत गोगावले

# पाचशे ते सहाशे ताडपत्रींचे वाटप

**महासागर प्रतिनिधी,**

पनवेल: श्रीमद राजचंद्र अक्षम वलसाड गुजरात, नवी मुंबई यांच्या तर्फे पनवेल तालुक्यातील आदिवासी वाडींमध्ये 500 ते 600 ताडपत्रींचे वाटप करण्यात आले.

पनवेल तालुक्यातील वाकडी गावचे माजी सरपंच नामदेव जमदाडे यांच्या पुढाकाराने श्रीमद राजचंद्र आक्षम वलसाड, गुजरात, नवी मुंबई यांच्या तर्फे पनवेल तालुक्यातील वाकडी आदिवासी वाडी, मोरबे आदिवासी वाडी, महाळुंगी वाडी, खैरवाडी, गारमाळ फणसवाडी, नेरेपाडा आदिवासी वाडी अश्या अनेक वाड्या मध्ये साधारण 500 ते 600 ताडपत्री वाटप करण्यात आल्या.

# दासगाव, बौद्धवाडी ग्रामस्थ पाच वर्षापासून पंधरा टक्के अनुदानापासून वंचित


**महासागर प्रतिनिधी,**

महाड: दासगाव, ग्रामपंचायत अंतर्गत बौद्धवाडी ग्रामस्थ गेली पाच वर्ष पंधरा टक्के अनुदानापासून वंचित असल्याची माहिती समोर आली आहे याबाबत बौद्धवाडी चे उपाध्यक्ष संतोष हाटे यांनी महाड पंचायत समितीमध्ये लेखी तक्रार केली आहे सविस्तर वृत्त असे की बौद्धवाडी समाजाची 15 घरी आहेत सन 2020 पासून बौद्ध समाजाला पंधरा टक्के अनुदान याचा लाभ देण्यास ग्रामसेवक टाळाटाळ करीत असल्याचे दिसते त्याबाबत वेळोवेळी बोधडी चे उपाध्यक्ष संतोष हाटे यांनी याबाबत महाड पंचायत समितीचे गटविकास अधिकारी यांच्याकडे लेखी तक्रार अर्ज दिला होता या अर्ज त्यांनी ग्रामपंचायतीने सन 2020 पासून समाजासाठी असलेला पंधरा टक्के अनुदान निधी बौद्धवाडीला मिळालेला नाही असे नमूद केले आहे त्यामध्ये घोल असल्याचा आरोपही त्यांनी केला आहे दखल घेत महाड पंचायत समिती आणि पाच मे रोजी दोन वेळा ग्रामपंचायत इला लेखी पत्र देऊन त्यांच्याकडून अहवाल मागितला होता केलेल्या कारवाईचा अहवाल मागितला होता हाच तागायत या बौद्ध वाडीला अनुदानापासून वंचित राहावे लागते याबाबत प्रस्तुत प्रतिनिधी यांनी ग्रामपंचायत अधिकारी प्रवीण शिंदे त्यांच्याकडे संपर्क साधला असता त्यांनी बोदवाडीला अनुदान देण्याचे राहून गेले

# धाटाव औद्योगिक वसाहतीतील रस्त्याला लागले ग्रहण

**महासागर प्रतिनिधी,**

रोहा: धाटाव एमआयडीसीतील नीलिकॉन व एफडीसी कंपनीच्या कॉर्नर वर गटाराच्या कामासाठी एक भला मोठा खड्डा खोदलेला होता . चक्क तेथे ठेकेदाराने मातीचा ढिगारास वाचून ठेवलेला असल्याने चिखल देखील मोठ्या प्रमाणावर साचलेला आहे व हे काम अद्याप प्रगतीपथावर नसून या रस्त्याचे काम गेल्या पंधरा दिवसापासून रखडलेला आहे त्यामुळे कामगार वर्गांना , केमिकल टँकर वाहन चालकांना ये जा करण्यासाठी रस्ता सुस्थितीत नसल्यामुळे भयंकर मनस्ताप सहन करावा लागत आहे . सध्या पावसाचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर असल्यामुळे त्या ठिकाणी पाणी साचून राहिल्याने रात्रीच्या वेळी एखाद्या वाहनाला अंदाज आला नाही तर एखादा अपघात होण्याची शक्यता आहे . त्यामुळे आता रखडलेला रस्त्याचे ग्रहण सुटणार कधी ? अपूर्ण काम पूर्ण होणार कधी असा सवाल देखील कामगार वर्गातून उपस्थित केला जात .



हा रस्ता रहदारीच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचा असून अनेक गावांना देखील जोडणारा रस्ता आहे . रस्त्याच्या बाजूलाच निलिकॉन , एफ डी सी , मजदा , रोहाडाय असे अनेक कारखाने असून पलीकडे किल्ला धाटाव , बारसोली हे गाव देखील त्या ठिकाणी असलेले आहे

## टवाळखोरांवर 'निर्भया'चा वॉच, पोलीस दीदींमुळे अनेक गुन्ह्यांना फुटली वाचा, महिलांना आधार

**मुंबई, दि. २३ : प्रतिनिधी**

महिलांच्या सुरक्षेसाठी तैनात करण्यात आलेल्या निर्भया पथकामुळे कुठे हरवलेली नाळ जुळताना दिसतेय, तर कुठे रात्री-अपरात्री बाहेर पडणाऱ्या महिलांसाठी मुंबई पोलिसांचे निर्भया पथक आधार ठरताना दिसत आहे. निर्भया तसेच पोलीस दीदींमुळे अनेक गुन्ह्यांना वाचा फुटतानाही दिसत आहे. मुंबईतल्या महिलांसंबंधित घडलेल्या गुन्ह्याच्या आधारावर निर्जनस्थळी, धोकादायक अशी ठिकाणे निवडून त्याठिकाणी क्यूआर कोड लावून गस्तीवर भर देण्यात येत आहे. प्रत्येक पोलीस ठाण्यांतर्गत अशी ३० ते ४० ठिकाणे असून त्यानुसार हे पथक साध्या गणवेशात छुप्या कॅमेरांसह टवाळखोरांवर लक्ष ठेवून आहेत. तसेच अनेकदा कॉर्पोरेट सेक्टर, शाळा, महाविद्यालयांतील महिला पुढे येत नाही. अशा ठिकाणी महिला पथक जाऊन त्यांच्याशी संवाद साधत असल्याचे पोलिसांनी सांगितले.




प्रत्येक पोलीस ठाण्यातील महिला पोलीस अधिकारी आणि कर्मचारी यांच्यासाठी स्वतंत्र महिला कक्ष उभारण्याचे कामही प्रगतीपथावर आहे. नागपाडा पोलीस ठाण्यापासून याची सुरुवात करण्यात आली आहे. या कक्षाचे उद्घाटनही करण्यात आले आहे.

पथकाबाबत जास्तीत जास्त जनजागृती करण्यासाठी फेसबुक, इन्स्टाग्रामवर देखील त्याचे स्वतंत्र पेज सुरू करण्यात आले आहे. तसेच निर्भया पथकाची देणारी पुस्तिकाही सर्वत्र उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

**असे करतात काम...**

१. हे पथक मुंबईतील सर्व पोलीस ठाण्यांत पोलीस उपनिरीक्षकांच्या नेतृत्त्वाखाली दोन महिला आणि दोन पुरुष अंमलदार तैनात आहेत.

२. या दरम्यान छुप्या कॅमेऱ्यांसह स्वतंत्र मोबाइल फोन, वाहने पुरविण्यात आली आहेत. पोलिसांच्या १०० क्रमांकाच्या हेल्पलाइनसह १०३ क्रमांकाची स्वतंत्र हेल्पलाइन सुरू करण्यात आली आहे.

३. जेणेकरुन महिलांपर्यंत तातडीने पोहोचता येणार आहे. याशिवाय, पोलिसांकडून कार्यशाळांवर भर देण्यात आला आहे.

# एसटीचा 'हिशेब' जनतेपुढे!

- परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी सादर केली परिवहन विभागाची श्वेतपत्रिका
- 6353 कोटींची भांडवली तर 4708 कोटींची महसुली मदत; तरीही एसटीवर 3297 कोटींची देणी बाकी

**मुंबई, दि. २३ : गजानन तुपे**

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी) आर्थिक स्थितीचा पारदर्शक आढावा देताना परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी आज मुंबई सेंट्रल येथील मुख्यालयात परिवहन विभागाची श्वेतपत्रिका सादर केली. 2001 पासून आतापर्यंत राज्य सरकारने एसटी महामंडळाला तब्बल 6353 कोटी रुपयांची भांडवली मदत दिली असून, केवळ 2020 ते 2023 या कालावधीत 4708 कोटींची महसुली मदत करण्यात आली आहे.

तरीदेखील एसटीवर 3297 कोटी रुपयांची वैधानिक स्वरूपाची देणी प्रलंबित आहेत, असे मंत्री सरनाईक यांनी स्पष्ट केले.

**तोट्याची कारणे आणि सुधारण्याची दिशा**

परिवहन मंत्र्यांनी श्वेतपत्रिकेत एसटीच्या तोट्याची प्रमुख कारणे उघडकीस आणली.

त्यामध्ये बसांचा अपुरा ताफा




तोट्यात चालणाऱ्या फेऱ्या

वेळेवर भाडेवाढ न होणे

**खासगी वाहतुकीचा वाढता दबाव**

हे घटक विशेष महत्त्वाचे असल्याचे नमूद करण्यात आले आहे.

दरवर्षी ५ हजार नव्या बसेस घेण्याचे महत्त्वाकांक्षी लक्ष्य

राज्यातील ग्रामीण आणि दुर्गम भागांमध्ये सार्वजनिक वाहतुकीची सेवा सक्षम करण्यासाठी एसटी महामंडळाने दरवर्षी ५ हजार नव्या बसेस ताफ्यात आणण्याचे लक्ष्य ठेवले असल्याचे मंत्री सरनाईक यांनी जाहीर केले. हे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी सरकारकडून धोरणात्मक पाठबळ आणि आर्थिक सहकार्य दिले जाणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

**'एसटी वाचली पाहिजे, एसटी चालली पाहिजे' — मंत्री सरनाईक**

"एसटी ही केवळ वाहतुकीची संस्था नाही, तर राज्यातील सामान्य नागरिकांच्या दैनंदिन जीवनाची श्वासवाहिनी आहे. त्यामुळे ती आर्थिक दृष्ट्या सक्षम होणे गरजेचे आहे. त्यासाठी पारदर्शकता, कामकाजात सुधारणा आणि धोरणात्मक निर्णय आवश्यक आहेत," असे सांगून मंत्री सरनाईक यांनी सरकारच्या वचनबद्धतेचा पुनरुच्चार केला.

राज्यातील कोट्यवधी प्रवाशांना स्वस्त, सुरक्षित व वेळेवर सेवा मिळावी, हा या श्वेतपत्रिकेचा मुख्य उद्देश आहे. तसेच नागरिकांच्या पैशाचा हिशेब जनतेपुढे मांडण्याची ही प्रक्रिया लोकशाहीतील जबाबदारी म्हणून त्यांनी अधोरेखित केली.

# कोस्टल रोड: विकासाच्या मार्गावरील मच्छिमारांचं काय?

मुंबई शहराची ओळख केवळ एका आर्थिक राजधानीपुरती मर्यादित नाही; ती येथील समुद्र आणि त्याच्याशी एकरूप झालेल्या भूमिपुत्र कोळी समाजाच्या अविभाज्य नात्यात गुंतलेली आहे. माझ्या सखोल संशोधनातून जे चित्र समोर आले आहे, ते केवळ भावनिक नाही, तर ते पूर्णतः वैज्ञानिक आणि तथ्यांवर आधारित आहे. मुंबई कोस्टल रोड प्रकल्प हा वाहतुकीचा प्रश्न सोडवण्यासाठीचा एक अभियांत्रिकी प्रयत्न असला, तरी तो एका गंभीर पर्यावरणीय आणि सामाजिक संकटाचे कारण ठरत आहे, ज्याचे सूक्ष्म विश्लेषण करणे अत्यंत आवश्यक आहे.

**पर्यावरणीय आघाताचे वैज्ञानिक विश्लेषण**

प्रकल्पाचा सर्वात मोठा आणि अपरिवर्तनीय आघात हा किनाऱ्यालगतच्या परिसंस्थेवर (Coastal Ecosystem) होत आहे. समुद्रातील भराव (Reclamation) हा केवळ जमिनीचा तुकडा मिळवण्यापुरता मर्यादित नाही. या प्रक्रियेत, समुद्रातील 'इंटरटायडल झोन' (Intertidal Zone - खाजण क्षेत्र) कायमचा नष्ट होत आहे. हे क्षेत्र म्हणजे सागरी जीवसृष्टीचा पाळणाघरच (cradle of marine life) असते. येथेच अनेक प्रकारच्या व्यावसायिकदृष्ट्या महत्त्वाच्या मासळी, खेकडे आणि इतर जलचरांची अंडी, बीज आणि बाल्यावस्था अवलंबून असते. या क्षेत्राच्या विनाशाचा थेट परिणाम अन्नसाखळीवर (Food Web) होतो, ज्याचा पहिला फटका मच्छिमारांना बसतो.



याहून गंभीर बाब म्हणजे प्रकल्पाच्या अजस्त्र खांबांमुळे (Pillars) समुद्राच्या नैसर्गिक जलगतिकीमध्ये (Hydrodynamics) होणारा बदल. हे खांब पाण्याच्या नैसर्गिक प्रवाहांना अडथळा आणतात. यामुळे काही ठिकाणी प्रवाहाचा वेग वाढून समुद्राच्या तळाची जमीन (seabed) खरवडली जाते (scouring), तर काही ठिकाणी प्रवाह मंदावल्याने प्रचंड गाळ साचतो (siltation). या दोन्ही प्रक्रिया तळाशी राहणाऱ्या जीवसृष्टीसाठी (Benthic Ecosystem) अत्यंत विनाशकारी आहेत. प्रवाळांसारखे (Corals) संवेदनशील जीव आणि तळजीवी (benthic organisms) नष्ट झाल्याने मासळी त्यांच्या अधिवासातून आणि प्रजनन क्षेत्रातून कायमची स्थलांतरित होते. ही एक सरळ कार्य-कारण साखळी आहे, ज्याचा परिणाम टाटा सामाजिक विज्ञान संस्थेच्या (TISS) अभ्यासात नोंदवलेल्या ५०% पेक्षा जास्त उत्पन्नाच्या घटीमध्ये स्पष्ट दिसतो.

**अभियांत्रिकी त्रुटी आणि मानवी सुरक्षा**

कोस्टल रोडच्या खांबांमधील केवळ ६० मीटरचे अंतर ठेवणे, ही केवळ मच्छिमारांची अडचण नाही, तर ती एक गंभीर अभियांत्रिकी आणि सुरक्षात्मक त्रुटी आहे. समुद्राच्या लाटा आणि वाऱ्याच्या वेगाचा विचार करता, एवढ्या कमी अंतरातून मच्छिमारी बोटींची सुरक्षित वाहतूक (Safe Navigation) करणे अशक्य आहे. हा आराखडा बनवताना 'मानवी-केंद्रित डिझाइन' (Human-centric Design) आणि स्थानिक पारंपरिक ज्ञानाकडे (Traditional Ecological Knowledge) पूर्णपणे दुर्लक्ष झाल्याचे दिसते.

मुंबईचा विकास होत असताना, शहराच्या मूळ संरक्षकांना आणि सागरी पर्यावरणाच्या रक्षकांना (Custodians of the Marine Ecosystem) विकासाच्या प्रवाहाबाहेर फेकणे, हे केवळ अन्यायकारक नाही, तर ते अदूरदर्शीपणाचे लक्षण आहे. शासनाने आणि प्रशासनाने हे समजून घेण्याची गरज आहे की, हा लढा आता केवळ निवेदनांपुरता किंवा मागण्यांपुरता मर्यादित नाही.

आतापर्यंत शांततेत आणि वैज्ञानिक पुरावे सादर करून लढणारे हे हजारो मच्छीमार, ज्यांना आपण 'दर्याचे राजे' म्हणतो, ते जर एकवटले आणि त्यांनी आपल्या बोटी समुद्रात नांगरून आपला हक्क मागितला, तर काय परिस्थिती उद्भवेल? हा केवळ रोजीरोटीचा नाही, तर वैज्ञानिक सत्य, पारंपरिक ज्ञान आणि निसर्गासोबत जगण्याच्या हक्काचा, म्हणजेच अस्तित्वाचा लढा आहे. हा लढा दुर्लक्षिला गेल्यास त्याची किंमत केवळ मच्छिमारांनाच नव्हे, तर संपूर्ण मुंबईला मोजावी लागू शकते.

**लेखक : ॲड. रोहन वंदना उत्तम कोरडे,**
**वकील, मुंबई उच्च न्यायालय**
**८७७९५८३४८१**

## एमपीएससी परीक्षार्थ्यांसाठी 'केवायसी' प्रक्रिया बंधनकारक

**मुंबई, दि. २३ : प्रतिनिधी**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने (एमपीएससी) एक महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. आयोगाच्या ऑनलाइन अर्ज प्रणालीत कोणताही अर्ज करण्यापूर्वी उमेदवारांना 'केवायसी' प्रक्रिया पूर्ण करणे सक्तीचे करण्यात आले आहे, अशी माहिती एमपीएससीने दिली आहे. एमपीएससीने दिलेल्या माहितीनुसार, उमेदवारांना पुढील चारपैकी कोणत्याही एका पद्धतीने ओळख पडताळणी (केवायसी) करावी लागणार आहे: 1. आधार ऑनलाइन ई-केवायसी, 2. आधार ऑफलाइन पेपरलेस डिजिटल केवायसी, 3. आधार ऑफलाइन पेपर आधारित केवायसी, 4. नॉन-आधार ऑफलाइन केवायसी या चार पद्धतीने ओळख पडताळणी (केवायसी) करता येणार आहे. अर्ज करण्याआधीच ही केवायसी प्रक्रिया पूर्ण करणे बंधनकारक असेल. याशिवाय, एकदाच नोंदणी करताना उमेदवाराने आपला मोबाईल नंबर आणि ई-मेल आयडी प्रणालीत नोंदवणेही आवश्यक आहे. जर उमेदवाराने आधार आधारित पडताळणी निवडली, तर आधार क्रमांकाशी संलग्न मोबाईल नंबर असणे आवश्यक आहे. संदर्भाने, एमपीएससीने मार्च 2017 पासून ऑनलाइन प्रणालीत आधार क्रमांक नोंदविण्याची सुविधा उपलब्ध करून दिली होती. ही प्रणाली लागू केल्यामुळे उमेदवारांची ओळख अचूकरीत्या प्रमाणिकरण करता येणार असून, फसवणूक आणि चुकीच्या माहितीला आळा बसेल. विशेष म्हणजे, विशिष्ट ओळख प्राधिकरण आणि राज्य शासनाने एमपीएससीला अधिकृत मान्यता दिली असून, आता भरती प्रक्रिया आणि स्पर्धा परीक्षा यांच्या विविध टप्प्यांवर आधार प्रमाणीकरण वापरता येणार आहे.

## यशवंतराव चव्हाण फाउंडेशनचा पत्रकारिता पुरस्कार 2025 भीमराव धुळप यांना जाहीर

**मुंबई, दि. २३ : प्रतिनिधी**



ज्येष्ठ पत्रकार, सामाजिक बांधिलकी जपणारे संपादक आणि महाराष्ट्र शासन मान्यताप्राप्त पत्रकार श्री. भीमराव धुळप यांना यशवंतराव चव्हाण फाउंडेशनतर्फे पत्रकारिता आणि समाजसेवेसाठी दिला जाणारा सन २०२५ चा प्रतिष्ठेचा राज्यस्तरीय "यशवंतराव चव्हाण पुरस्कार" जाहीर करण्यात आला आहे. संस्थेचे अध्यक्ष संजय सावंत यांनी नुकतीच या पुरस्काराची निवड केली आहे. हा पुरस्कार १५ ऑगस्ट २०२५ रोजी नवी मुंबई येथे होणाऱ्या भव्य समारंभात मान्यवरांच्या उपस्थितीत प्रदान करण्यात येणार आहे. यशवंतराव चव्हाण फाउंडेशन ही संस्था मुंबईसह राज्याच्या ग्रामीण भागात आपल्या उल्लेखनीय कार्यामुळे प्रसिद्ध आहे. संस्थेने त्यांच्या पत्रकारितेतील योगदानाची दखल घेत त्यांना हा सन्मान बहाल केला आहे. या पुरस्कारामुळे पत्रकार भीमराव धुळप यांचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे.

# ज्येष्ठांनो, छळवाद विषयक कायदा समजून घ्या!-प्रमोद ढोकले

**मुंबई, दि. २३ : प्रतिनिधी**

ज्येष्ठांना छळवाद विषयक कायद्याची माहिती नसल्यामुळे वारंवार विविध घटना घडत आहेत. या करिता जेष्ठांनी जागृत राहुन जेष्ठ नागरिक छळवाद विषयक कायदा समजुन घेऊन सावध राहायला हवे,असे आवाहन विधी तज्ञ श्री प्रमोद ढोकले यांनी केले. १५ जून या ज्येष्ठ नागरिक छळ प्रतिबंधक जनजागृती दिनाच्या निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.महाराष्ट्र ज्येष्ठ नागरिक (फेस्कॉम)मुंबई ;प्रादेशिक विभागाने हा कार्यक्रम मुंबईतील डिलायल रोड येथील श्रमिक ज्येष्ठ नागरिक संघात आयोजित केला होता.

जेष्ठांचा मानसिक,शारिरीक , आर्थिक तसेच लैंगिक छळ याबद्दल समाजात चर्चा होत नाही. तसेच असे अत्याचार, त्यांची माहिती दडपली जाते. कारण समाज वस्तुस्थिती ऐकायला तयार नसतो. फसवणूक ,पिळवणूक होते म्हणून पोलीसात तक्रार




करावयाची म्हटले तर ,"हा घरचा मामला आहे" असे म्हणून याकडे पोलीस दुर्लक्ष करतात. पण सन 2007 चा हा कायदा काय सांगतो याची आठवण करून देताना एक ना अनेक ज्येष्ठांची होणारी छळवणूक या विषयावर त्यांनी सोदाहरण सविस्तर माहिती दिली. आपल्या 'प्रॉपर्टी मधील हिस्सा / वाद कसा मिटवावा किंवा ज्येष्ठाच्या इच्छेप्रमाणे दानपत्र, इच्छापत्र कायदेशीर कसे करावे यावर मार्गदर्शन करून त्यांनी सर्व जेष्ठ नागरिक संघटनानी जेष्ठांच्या कायदयाचा अभ्यास करुन त्याची अधिकाधिक जनजागृती केल्यास जेष्ठांचा छळ कमी होण्यास नक्कीच मदत होईल,अशी अपेक्षा व्यक्त केली.यानंतर त्यांनी जेष्ठ नागरिकांच्या शंकांचे समाधानही केले.

यावेळी बोलताना ना. म. जोशी मार्गचे वरिष्ठ पोलीस अधिकारी श्री अरविंद चंदनशिवे पोलीस दल ज्येष्ठांच्या मदती साठी तत्पर असल्याची ग्वाही दिली. प्रारंभी मुंबई विभाग अध्यक्ष श्री. सुरेश पोटे यांनी स्वागत करून ज्येष्ठ नागरिक छळ कायद्याची जनजागृती होणे कसे गरजेचे आहे हे सांगितले. सचिव मुकुंद फडतरे यांनी प्रास्ताविक करून सूत्र संचलनही केले.कार्यकारिणी सदस्य श्री दिलीप गाडेकर यांनी आभार मानले. या कार्यक्रमास फेस्कॉमचे पदाधिकारी,ज्येष्ठ स्त्री पुरुष नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## प्रत्येक शहरातून, गावातून ऑलिम्पिकवीर तयार झाले पाहिजे - क्रीडामंत्री दत्तात्रय भरणे

**पुणे, दि. २३ : प्रतिनिधी**

प्रत्येक शहरातून, गावातून जास्तीतजास्त ऑलिम्पिकवीर तयार झाले पाहिजे, आगामी २०२८, २०३२ मधील ऑलिम्पिकमध्ये भारताला जास्तीत जास्त पदके मिळतील व या यशात महाराष्ट्राचा मोठा वाटा असेल असे प्रतिपादन राज्याचे क्रीडा व युवक कल्याण मंत्री दत्तात्रय भरणे यांनी पुण्यातील ऑलिम्पिक दिनाच्या समारंभात केले. राज्यात आज ऑलिम्पिक दौड, खेळाडूंचा गौरव व क्रीडा प्रात्यक्षिकांने क्रीडामय वातावरणात ऑलिम्पिक दिन साजरा करण्यात आला.

महाराष्ट्र ऑलिम्पिक संघटना, क्रीडा व युवक सेवा संचालनालय आणि सर परशुराम महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमानेआयोजित ऑलिम्पिक दिन समारंभात ऑलिम्पिकपटू व अर्जून पुरस्कार खेळाडूंना गौरव करण्यात आला. क्रीडा व युवक कल्याण मंत्री दत्तात्रय भरणे यांच्या हस्ते ऑलिम्पिकपटू रेखा भिडे, मनोज पिंगळे, अर्जून पुरस्कार प्राप्त शंकुतला खटावकर, श्रीरंग ईनामदार, शांताराम जाधव, प्रदिप गंधे, स्मिता यादव, ऑलिम्पिक पत्रकार संजय दुधाणे, युवा खेळाडू गायत्री शिंदे, गाथा खडके यांचा शाल, सन्मानचिन्ह, पुष्पगुच्छ देऊन गौरव करण्यात आले. या प्रसंगी क्रीडा व युवक कल्याण विभागाच्या आयुक्त शीतल तेली-



उगले, सहसचांलक सुधीर मोरे, उपसंचालक उदय जोशी, सुहास पाटील, युवराज नाईक, सर परशुराम महाविद्यालय प्राचार्य डॉ. सुनील गायकवाड, महाराष्ट्र ऑलिम्पिक संघटनेचे महासचिव नामदेव शिरगांवकर, जिल्हा क्रीडाधिकारी जगन्नाथ लकडे, धनंजय भोसले आदी मान्यवर उपस्थित होते.

ऑलिम्पिक दिनानिमित्त सकाळी ८ वाजता ऑलिम्पिक दौड काढण्यात आली. ऐतिहासिक लाल महाल येथे क्रीडा ज्योत प्रज्वलीत करून दौड सुरू करण्यात आली. दौडीस शालेय विदयार्थ्यांना मोठा प्रतिसाद लाभला. सायकलिंग व स्केटिंगपटूंही दौडीत सहभागी झाले होते. एनसीसीच्या शालेय बॅन्ड पथकाच्या निनादात क्रीडा मंत्री दत्तात्रय भरणे यांनी दौडीचे स्वागत केले. शिव छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळयास पुष्पहार अर्पण केल्यानंतर लेडी रमाबाई सभागृहामध्ये ऑलिम्पिकवीर खाशाबा जाधव यांच्या प्रतिमेला अभिवादन करून मुख्य समारंभ रंगला. मल्लखांब, योगा, जिम्नॅस्टिक, तायक्वांदो, किकबॉक्सिंग, स्केटिंग ड्रान्स व मर्दानी खेळाचे प्रात्यक्षिकांनी उपस्थितींची मने जिंकली.

खेळाडूंच्या गौरव समारंभानंतर राज्याचे क्रीडा व युवक कल्याण मंत्री दत्तात्रय भरणे, क्रीडा आयुक्त शीतल तेली-उगले यांची मनोगते झाली. खेळाडुंना पाठबळ देण्यासाठी राज्य सरकारने चांगले निर्णय घेतले आहे. क्रीडाखात्याने १४९ जणांना शासकीय नोकरी दिली आहे असे सांगून राज्याचे क्रीडा व युवक कल्याण मंत्री दत्तात्रय (मामा) भरणे पुढे म्हणाले की राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावर महाराष्ट्राच्या खेळाडुंनी पदके जिंकण्यासाठी राज्याचा क्रीडामंत्री म्हणून मी तुमच्या पाठीशी खंबीरपणे उभा आहे.

महाराष्ट्रात अनेक गुणवान खेळाडू आहे. त्याचे प्रतिबिंब आपल्या पदकतालिकेत दिसले पाहिजे असे सांगून क्रीडा आयुक्त शीतल तेली-उगले यांनी सांगितले की, तळागळातून खेळाडू शोधण्यासाठी आपल्या योजना सुरू आहेत. विकसीत महाराष्ट्र २०४७ यासाठी क्रीडा क्षेत्राचे धोरण निर्माण होत आहे, यासाठी खेळाडूंसह क्रीडा क्षेत्रातील सर्वांनीच गुगल फार्मवर आपल्या सूचना मांडा. या सूचनांचे आम्ही स्वागत करू. कार्यक्रमाचे प्रास्ताविक नामदेव शिरगांवकर यांनी केले तर आभार प्रदिप गंधे यांनी मानले.

## माणुसकीला काळिमा! कॅन्सर झालेल्या आजीला नातवाने फेकले सडलेल्या कचऱ्यात

**मुंबई, दि. २३ : प्रतिनिधी**

माणुसकीला आणि कौटुंबिक नात्यांना काळिमा फासणारी धक्कादायक घटना मुंबईत समोर आली आहे. त्वचेच्या कर्करोगाने ग्रस्त असलेल्या एका वृद्ध महिलेला तिच्याच नातवाने सडलेल्या कचऱ्याच्या ढिगाऱ्यात फेकून दिले होते. पोलिसांनी माणुसकी दाखवत तिला रूग्णालयात दाखल केले आहे.

शनिवारी सकाळी ८.३० च्या सुमारास आरे कॉलनीतील युनिट क्रमांक ३२ कडे जाणाऱ्या रस्त्यावरील कचऱ्याच्या ढिगाऱ्यावर वृद्ध महिला सापडली. याबाबत पोलीस नियंत्रण कक्षाला माहिती मिळताच आरे पोलीस ठाण्याचे पथक घटनास्थळी पोहोचले. तिथे त्यांना ६० ते ७० वयोगटातील एक महिला गुलाबी नाईटड्रेसमध्ये कचऱ्याच्या ढिगाऱ्यात असहाय्य अवस्थेत पडलेली दिसली. तिच्या चेहऱ्यावर त्वचेच्या गंभीर कर्करोगामुळे झालेली एक मोठी जखम होती, जी चिघळली होती. तिच्या गालाला आणि नाकाला पूर्णपणे संसर्ग झाला होता. तिची अवस्था पाहून पोलीस अधिकारीही सुन्न झाले.

पोलीस हवालदार राठोड आणि महिला पोलीस शिपाई निकिता कोळेकर यांनी तातडीने त्या वृद्ध महिलेला पोलीस व्हॅनमध्ये बसवून जोगेश्वरी येथील ट्रॉमा केअर रुग्णालयात नेले. मात्र, तिथे सुविधा नसल्याचे कारण देत रुग्णालयाने त्यांना दाखल करून घेण्यास नकार दिला. त्यानंतर पोलिसांनी तिला कूपर रुग्णालयात नेले, जिथे डॉक्टरांनी केवळ वरवरची तपासणी करून अधिक सुसज्ज रुग्णालयात नेण्याचा सल्ला दिला. एकीकडे महिलेची प्रकृती अधिकच खालावत होती आणि दुसरीकडे कोणतेही रुग्णालय तिला दाखल करून घ्यायला तयार नव्हते. पोलिसांनी आपले प्रयत्न सुरूच ठेवले. तब्बल आठ तासांनंतर, सायंकाळी ५.३० च्या सुमारास, कूपर रुग्णालयाने तिला दाखल करून घेतले. वरिष्ठ पोलीस निरीक्षक रवींद्र पाटील यांनी स्वतः रुग्णालयाच्या कर्मचाऱ्यांशी संवाद साधला, तर दोन्ही पोलीस शिपाई त्या वृद्ध महिलेसोबत थांबून होते.

त्या महिलेने आपले नाव यशोदा गायकवाड असे सांगितले. तिने पोलिसांना सांगितले की, मालाडमध्ये आपल्या नातवासोबत ती राहत होती. नातवानेच तिला सकाळी आरेमध्ये आणून कचऱ्याच्या ढिगाऱ्याशेजारी फेकून दिले. आरे पोलीस ठाण्यातील एका अधिकाऱ्याने सांगितले, "आम्हाला फोनवरून माहिती मिळताच आमचे पथक घटनास्थळी पोहोचले. तिची प्रकृती चिंताजनक होती. पण त्यानंतर जे घडले ते अधिक धक्कादायक होते; रुग्णालये उपचारासाठी दाखल करून घेत नव्हतीत. जर पोलीस एका अनोळखी व्यक्तीसाठी इतकी कटिबद्धता दाखवू शकतात, तर सरकारी रुग्णालये थोडी माणुसकी का दाखवू शकत नाहीत?"

यशोदा यांनी पोलिसांना मालाड आणि कांदिवली येथील दोन पत्ते दिले. पोलीस पथकांनी दोन्ही ठिकाणी जाऊन चौकशी केली, परंतु कोणीही त्यांची ओळख पटवू शकले नाही. तिच्या कुटुंबीयांचा शोध घेण्यासाठी तिचा फोटो मुंबईतील सर्व पोलीस ठाण्यांमध्ये पाठवण्यात आला आहे. तिला तेथे कसे आणले गेले, हे शोधण्यासाठी पोलीस आरे जवळील सीसीटीव्ही फुटेज तपासत आहेत. मात्र, कचऱ्याच्या ढिगाऱ्याजवळ कोणताही कॅमेरा नाही. वरिष्ठ पोलीस निरीक्षक रवींद्र पाटील म्हणाले, "आम्ही त्यांच्या नातेवाईकांना शोधण्याचा प्रयत्न करत आहोत. पण अद्याप माहिती मिळालेली नाही.


**महाराष्ट्र शासन**
**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,**
**मध्य मुंबई (सा.बां.) विभाग, गणपत जाधव मार्ग, वरळी, मुंबई ४०० ०१८.**

| Email: centralmambai.ee@mahapwd.gov.in | ४९३६४०४/२४९३१९०२ फॅक्स |
| --- | --- |
| जा.क्र.का.अ./ममुंवि/ई-निविदा/२७३७ | दिनांक :- २०/०६/२०२५ |

**निविदा सूचना १३ (तेरा) (सन २०२५-२६)**

कार्यकारी अभियंता, मध्य मुंबई (सा.बां.) विभाग, वरळी, मुंबई कार्यालयोन दूरध्वनी क्रमांक २४९३१९०२/२४९३६४०४ महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडे योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदारांकडून खालील कामाकरीता "बी-१" नमुन्यातील निविदा मागवित आहेत. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, मध्य मुंबई (सा.बां.) विभाग, वरळी, मुंबई यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ. क्र. | कामाचे नाव | रक्कम (लाखात) |
| --- | --- | --- |
| १ | माटुंगा पोलिस स्टेशन कंपाऊंड येथील लॉकआप इमारत, किंग सर्कल, माटुंगा येथील रेशनिंग ऑफिस, दादर रेल्वे पोलिस कंपाऊंड येथील एसआयडी प्रशिक्षण केंद्र, दादर गोखले रोड येथील एसआरपीएफ बॅरेक क्रमांक १ व २ दादर, मुंबई या इमारतीमधील वार्षिक देखभाल दुरुस्तीची कामे करणे. | ७.२७ |
| २ | नाटुंगा येथील एसीपी ऑफिस माटुंगा, माटुंगा पोलिस स्टेशन, माटुंगा, प्रभादेवी दादर येथील नवीन आयटीआय इमारत या इमारतीमधील वार्षिक देखभाल दुरुस्तीची कामे करणे. | ८.१२ |
| ३ | माहीम मुंबई येथील माहीम पोलिस स्टेशन कॅम्पसमधील नवीन पोलिस कॉलनी इमारत क्रमांक १९ या इमारतीमधील वार्षिक देखभाल दुरुस्तीची कामे करणे. | ८.४३ |
| ४ | माटुंगा मुंबई येथील डी एस आय एस कॅम्पसमधील अधीक्षक बंगलो, सब ओव्हरसीअर्स क्वार्टर्स, सर्व्हट क्वार्टर्स, स्टाफ व सफाई कामगार क्वार्टर्स या इमारतीमधील वार्षिक देखभाल दुरुस्तीची कामे करणे. | ५.२६ |
| ५ | माहीम मुंबई येथील माहीम पोलिस स्टेशन कॅम्पसमधीत नवीन पोलिस कॉलनी इमारत क्रमांक या इमारतींमधील वार्षिक देखभाल दुरुस्तीची कामे करणे. | ८.४१ |
| ६ | माहीम मुंबई येथील माहीम पोलिस स्टेशन कॅम्पसमधील नवीन पोलिस कॉलनी इमारत क्रमांक या इमारतीमधील वार्षिक देखभाल दुरुस्तीची कामे करणे. | ८.३८ |
| ७ | माहीम मुंबई येथील माहीम पोलिस स्टेशन कैम्पसमधील नवीन पोलिस कॉलनी इमारत क्रमांक १० या इमारतीमधील वार्षिक देखभाल दुरुस्तीची कामे करणे. | ८.४१ |
| ८ | माहीम मुंबई येथील माहीम पोलिस स्टेशन कॅम्पसमधील नवीन पोलिस कॉलनी इमारत क्रमांक १० या इमारतीमधील वार्षिक देखभाल दुरुस्तीची कामे करणे. | ८.४२ |
| ९ | माहीम मुंबई येथील माहीम पोलिस स्टेशन कॅम्पसमधील नवीन पोलिस कॉलनी इमारत क्रमांक १८ या इमारतीमधील वार्षिक देखभाल दुरुस्तीची कामे करणे. | ८.४१ |
| १० | माहीम मुंबई येथील माहीम पोलिस स्टेशन कॅम्पसमधील नवीन पोलिस कॉलनी इमारत क्रमांक १९ या इमारतीमधील वार्षिक देखभाल दुरुस्तीची कामे करणे. | ८.३८ |
| ११ | माहीम मुंबई येथील माहीम पोलिस स्टेशन कॅम्पसमधील कादरी चाळ आणि १० पोलिस उपनिरीक्षक निवासस्थान था इमारतीमधील वार्षिक देखभाल दुरुस्तीची कामे करणे. | ५.१४ |
| १२ | नायगाव मुंबई येथील जुनी पोलिस लाईनमधील सहजीवन इमारतीची, ६ आणि ३ जमादार क्वार्टर्सची वार्षिक देखभाल दुरुस्तीची कामे करणे. | ७.४४ |
| १३ | नायगाव मुंबई येथील जुनी पोलिस लाईनमधील ८ व ३२ पोलीस उपनिरीक्षक क्वार्टर्सची वार्षिक देखभाल दुरुस्तीची कामे करणे. | ८.६७ |
| १४ | नायगाव मुंबई येथील भोईवाडा पोलिस स्टेशन, सी आय डी ऑफिस आणि एस आर पी एफ बॅरेक, नवीन पोलिस लाईन, पोलिस उप रुग्णालय इमारत, ब्राउनिंग शॉप शूटिंग रेंज इमारत, अतिरिक्त पोलिस आयुक्त कार्यालय इमारत, एल ए १ पोलिस मुख्यालय इमारत, शस्त्रागार इमारत भोईवाडा, शस्त्रागार इमारत आणि वर्कशॉप इमारत, बॅडमन ऑफिस इमारत आणि चौकी ची वार्षिक देखभाल दुरुस्तीची कामे करणे. | ८.९४ |
| १५ | भोईवाडा नायगाव, मुंबई येथील लॉक अप बिल्डिंग, एसआरपीएफ बॅरेक, नवीन पोलिस लाईन, मेस आणि कॅन्टीन बिल्डिंग, जुनी पोलिस लाईन, पोलिस वर्कशॉप बिल्डिंग, अतिरिक्त पोलिस लॉक-अप बिल्डिंगची वार्षिक देखभाल दुरुस्तीची कामे करणे. | ७.४७ |
| १६ | मुंबईतील माटुंगा येथील डी एस आय एस कॅम्पसमधील डॉरमेटरी इमारत क्रमांक २ चे स्ट्रक्चरल ऑडिट करणे. | ०.९९ |
| १७ | हाफकिन संस्था, परळ, मुंबई आवारातील जुनी केमीकल प्लांट व नवीन प्राणीगृह इमारतीची वार्षिक दैनदिन देखभाल दुरूस्ती करणे. | ८.४४ |
| १८ | हाफकिन संस्था, परळ, मुंबई आवारातील केमोथेरपी विभाग, नवीन वर्कशॉप इभारत (मार्केटीग विभाग), केमिकल गोडाऊन, स्टोअर फॉर इन्फलामेबल मटेरीयल, नवीन गोडाऊन, जनरल स्टोअर इमारत, जिमखाना इमारत, अँटी टॉक्सीन इमारत, अकाऊंट ब्रांच मुख्य इमारत व शिप शेड (नवीन कंटींग) इमारतीची वार्षिक दैनंदिन देखभाल दुरूस्ती करणे. | ७.२६ |
| १९ | हाफकिन संस्था, परळ, मुंबई आवारातील २ रा डायरेक्टर बंगला, ५ सर्जन बंगला, १ ले असिस्टंट बंगला, चाळ नं.१ व २ सव्हेट क्वॉर्टर्स, १ ला असिस्टंट व २ रा मेडीकल ऑफीसर बंगला, स्टाफ क्वॉर्टर्स डायरेक्टर व पोस्ट ऑफीस करोता, १ ला असिस्टंट बंगला, टेकनिकल क्वॉटर्स, एस. ए. एस. ऑफीसर्स क्वॅर्टर्स, पेटो व मेडीकल ऑफीसर बंगला यांची वार्षिक दैनदिन देखभाल दुरूस्ती करणे. | ६.५४ |
| २० | बॉडीगार्ड पोलिस वसाहत, २ सब इंन्स्पेक्टर क्वॅार्टर्स गंगाबावडी पोलिस स्थानक वसाहत डॉकयार्ड रोड, बाटलीवाला चाळ, ओव्हरसीअर्स क्वॅार्टर्स, माझगांव, मंबई याची वार्षिक दैनदिन देखभाल दुरूस्ती करणे. | ७.०९ |
| २१ | काळाचौकी पोलिस वसाहत, काळाचौकी, मुंबई येथील निवासी इमारत क.ब व क ची वार्षिक दैनंदिन देखभाल दुरूस्ती करणे. | ७.८३ |

| ई-निविदा उपलब्ध कालावधी | दि.२४/०६/२०२५, सकाळी १५.०० पासून ते वि.०१/०७/२०२५ रोजी १५.०० पर्यंत |
| --- | --- |
| निविदा उघडणे (शक्य झाल्यास) | दि.०२/०७/२०२५ रोजी १५.०० वाजता (कार्यकारी अभियंता, मध्य मुंबई (सा.बां) विभाग, यांचे कार्यालय, गणपत जाधव मार्ग, वरळी, मुंबई |

**डी.जी.आय.पी.आर.आरओसी २०२५-२६/क्र-५/C१३२०**

**सही/-**
**कार्यकारी अभियंता,**
**मध्य मुंबई (सा.बां.) विभाग, वरळी, मुंबई.**

# अरण्य योगी दादा चितमपल्ली

**कोणतीही साहित्यिक विधा असो, कोणत्याही प्रकारची विद्या असो, कसल्याही प्रकारचे संशोधन असो, त्याच्या प्रारंभापासूनच एका परंपरेची निर्मिती होत असते. साधारणत: ती परंपरा निर्बंधित, स्वत:च स्वत:ला जोपसणारी असते. युगा-युगापासून ज्ञानाच्या परंपरेची ही अटूट श्रृंखला आपापल्या विधेत, समाजहितकारी कार्य करीत असते. फक्त परंपरा जोपासणा?याचे नाव बदलत असते, जसे आमचे दादा चितमपल्ली !**

---------------

**■ कौशल मिश्र**
**वर्धा.**

---------------

अरण्य ऋषी दादा मारुती चितमपल्ली, वैदिक काळातील वने, वन्य प्राणी व प्राचीन काळात त्यांचे रीतसर वैज्ञानिक अध्ययन करण्याकरिता वनातच राहणारे ऋषी मुनी यांच्या परंपरेचा या आधुनिक युगात, प्रतिनिधित्व करीत आहेत.

पालकाप्य मुनि शातकर्णी ऋषी, वराहमिहीर, हँसदेव जैन मुनी, डल्हनाचार्य या विभूतीचा वारसा त्यांना लाभला आहे व त्यांच्या संपूर्ण लेखनात, वाणीत, स्वभावात, आहारात, कोणीही भावनाशील व्यक्ती प्राचीन ऋषी मुनींशी त्यांची तुलना आपोआपच करायला लागत असे, हे मी स्वतः कित्येक वेळा पाहिले आहे.

वन्य जीवनाशी समरस होऊन मृदुल भावना जोपासणे व सातत्याने पन्नास वर्ष समाजहिताकरीता निसगार्शी नवीन पीढी जोडण्याकरीता लेखन करीत राहणे या काळात अश्यक्यच आहे. परंतु दादांच्या तपस्वी व निसर्ग अर्पित स्वभावामुळे दुश्वार कार्य शक्य झाले.

दादांचे संपूर्ण साहित्य वन आत्मा व आत्मियतेचे प्रतीक आहे आणि मराठी भाषेला गौरवान्वित करणारी आहे. जंगलाशी त्यांचे नाते, स्नेहबंध अभूतपूर्व स्वरुपात त्यांच्या प्रत्येक कथेत झळकते.

पाच भाषा बोलणा?या दादांचे शहर सोलापूर ही जन्मस्थळी. परंतु वनविभागात नोकरीच्या निमित्ताने 50 वर्षे विदर्भातच त्यांचा निवास राहिला. यात दुमत असायला नकोच की इंग्रजी वन्य साहित्य क्षेत्रात काही उत्कृष्ट वन साहित्य उपलब्धआहे. प्रकृती संवर्धन क्षेत्रात, साहित्य निर्मितीद्वारे आपले योगदान देणारे ते लेखक गण वारंवार अभिनंदनाचे पात्र आहेत.

परंतु दादांसारख्या जीवनातील प्रदीर्घ कालखंड वने, वृक्ष, वन्यजीवन यांच्या सानिध्यात व त्यांच्या वैज्ञानिक विवेचनेत समर्पक भाव ठेवून कार्य करणारे संपूर्ण देशात क्वचितच मिळतील.

वनविभागाच्या सेवेत राहून दादांद्वारे भावूक, प्रेमळ व प्रेरणास्पद साहित्याची रचना करणे अद्वितीय कार्याच्या श्रेणीत ठेवण्यात येईल. जन्मापासून व समज आल्यानंतर वनाशी मी स्वतः संबंधित आहे व मला स्वेच्छापूर्वक जाणीव आहे की, साहित्य रचना, कोमल भावनांची जोपासना करण्याकरीता येथे वाट फारच अरुंद आहे.

दादा चितमपल्ली यांनी आपल्या साहित्यात, गोंदिया, भंडारा, अमरावती, यवतमाळ, चंद्रपूर व गडचिरोली भागातील मराठी भाषेतील प्रयुक्त बोलीभाषेतील अभूतपूर्व 1,00,00 शब्दांचा प्रयोग केला आहे. त्यांची सर्व पुस्तके मिळून एक अत्यंत उपयोगी मराठी बोलीभाषेचा शब्दकोष उदयास आला आहे. त्यांचे संपूर्ण साहित्याचे पठन केल्यानंतर कोणत्याही रसिक पाठकाच्या या विलक्षण शब्दांचा संसार लक्षात येणारच.

पुणे संस्कृत महाविद्यालय व कवि कालीदास संस्कृत विद्यापीठाचे विद्यार्थी राहिलेले दादा, संस्कृत भाषेचे अध्येता व पाली भाषा, हिंदी, इंग्रजी वन्य साहित्याच्या सर्व पुस्तकाचे अध्ययेता होते. अरण्य ऋषि यांनी लिहीलेले संपूर्ण साहित्य अरण्य अंतरंगतेचा दीर्घ प्रवास आहे व त्यांचा संत स्वभाव, अपरिग्रह हे जंगलांच देणं त्यांना आहे.

आषाढ सरीचा सागवान वृक्षाच्या मोठ्या सळसळीत पानावर पडणाऱ्या पावसाच्या थेंबाची अभूतपूर्व संगीत



रचना मानव विरहीत अरण्यात असणाऱ्या देवालयाची भग्नावस्था, गणित पणार्चे रुदन व नवपल्लवित पानांची सुकुमार भाषा देवांनीच माणसाला दिलेल्या करुणा व उल्हास व त्यातून अंकुरीत अरण्याचा साक्षात्कार पाहण्याकरीता अख्खे जीवन अरण्य अंतरंग राहावे लागते, दादांसारखी तपस्या करावी लागते. त्यांच्या तपाचे परिणाम, त्यांच्या संपूर्ण साहित्यात उकेरलेले आहे.

नवेगाव अभयारण्याच्या प्रारंभिक अवस्थेत अभयारण्य विकसित करण्यात दादांचा अमोल वाटा आहे. तसे पाहिले तर तो त्यांच्या मेहनत, कार्यक्षमता, शिस्तबद्ध आकलनाचा परिणाम आहे की आज हजारोंच्या संख्येत स्थलांतरीत पक्षी तेथे येतात.

दादांच्या रानवाटा, पक्षी जाये दिगंतरा, घरट्या पलीकडे, नवेगाव बांधचे दिवस, जंगलाचं देणं या पुस्तकाना उच्चस्तरीय पुरस्कारांद्वारे सन्मानित करण्यात आले. राज्यात दादांचा एक विशिष्ट पाठक वर्ग आहे व नवीन पीढीने, निसर्ग, वन्यजीवन, वन्यप्राणी पक्षी, वने याच्याशी परिचित व्हावे, त्यांचे रक्षण करावे, हाच त्यांचा आग्रह असे.

दादांनी लिहीलेल्या चकवा चांदण आत्मवृत्तांतात, सोलापूर येथे जन्म झाल्यानंतर थेट त्यांचे प्रिय मित्र माधवरावजी पाटील यांच्या पर्यंत दादा चितमपल्ली यांनी भोगलेल्या यथार्थ व सृजनतेचे प्रतीबिंब आहे. शासकीय नोकरीत अत्यंत कर्तव्यदक्षता, श्रमसाध्यता, इमानदारी बाळगून उत्तम कार्य करण्यात कधी-कधी किती नरकीय यातना भोगाव्या लागतात याचे यथार्थ चित्रण या ग्रंथात अदभूत स्वरुपात वर्णन करण्यात आले आहे.

याबाबतीत दादा सर्वांचा आदर करतांना लिहितात, सुज्ञ व दुष्ट प्रवृत्तीच्या माणसाचा हा संघर्ष सनातन आहे, चांगल्या माणसाचे अनेक प्रकार असू शकतात, परंतु दुष्ट माणसंही सर्वकाळ सारखीच असतात. स्वप्नसृष्टीचे अतीरंजीत लालित्य या पुस्तकात नाही. अपीतु अरण्यात दडलेला ईश्वरकृपेचा बोध घेऊन अत्यंत सहजतेने जीवन व जंगल याची मार्मिकता, उल्हास शब्दात उकेरण्यात आला आहे.

चकवा चांदण भिन्न भिन्न स्थितीत परिस्थितकीय मानवीय व्यवहारात उद्भवलेल्या भावनांचे जीवनात समायोजन कशाप्रकारे करता येऊ शकते व मानवीय स्वभावात असलेली सहजतेची दुर्बोधता कशाप्रकारे अंगीकार करावी लागते या भावाचा अमोल दस्तावेज आहे. दादा पक्षी व पक्षी स्थलांतरणाचे वरिष्ठ ज्ञाता होते.

त्यांनी लिहिलेला पक्षी शास्त्र ग्रंथ पक्षी मित्रांकरिता वरदानस्वरुप आहे. तृणमोर पक्षी शोधण्यात त्यांना यश आले होते. रानकुत्र्यांवरील त्यांचे संशोधन, आज या विषयावरील संशोधनकर्त्याकरीता, विद्यार्थ्यांकरीता दादांची अप्रतीम देणगी आहे.

डॉ. सलीम अली, प्रसिद्ध चित्रकार आलमनेरकर, प्रसिद्ध लेखक पु.ल. देशपांडे, बाबा आमटे, माडगुळकर दादांचे परम मित्र. या सर्व थोर पुरुषांचा दादांसोबत परम स्नेह होता.

दादा जीवनातील दारुण प्रसंगावर मात देत 93 वर्षांच्या वयात साहित्य सृजनात अविरत साहित्य साधनेत मग्न होते. प्रचार विरहित स्थितप्रज्ञता कशी असते याचा सहज बोध त्याच्यात होतो. दुष्काळ असो किंवा असहनीय उन्हाळा असो, नदीचा प्रवाह ओसरेल, संथ होईल, नजरेस येणार नाही. परंतु शेकडों वर्ष प्रवाहाची अंतीम परिणितीत पाण्याचे मूळतत्व तसेच असते, अदृश्य. प्रत्येक पावसाळा नवीन जलप्रवाह घेऊन येतो, परंतु त्या नवीन प्रवाहाला मूळतत्त्वाशी शाश्वत विलीनीकरण परंपरेचे अनुगमन करावेच लागते. आमचे दादा आरण्य साहित्याचे मूळतत्त्व होते.

साहित्य सृजनाच्या प्रत्येक क्षेत्रात हेच घडत असते. कोणतेही साहित्य असो, विधान असो, त्यात मूळतत्त्व चिरंतन असते, अक्षुण राहते. त्या-त्या विधेतील मूळतत्त्वाचा पारंपारिक आधार घेऊनच साहित्य प्रवाहाचा पुढील प्रवास सुरु असतो. सर्व नदी आणि ओढ्यांची अपार जलराशी समुद्र आणि वृहद नद्या यांना येऊन मिसळते. समुद्र आणि मोठ्या नद्या नम्रनत (खालील भागात) असतात, हेच त्यांच्या श्रेष्ठत्वाचे प्रमाण नाही का? आम्हा सर्वांकरीता तर अरण्य ऋषी दादा चितमपली, संत ज्ञानदेव महाराजांच्या ओवी स्वरुपच आहेत.

। अविद्ये काळवंखे ।
की सुबोध सुदिने फांके ।
सितले प्रसादाकें। जया चेनि ।।

ज्याच्या शीतल प्रकाशामुळे अविद्यासम तिमीर नष्ट पावते आणि आत्मबोधरुपी सुदिवसाचा उदय होऊन संपूर्ण ज्ञानमय प्रकाश सर्वत्र पसरतो.

■ ■ ■

# विधवा भगिनींचा आवाज बुलंद व्हावा!

**आज सशस्त्र संघर्ष, विस्थापन आणि स्थलांतर आणि कोविड-19 साथीच्या आजारामुळे हजारो स्त्रिया नव्याने विधवा झाल्या आहेत आणि इतर अनेक ज्यांचे जीवनसाथी हरवले आहेत किंवा गायब झाले आहेत. विधवांचे अनोखे अनुभव आणि गरजा समोर आणल्या पाहिजेत, त्यांच्यासोबत मार्ग दाखवणारे आवाज बुलंद केले पाहिजेत. भारतात स्त्रियांना पुरुषाच्या बरोबरीने समान दर्जा देण्यासाठी अनेक संघटना आणि समाजसुधारक कार्य करत आहेत. मात्र भारतातील विधवांच्या प्रश्नाकडे डोळेझाक करण्यात येत असल्याचा आरोप होत राहतो. विधवांना त्यांचे हक्क आणि न्याय मिळवून देण्यासाठी संयुक्त राष्ट्र संघाच्या वतीने २३ जून हा दिन आंतरराष्ट्रीय विधवा दिन म्हणून साजरा करण्यात येतो. तेव्हा जाणून घेऊया काय आहे विधवा दिनाचा इतिहास, महत्व आणि उद्देश याबाबतची माहिती.**

---------------

कोणत्याही स्त्रिला आपल्या जोडीदार निवडण्याचा अधिकार आहे. मात्र काही कारणास्तव त्यांचा जोडीदार गमावल्याने अशा महिलांना एकाकी आयुष्य जगावे लागते. त्यामुळे विधवा महिलांचे प्रश्न मोठे भयंकर आहेत. विधवा महिलांचा प्रश्न फक्त भारतातच नाही, तर जगभरात गंभीर होत चालला आहे.

त्यासाठी गेल्या सात वषार्पासून यूकेची लूम्बा फाउंडेशन ही संस्था जगभरातील विधवा महिलांवर होणाऱ्या अत्याचाराविरोधात संयुक्त राष्ट्रांमध्ये मोहीम राबवत आहे. विधवांचे प्रश्न बिकट झाल्याने संयुक्त राष्ट्र संघाने २३ जून हा दिवस आंतरराष्ट्रीय विधवा दिन म्हणून साजरा करण्यात येतो.

जागतिक पातळीवर विधवा महिलांचे प्रश्न भयंकर असल्याने संयुक्त राष्ट्राने २३ जून हा आंतरराष्ट्रीय विधवा दिन साजरा करण्याचे जाहीर केले. त्यानुसार दरवर्षी विधवा दिनाचे औचित्य साधून या दिवशी विधवा महिलांच्या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी प्रयत्न करण्यात येतात. जगभरातील विधवा महिलांची स्थिती सुधारावी, त्यांना इतर महिलांसारखे सामान्य जीवन जगता यावे यासाठी जागतिक पातळीवर प्रयत्न करण्यात येतात.

इतर सामान्य महिलांसारखे त्यांना समान हक्क मिळण्यासाठी संयुक्त राष्ट्र संघ प्रयत्न करते. मात्र आपण कितीही प्रगत झालो, तरी विधवा महिलांकडे पाहण्याचा आपला दृष्टीकोन बदलत नाही.

जागतिकीकृत पातळीवर विधवा महिलांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागतो. पती नसल्याने कुटूंब त्यांच्याकडे विशेष लक्ष देत नाही. तर कधी विधवा महिलांना वा?यावर सोडले जाते.

यामुळे जगभरातील लाखो विधवा महिला गरिबी, हिंसाचार, बहिष्कार, बेघरपणा, आजारी आणि समाजातील भेदभाव सहन करतात. विधवाविवाहास आपण सर्वपरीने प्रोत्साहन आणि आटोकाट प्रयत्न केले पाहिजे. जगभरातील ११५ दशलक्ष विधवांना गरिबीत जगण्यास भाग पाडले जाते. तर ८१ दशलक्ष महिलांना शारीरिक शोषणाचा सामना करावा लागत असल्याचे विविध अहवालातून स्पष्ट झाले आहे.

जागतिक पातळीवर विधवा महिलांच्या न्याय हक्काचा प्रश्न गंभीर झाला आहे. त्यात भारतातही विधवा महिलांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागतो. भारतात चार कोटींहून अधिक विधवा महिला आहेत. आजही विधवा महिला त्यांच्या हक्कापासून वंचित आहेत.

या विधवा महिलांना पती नसल्याने मोठ्या अडचणींना तोंड द्यावे लागते. एक उदाहरण आहे- जोवेरिया नाबुकेन्या एक विधवा, इसिंगिरो जिल्ह्यात तिच्या काही ८ नातवंडांसोबत वाचते. युनिसेफच्या पाठिंब्याने नाबुकेन्या मुख्य कौटुंबिक काळजी प्रॅक्टिसेसवर आहेत. तिची एक दिनचर्या आहे जिथे ती मुलांसोबत वाचते आणि ते शिकत असताना त्यांच्यासोबत खेळते.

जगभरातील बऱ्याच महिलांसाठी, त्यांच्या मूलभूत हक्कांसाठी आणि प्रतिष्ठेसाठी दीर्घकालीन लढ्याने जोडीदाराचा विनाशकारी तोटा वाढविला जातो.

जगभरात २५८ दशलक्षाहून अधिक विधवा असूनही, विधवांना ऐतिहासिकदृष्ट्या आपल्या समाजात न पाहिलेले, समर्थन न मिळालेले आणि मोजले गेलेले नाही. भूतकाळातील अनुभव दर्शवितो, की विधवांना अनेकदा वारसा हक्क नाकारले जातात, जोडीदाराच्या मृत्यूनंतर त्यांची मालमत्ता बळकावली जाते आणि रोगाचे 'वाहक' म्हणून त्यांना अत्यंत कलंक आणि भेदभावाचा सामना करावा लागतो.

जगभरात, पुरुषांच्या तुलनेत स्त्रियांना वृद्धापकाळ निवृत्तीवेतन मिळण्याची शक्यता खूपच कमी आहे, म्हणून जोडीदाराच्या मृत्यूमुळे वृद्ध स्त्रियांना निराधारपणा येऊ शकतो. लॉकडाऊन आणि आर्थिक बंदच्या संदर्भात विधवांना ते खूप आजारी पडल्यास किंवा स्वतःला आणि त्यांच्या मुलांचे पालनपोषण करण्यासाठी त्यांना बँक खाती आणि पेन्शन मिळू शकत नाहीत.

एकटी-माता कुटुंबे आणि अविवाहित वृद्ध स्त्रिया आधीच विशेषतः गरिबीसाठी असुरक्षित आहेत, हे एक क्षेत्र आहे ज्याकडे तातडीने लक्ष देण्याची गरज आहे. आंतरराष्ट्रीय विधवा दिनी जगभरातील विधवांवर परिणाम करणाऱ्या काही समस्या आणि त्यांच्या हक्कांचे संरक्षण आणि प्रगती करण्यासाठी काय केले पाहिजे यावर एक नजर टाका.

युनायटेड नेशन्स सन २०११पासून २३ जून हा आंतरराष्ट्रीय विधवा दिवस म्हणून पाळत आहे, विधवांच्या आवाजाकडे आणि त्यांच्या अनुभवांकडे लक्ष वेधण्यासाठी आणि त्यांना आवश्यक असलेला अनोखा पाठिंबा मिळवण्यासाठी पाळला पाहिजे. आता पूर्वीपेक्षा अधिक हा दिवस विधवांना पूर्ण हक्क आणि मान्यता प्राप्त करण्याच्या दिशेने कृती करण्याची संधी आहे.

यामध्ये त्यांना त्यांचा वारसा, जमीन आणि उत्पादक संसाधनांचा वाजवी वाटा मिळण्याची माहिती प्रदान करणे समाविष्ट आहे; निवृत्तीवेतन आणि सामाजिक संरक्षण जे केवळ वैवाहिक स्थितीवर आधारित नाही; सभ्य काम आणि समान वेतन; आणि शिक्षण आणि प्रशिक्षण संधी. विधवांना स्वतःला आणि त्यांच्या कुटुंबांना आधार देण्यासाठी सक्षम करणे म्हणजे सामाजिक कलंक दूर करणे ज्यामुळे बहिष्कार आणि भेदभाव किंवा हानिकारक प्रथा निर्माण होतात.

शिवाय महिलांविरुद्ध सर्व प्रकारचा भेदभाव निर्मूलनाचा करार आणि बालहक्कावरील अधिवेशनासह आंतरराष्ट्रीय कायद्यात नमूद केल्याप्रमाणे विधवांच्या हक्कांची खात्री करण्यासाठी सरकारांनी त्यांच्या वचनबद्धतेचे पालन केले पाहिजे. विधवांच्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी राष्ट्रीय कायदे अस्तित्वात असतानाही, अनेक राज्यांच्या न्यायिक व्यवस्थेतील कमकुवतपणामुळे विधवांच्या हक्कांचे व्यवहारात संरक्षण कसे केले जाते आणि त्याकडे लक्ष दिले पाहिजे.

न्यायिक अधिकाऱ्यांकडून जागरूकता आणि भेदभावाचा अभाव यामुळे विधवा न्याय व्यवस्थेकडे नुकसान भरपाई मागण्यासाठी वळू शकत नाहीत. शाश्वत विकास उद्दिष्टे साध्य करण्यासाठी कृती योजनांच्या संदर्भात विधवा आणि त्यांच्या मुलांवरील हिंसाचार, गरिबी निर्मूलन, शिक्षण आणि सर्व वयोगटातील विधवांना इतर समर्थन यासाठी कार्यक्रम आणि धोरणे देखील हाती घेणे आवश्यक आहे.

संघर्षानंतरच्या परिस्थितीत विधवांना शांतता निर्माण आणि सलोखा प्रक्रियांमध्ये पूर्णपणे सहभागी होण्यासाठी आणले पाहिजे जेणेकरून ते शाश्वत शांतता आणि सुरक्षिततेसाठी योगदान देतील आणि कोविड-19 च्या संदर्भात विधवांना पुन्हा चांगले सक्षम बनवण्यासाठी आमच्या कामातून सोडले जाऊ नये.

आमची पुनर्प्राप्ती त्यांच्या अनन्य गरजांना प्राधान्य देते आणि समाजांना अधिक समावेशक, लवचिक आणि सर्वांसाठी समान होण्यासाठी समर्थन देते, याची खात्री करूया.

■ ■ ■



**कृष्णकुमार आनंदी गोविंदा निकोडे**
**रामनगर, गडचिरोली.**
**९४२३७१४८८३.**

# जेव्हा तुमच्या घरी दिवा लागतो... तेव्हा कोणाचा तरी जीव पणाला लागतो!

**आपण घरात सुरक्षित बसलेलो असतो... बाहेर मुसळधार पाऊस कोसळत असतो, सोसाट्याचा वारा सुटलेला असतो किंवा कडक ऊन अक्षरश: अंगाची लाही लाही करत असते. आपण आपल्या घराचे दरवाजे, खिडक्या बंद करून निवांत असतो. पण याच वेळी, काही माणसं आपल्या घराचे दरवाजे उघडून, आपल्या आयुष्याची लढाई लढायला बाहेर पडत असतात. ते असतात आपले लाइनमन खरे प्रकाश योद्धा!**

---------------

**● योगेश विटनकर**
**नागपूर.**

---------------

वीज गेली की आपल्यापैकी अनेकांना लगेच राग येतो, चिडचिड होते. "अरे देवा! पुन्हा लाईट गेली? कधी येणार आता?" असे उद्गार आपोआप बाहेर पडतात. पण तुम्हाला माहीत आहे का, याच एका क्षणी शेकडो घरांमध्ये धाकधूक सुरू होते?

नियंत्रण कक्षातून फोन येतो, "लाईन चालू करा!" आणि मग जराही वेळ न घालवता तो कर्मचारी वादळ, पाऊस किंवा भर उन्हात आपल्या कामावर निघतो. तो हे विसरून जातो की, तो कोणाचा तरी प्रेमळ बाप आहे, कोणाचा तरी आधारवड मुलगा आहे किंवा कोणाचा तरी काळजीवाहू पती आहे.

त्याच्या कुटुंबीयांचे डोळे त्याच्या वाटेकडे लागलेले असतात. मुलं देवाजवळ आपल्या बाबांच्या सुखरूप परत येण्यासाठी प्रार्थना करतात, तर पत्नी देवघरात दिवा लावून 'माझ्या माणसाला काही होऊ नये' अशी आळवणी करते. प्रत्येक वादळात, प्रत्येक पावसात, प्रत्येक बिघाडात या वीज कर्मचाऱ्यांच्या कुटुंबीयांची चिंता वाढतच राहते.

**एका मुलीची हृदयस्पर्शी विनंती...**

काही दिवसांपूर्वी एका लाइनमनच्या मुलीने सोशल मीडियावर एक अत्यंत हृदयस्पर्शी आवाहन केले होते: "कृपया... वीज गेली तर रागवू नका, ओरडू नका... आमचे बाबा, काका, भाऊ त्याच लाईनवर काम करत असतात. एक छोटीशी चूक त्यांचा जीव घेऊ शकते. त्यांचे कुटुंबीय त्यांची सुखरूप परत येण्याची वाट पाहत असतात."

हे वाक्य ऐकल्यावर आपल्या काळजाला हात लागतो, नाही का? तिच्या 12 वर्षांच्या स्वर्णा नावाच्या मैत्रिणीचे डोळे भीती दाखवतात, जेव्हा ती सांगते, "बाबा आत्ताच शेताजवळच्या ट्रान्सफॉर्मरवर गेले आहेत." तिची आई दर पाच मिनिटांनी फोन तपासते, "फोन बंद तर नाही झाला? विजेचा धक्का तर नाही लागला?" ही चिंता अनाठायी नाही. दरवर्षी आपल्याकडे अनेक लाइनमन ड्युटीवर असताना विजेचा धक्का लागून किंवा उंचीवरून पडून आपला जीव गमावतात किंवा जायबंदी होतात.

**जीवाची बाजी लावून कर्तव्य बजावणारे हात**

वीज विभागातील एक कर्मचारी सांगतो की, "सामान्य जनतेला फक्त वीज गेल्याचे दिसते, पण वीज परत आणण्यासाठी आमचे सहकारी आपला जीव धोक्यात घालून काम करतात. अनेकदा ओले खांब, तुटलेल्या तारा किंवा पडलेली झाडेही धोकादायक ठरतात. तरीही लाईन सुरू होईपर्यंत हे लोक घरी परत येत नाहीत."





प्रदिप यांची पत्नी सांगते, "जेव्हाही बाहेर हवामान खराब असते, तेव्हा मी देवघरात दिवा लावते. देवाकडे प्रार्थना करते की माझ्या माणसाला काही होऊ नये. जर फोन बराच वेळ वाजला नाही, तर माझी अस्वस्थता अजून वाढते." ज्येष्ठ लाइनमन सुजित म्हणतात, "पावसात सर्वात जास्त धोका असतो. वीजेचा करंट जमिनीत पसरू शकतो. खांब निसरडे होतात. वरून नियंत्रण कक्षाचा दबाव असतो की 'लाईन चालू करा'. पण आम्ही किती धोका पत्करून काम करत आहोत, हे लोकांना माहीत नसते."


**पुढच्या वेळी वीज गेली तर...**

आपल्यासाठी वीज म्हणजे फक्त एक बटण दाबणे. पण या एका सोप्या क्रियेमागे एक संपूर्ण आयुष्य पणाला लागलेले असते. वादळात तुटलेल्या तारा जोडणे, ओल्या ट्रान्सफॉर्मरवर चढणे, खड्ड्यांमध्ये उभे राहून खांब धरणे, डोक्यापर्यंतच्या पाण्यात पोहूण जाणे... हे सर्व मृत्यूच्या जबड्यात उतरण्यासारखे आहे. पण अशा परिस्थितीतही ते आपली भीती गिळून कर्तव्य बजावतात.

त्यामुळे, पुढच्या वेळी जेव्हा तुमच्या घरातील दिवा अचानक विझेल, तेव्हा राग करण्यापूर्वी जरा थांबा. विचार करा की कोणीतरी आपले त्या तारांवर काम करत आहे. त्याच्या सुरक्षिततेसाठी प्रार्थना करा. तुमचा थोडासा संयम, त्यांची थोडीशी सुरक्षितता... त्यांच्या कुटुंबासाठी खूप मोठा दिलासा ठरू शकतो. चला, या निस्वार्थ सेवाभावी प्रकाश योद्ध्यांचा आदर करूया आणि त्यांच्या कामाचे मोल जाणूया.

■ ■ ■





# ट्यूब मास्टर



दररोज सकाळी एक माणूस पाण्यात उतरत असतो, त्याच्या हातात प्लास्टिकची एक पिशवी असते, ज्यात कपडे, जेवणाचा डबा आणि पुस्तकं असतात. तो कोणी मोठा जलतरणपटू नाही, पण त्याचं ध्येय मात्र जगावेगळं आहे. केरळच्या मल्लपूरम जिल्ह्यातल्या पदिंजट्टमुरी गावात राहणारे अब्दुल मलिक नावाचे हे शिक्षक गेली तब्बल २० वर्षं एका नदीतून पोहत शाळेत जात आहेत.

अब्दुल मलिक हे प्राथमिक शाळेत गणिताचे शिक्षक आहेत. त्यांच्या घरापासून शाळेचं अंतर फारसं नाही, पण दररोज बसने जायचं झाल्यास तीन तास लागतात आणि तेही प्रवास खडतर आणि अस्वस्थ करणारा असतो. म्हणून त्यांनी एक वेगळा मार्ग निवडला, कडलुंडी नदी पार करत पोहून शाळेत जाण्याचा.

पाण्यात पोहताना ते एका टायर ट्यूबचा वापर करतात आणि त्यामुळंच त्यांना "ट्यूब मास्टर" म्हणून ओळख मिळाली. आजवर त्यांनी एकही दिवस शाळा चुकवलेली नाही. त्यांचं शिस्तबद्ध जीवन आणि शिक्षणासाठी असलेली निष्ठा विद्यार्थ्यांमध्ये एक आदर्श निर्माण करतं. इतकंच नाही, तर त्यांनी त्यांच्या विद्यार्थ्यांना पोहणं शिकवणंही सुरू केलं आहे.

अब्दुल मलिक हे केवळ शिक्षक नाहीत, तर पर्यावरणप्रेमी नागरिकही आहेत. नदीचं प्रदूषण वाढू नये म्हणून ते नियमितपणे विद्यार्थ्यांसह नदी स्वच्छ ठेवण्यासाठी उपक्रम राबवतात. पाण्यातील प्लास्टिक, कचरा ते स्वतः गोळा करून नदीचे संरक्षण करतात.

त्यांची ही संघर्षमय आणि प्रेरणादायी कथा संपूर्ण देशभर चर्चेचा विषय बनली आहे. ग्रामीण भागातील शिक्षकांनी कोणत्या अडचणींना तोंड द्यावं लागतं, याचं हे एक सजीव उदाहरण आहे. अब्दुल मलिक यांनी परिस्थितीवर मात करत समाजासमोर एक नवा आदर्श निर्माण केला आहे झ जो शिक्षण, पर्यावरण आणि समर्पण या तिन्ही गोष्टींचं जिवंत प्रतीक आहे.

■ ■ ■





# मीठ लावून काकडी खाणं योग्य की अयोग्य?

उन्हाळ्यात काही फळ भाज्या, फळे खाल्ल्याने नक्कीच शरीराला फायदा मिळतो. त्यातीलच एक फळभाजी म्हणजे काकडी. कारण काकडीमध्ये भरपूर प्रमाणात पाणी असतं. शरीराला थंडावा देण्यासाठी काकडी हे एक सुपरफूड मानलं जातं. पाण्याची कमतरता भरून काढण्यास, पचन सुधारण्यास आणि त्वचेचा पोत सुधारण्यासाठी मदत करते. पण बऱ्याच जणांना काकडी खाण्याची योग्य वेळच माहित नाही. तसेच ती खाण्याची योग्य पद्धतही माहित नाही. कारण काकडी जर ती चुकीच्या वेळी खाल्ली तर ती फायद्याऐवजी नुकसान करू शकते.

काकडीमध्ये सुमारे 95% पाणी असते, जे शरीराला हायड्रेट ठेवण्यास मदत करते. त्यात कॅलरीज देखील खूप कमी असतात, म्हणून वजन कमी करू इच्छिणाऱ्यांसाठी हा एक उत्तम पर्याय आहे. त्यात फायबर, व्हिटॅमिन के, पोटॅशियम आणि अँटीऑक्सिडंट्स देखील असतात जे शरीराच्या अनेक समस्यांशी लढण्यास मदत करतात. काकडी पचनसंस्था सुधारते आणि गॅस, ॲसिडिटी सारख्या समस्यांपासून आराम देते. तथापि, त्याचे फायदे तेव्हाच मिळतात जेव्हा ते योग्य वेळी आणि योग्य पद्धतीने खाल्ली तर.

काकडी खाण्याची सर्वोत्तम वेळ म्हणजे दुपारी किंवा संध्याकाळी, जेव्हा शरीराची चयापचय क्रिया जास्त असते. यावेळी, काकडीचे पाणी आणि फायबर शरीराद्वारे लवकर पचते आणि पोट देखील हलके राहते. दुपारच्या जेवणासोबत किंवा नाश्त्यात काकडी खाल्ल्याने शरीराला पुरेसा ओलावा मिळतो आणि पचन देखील सुधारते.

**काकडी खाण्याची चुकीची पद्धत**

काही लोक सकाळी रिकाम्या पोटी काकडी खाण्याची चूक करतात, परंतु आयुर्वेदानुसार, असे करणे काही लोकांसाठी हानिकारक ठरू शकते, विशेषतः ज्यांची पचनसंस्था कमकुवत आहे. रिकाम्या पोटी काकडी खाल्ल्याने काही लोकांमध्ये गॅस, अपचन किंवा आम्लता सारख्या समस्या उद्भवू शकते.

काकडी खाण्यापूर्वी ती स्वच्छ पाण्यात भिजवणे किंवा धुणे महत्वाचे आहे कारण तिच्या पृष्ठभागावर माती, कीटकनाशके किंवा बॅक्टेरिया असू शकतात. तसेच, काकडी कधीही दूध किंवा दुधाच्या पदार्थांसोबत खाऊ नये कारण त्यामुळे पचन समस्या निर्माण होऊ शकतात आणि शरीरात विषारी घटक तयार होऊ शकतात.

अनेकजण काकडीवर मीठा टाकून खातात. परंतु जास्त मीठ काकडीतील आरोग्यदायी घटक कमी करू शकते, म्हणून मर्यादित प्रमाणात मीठ वापरणे चांगले.

■ ■ ■

## अशोकायन



**प्रा. अशोक सारडा**
**मेहकर**
**(९४२१३९४३३९)**

### स्कुल चले हम..!

शाळेची वाजताच घन्टा
आनंदाने धरला शाळेचा रस्ता
गेटवरच सरांनी केले स्वागत
देऊनी चॉकलेट
फुलांचा गुलदस्ता..

नवीन पुस्तके येता हाती
आनंद मावेना गगनी
मन लावूनी करु अभ्यास
घडवू नव क्रांतीचा इतिहास ..!

मध्यान्न भोजन देई शासन
ठेऊ त्याची आम्ही जाण
विविध खेळात मिळवू प्राविण्य
ऑलिंपिक मध्ये ऊंचावू
देशाची मान..!

महासागर



# 24 ते 28 जून समुद्राला मोठी भरती, 4.75 मीटर उंचीच्या लाटा उसळणार

मुंबई, दि. २३ प्रतिनिधी

अरबी समुद्राला २४ ते २८ जूनपर्यंत मोठी भरती असून यावेळी ४.५९ ते ४.७५ मीटर उंचीच्या महाकाय लाटा उसळणार आहेत. त्यामुळे या पाच दिवसांत मुंबईत मुसळधार पाऊस पडला तर शहर जलमय होण्याची भीती व्यक्त करण्यात येत आहे.



मुंबई शहर सात बेटांवर वसले असल्यामुळे पावसाळ्यात समुद्राचा धोका कायम आहे. समुद्राला मोठी भरती असताना पावसाळ्यात मुंबईतून समुद्रात निचरा होणाऱ्या पाण्याच्या पातमुखावरील दरवाजे बंद करण्यात येतात. अशावेळी मुंबईत मुसळधार पाऊस पडला, तर मुंबईत पाणी तुंबून राहते. त्यामुळे पावसाळ्यात अरबी समुद्राला असलेल्या मोठ्या भरतीच्या वेळी शहर जलमय होण्याची दाट शक्यता असते. येत्या काही दिवसांत मुंबईत पाऊस सक्रिय होण्याची शक्यता असल्यामुळे जूनमध्ये समुद्राला असलेल्या मोठ्या भरतीमुळे महापालिका सतर्क झाली आहे.

जूनमध्ये समुद्राला मोठी भरती असल्यामुळे किनाऱ्यावर महाकाय लाटा आपटण्याची शक्यता आहे. विशेषतः मरिन ड्राईव्ह, गेटवे ऑफ इंडिया या परिसरात लाटांचा मोठा तडाखा बसतो. त्याशिवाय चौपाट्यांवरही मोठ्या प्रमाणात लाटांचा तडाखा बसण्याची शक्यता आहे. यासाठी मुंबईकरांसह पर्यटकांनी मोठ्या भरतीच्या वेळी समुद्रकिनाऱ्यावर जाणे टाळावे, असे आवाहन महापालिकेने केले आहे.

शहरात तुंबलेल्या पाण्याचा तातडीने निचरा व्हावा यासाठी महापालिकेने शक्तिशाली पम्पिंग स्टेशन उभारले आहेत. यात हाजी अली, ब्रिटानिया, वरळी लव्हग्रोह, क्लिव्हलँड, गझदरबंद ही सहा पम्पिंग स्टेशन आहेत. ही पम्पिंग स्टेशन सज्ज ठेवण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. या पम्पिंग स्टेशनमध्ये ४३ पंप कार्यरत आहेत. प्रत्येक पंपाची क्षमता प्रति सेकंदाला ६ हजार लिटर पाण्याचा उपसा करण्याची आहे. याचाच अर्थ सर्व पंपांची एकत्रित क्षमता ही प्रत्येक सेकंदाला ला २ लाख ५८ हजार लिटर एवढ्या पाण्याचा उपासा करण्याची आहे.

## धारावीकरांसाठी तक्रार निवारण यंत्रणा

मुंबई, दि. २३ प्रतिनिधी

धारावी पुनर्विकास प्रकल्पाच्या (डीआरपी) /एसआरएच्या सर्वेक्षणाचे काम अंतिम टप्प्यात असून, मसुदा परिशिष्ट २ (प्राथमिक पात्रता यादी) तयार करण्याचे काम सुरू असतानाच, धारावीतील रहिवाशांच्या तक्रारींचे निराकरण करण्यासाठी चतुःस्तरीय तक्रार निवारण प्रणाली उभारण्याचे काम सुरू करण्यात आले आहे.

'सर्वांना घर' हा आमचा उद्देश आहे. धारावीतील प्रत्येक रहिवाशाला या पुनर्विकास प्रकल्पाचा लाभ मिळावा, अशी आमची इच्छा आहे. जर एखाद्या रहिवाशाला वाटत असेल की त्याचे नाव परिशिष्ट २ मध्ये चुकीने वगळले गेले आहे किंवा सर्वेक्षणात काही चूक झाली आहे,

तर त्याच्या तक्रारीला पूर्णपणे योग्य न्याय मिळेल, आणि त्याला धावपळ न करता त्यांच्या तक्रारींचे सुलभ एक खिडकी प्रणालीद्वारे त्वरित निवारण केले जाईल,' असे डीआरपीचे मुख्य कार्यकारी अधिकारी एस. व्ही. आर. श्रीनिवास यांनी सांगितले.

चतुःस्तरीय तक्रार निवारण प्रक्रियेबाबत स्पष्टीकरण देताना श्रीनिवास म्हणाले, प्राथमिक परिशिष्ट- २चा मसुदा प्रसिद्ध झाल्यानंतर, जर कोणत्याही गाळेधारकाची काही वैध तक्रार असेल, तर तो संबंधित सक्षम प्राधिकाऱ्याच्या (सीए) निदर्शनास आणू शकतो. जर अंतिम परिशिष्ट २ प्रसिद्ध झाल्यानंतरही तक्रार निवारण झाले नाही, तर चतुःस्तरीय तक्रार निवारण प्रणाली उपलब्ध असेल. प्रथम, अपील अधिकारी (एओ) तक्रार ऐकून, ठरावीक कालावधीत निर्णय देतील. जर अपील अधिकाऱ्याच्या निर्णयावर तक्रारदार असमाधानी असेल, तर पुढील स्तर म्हणजे तक्रार निवारण समिती (जीआरसी) गाठता येईल. या समितीमध्ये डीआरपीतील वरिष्ठ अधिकाऱ्यांचा समावेश करण्यात आला आहे. हे अधिकारी सर्वेक्षण प्रक्रियेत सहभागी नसलेले स्वतंत्र अधिकारी असणार आहेत. यामुळे निष्पक्ष पद्धतीने नागरिकांच्या तक्रारींचे निराकरण करण्यात येणार आहे.

# अमली पदार्थविरोधी दिनी 'सायक्लॉथॉन'

मुंबई, दि. २३ प्रतिनिधी

अमली पदार्थीविरोधी कक्ष (गुन्हे शाखा) पोलीस उपआयुक्त कार्यालयाच्या वतीने रविवारी आंतरराष्ट्रीय अमली पदार्थ सेवन आणि अवैध तस्करीविरोधी दिनानिमित्त 'सायक्लॉथॉन' चे आयोजन करण्यात आले. संयुक्त राष्ट्राच्या वतीने २६ जून रोजी हा दिवस पाळला जातो. त्यामुळे पोलिसांनीही हा दिवस या गुन्ह्याची साखळी तोडण्यासाठी विशेष थीम म्हणून घोषित केला आहे.

मुंबई पोलीस दलामार्फत अमली पदार्थांचे दुष्परिणाम व त्यामुळे सामाजिक, आर्थिक नुकसान व सेवन करणाऱ्यांवर होणाऱ्या मानसिक दुष्परिणाम याविषयी जनजागृती करण्याच्या उद्देशाने १२ ते २६ जूनपर्यंत या १५ दिवसांचा 'नशामुक्त भारत पंधरवडा' कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. त्याअंतर्गत मुंबई पोलीस आयुक्तालय व नार्कोटिक्स कंट्रोल ब्युरो यांच्या संयुक्त विद्यमाने रविवारी सकाळी ७ वाजता वांद्रे रेक्लेमेशन बस स्टॉप येथे अमली पदार्थविरोधी जनजागृतीच्या उद्देशाने 'सायक्लॉथॉन' चे आयोजन करण्यात



आले होते. या 'सायक्लॉथॉन' ची सुरुवात वांद्रे रेक्लेमेशन बस स्टॉप येथून लिलावती रुग्णालय चॅपेल रोड, मेहबुब स्टुडिओ, बँड स्टैंड रोड, हिल रोड, सेंट पॉल रोड, कार्टर रोड, खार दांडा लिंकिंग रोड, सांताक्रुझ पोलीस ठाणे, जुहु तारा रोड, जुहु बीच या मार्गावर करण्यात आली. या सायक्लॉथॉनसाठी निःशुल्क नोंदणी करून जवळपास ४५० सायकलस्वार यांनी रॅलीमध्ये सहभाग घेतला. या वेळी विविध घटकांतील मान्यवर प्रोत्साहन देण्याकरिता उपस्थित राहिले. त्यांनी 'फ्लॅग ऑफ' करून सायक्लॉथॉनचे उद्घाटन केले. सर्व वयोगटांतील स्त्री व पुरुष तसेच मोठ्या प्रमाणात तरुणांनीही सहभाग घेतला. तर या वेळी स्थानिक नागरिकांनी उत्स्फूर्तपणे प्रतिसाद देऊन 'रं८ ठङ्ग ळङ्ग उ५४२' चा नारा दिला.

दरम्यान, या 'नशामुक्त भारत पंधरवडा' कार्यक्रम अंतर्गत मुंबई पोलीस आयुक्तालय अंतर्गत सर्व पोलीस ठाणी तसेच अमली पदार्थविरोधी कक्ष, गुन्हे शाखा हे अमली पदार्थविरोधी जनजागृती करण्यासाठी विविध कार्यक्रमांचे आयोजन करीत आहेत. त्याअंतर्गत माध्यमिक शाळा तसेच महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन, नशामुक्त केंद्रातील दाखल व्यक्तींना मार्गदर्शन, रॅलीच्या माध्यमातून पोस्टर्स-बॅनर्सद्वारे जनजागृती, पथनाट्य आयोजित करणे, कॉर्नर सभा वैगरे कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती या वेळी देण्यात आली. या रॅलीचे आयोजन पोलीस आयुक्त देवेन भारती, लखमी गौतम (पोलीस सहआयुक्त, गुन्हे), निशीथ मिश्र (पोलीस सहआयुक्त अतिरिक्त कार्यभार, गुन्हे), शैलेश बलकवडे (अपर पोलीस आयुक्त, गुन्हे) यांच्या मार्गदर्शनाखाली नवनाथ ढवळे (पोलीस उपआयुक्त, अमली पदार्थविरोधी कक्ष, गुन्हे शाखा) यांनी केले.

# पावसाळ्याच्या पूर्वतयारीसाठी सार्वजनिक बांधकाम विभाग सज्ज

मुंबई, दि. २३ प्रतिनिधी

पावसाळ्यात रस्ते व पूल सुस्थितीत राहावेत, यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाने व्यापक उपाययोजना राबविल्या असून, राज्यातील प्रमुख रस्त्यांचे व पुलांचे दुरुस्ती व देखभाल काम वेगाने सुरू आहे.

राज्यातील प्रमुख राज्य मार्ग, राज्य मार्ग तसेच प्रमुख जिल्हा मार्ग यांची दैनंदिन देखभाल व वेळोवेळी दुरुस्ती करून हे रस्ते वाहतुकीसाठी योग्य राहावेत, यासाठी विभाग सतर्क आहे. अतिवृष्टीमुळे पाण्याखाली जाणाऱ्या पुलांवर खबरदारीचा उपाय म्हणून सावधानतेचे फलक लावण्यात येत असून, दुरुस्ती किंवा नवीन बांधकाम सुरु असलेल्या ठिकाणी वाहतुकीसाठीचे पर्यायी मार्ग योग्य स्थितीत ठेवण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. पावसाळ्यात विशेष खबरदारी घेण्यासाठी क्षेत्रीय अधिकाऱ्यांना निर्देश देण्यात आले आहेत. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिपत्याखाली सध्या एकूण 16,519 लहान-मोठे व ब्रिटीशकालीन पूल आहेत. यापैकी 451 पुलांचे संरचनात्मक परीक्षण करण्यात आले आहे. मागील 10 वर्षांत 1,693 पुलांची दुरुस्ती करण्यात आली आहे.

धोकादायक स्थितीत असलेल्या किंवा वाहतुकीसाठी बंद असलेल्या पुलांच्या दोन्ही बाजूंना सावधानतेचे फलक व बॅरिकेट्स लावण्यात आले आहेत. अशा रस्ते व पुलांची स्थिती शासन स्तरावरून सातत्याने तपासली जात आहे.

पावसाळ्यात उद्भवणाऱ्या अडचणींवर वेळीच उपाय करता यावा, यासाठी एक प्रमाणित कार्यपद्धती (SOP) तयार करण्यात आली असून, त्याअंतर्गत अभियांत्रिकी सहायक, कनिष्ठ अभियंता, उप अभियंता, कार्यकारी अभियंता व अधीक्षक अभियंता यांना विशिष्ट जबाबदाऱ्या देण्यात आल्या आहेत.

राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात, तालुका स्तरापर्यंत नियंत्रण कक्ष (Control Room) कार्यरत असून, मुख्य अभियंता, अधीक्षक अभियंता व कार्यकारी अभियंता हे या कक्षांचे वेळोवेळी निरीक्षण करत आहेत. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या या तयारीमुळे पावसाळ्यातील आपत्कालीन स्थितींना सक्षमपणे तोंड देणे शक्य होणार आहे, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.


## मुंबई-पुणे मार्गावर गाड्यांचा वेग वाढणार

मुंबई, दि. २३ प्रतिनिधी

मुंबई-पुणे एक्स्प्रेस वेवरील वाहनांची वेगमर्यादा वाढवण्याबाबत चर्चा सुरू आहे. अधिकाऱ्यांकडून मिळालेल्या माहितीनुसार, पुणे-मुंबई मार्गाच्या उतारावरील ट्रक आणि बसेससारख्या जड वाहनांसाठी वेग मर्यादा सध्याच्या ४० किमी प्रतितास वरून ४५-५० किमी प्रतितास करण्याबाबत चर्चा सुरू आहे. यावर लवकरच निर्णय होण्याची शक्यता आहे.

मुंबई-पुणे एक्सप्रेस वेच्या बोरघाट विभागात येणारी जड वाहने उतारावरून थोडी वेगाने खाली उतरू शकतील, यासाठी हे केले जात आहे. सध्या, उतारांवर जड वाहनांचा वेग जास्त असतो. यामुळे त्यांना चलन भरावे लागते. ही समस्या दूर करण्यासाठी, वेग मर्यादा वाढवण्याची योजना आहे. कार किंवा हलक्या वाहनांसाठी वेगमर्यादा शिथिल करण्याची कोणतीही योजना नाही. १० किमी लांबीच्या घाट विभागात कारची सध्याची वेग मर्यादा ६० किमी प्रतितास आहे, जी बदलण्याची शक्यता कमी आहे.

पहिल्यांदाच वेगमयदिचे उल्लंघन करणाऱ्या वाहनाला २००० रुपये दंड आकारला जातो. त्यानंतरच्या उल्लंघनांसाठी ही रक्कम वाढते. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ (एमएसआरडीसी), महामार्ग पोलिस, राज्य वाहतूक विभाग आणि वाहतूकदारांच्या पथकांनी गेल्या महिन्यात घाट विभागाचे संयुक्त सर्वेक्षण करून वास्तविकता जाणून घेतली.




भोर घाटावर अवजड वाहनांसाठी ४० किमी प्रतितास ही सध्याची वेगमर्यादा वाहतूकदारांनी आणि काही अधिकाऱ्यांनी 'अवैज्ञानिक', 'अवास्तव' आणि 'अवास्तव' असल्याचे म्हटले आहे. अधिकाऱ्यांना असे आढळून आले की वाहनांना थोड्या जास्त वेगाने प्रवास करण्याची परवानगी दिल्याने वेळ, इंधन, देखभाल खर्च वाचेल आणि 'अनावश्यक' ई-चलान टाळण्यास मदत होईल.

९५ किमी लांबीच्या या मार्गावर इंटेलिजेंट ट्रॅफिक मॅनेजमेंट सिस्टम सुरू झाल्यानंतर घाट विभागात ई-चलन वाढले आहेत, ज्यामध्ये अनेक वेग-निरीक्षण कॅमेरे आणि इतर उपकरणे आहेत.

## मोटरमनच्या केबिनमध्ये सीसीटीव्ही

मुंबई, दि. २३ प्रतिनिधी

वाढविण्यासाठी मध्य आणि पश्चिम रेल्वेने आता मोटरमन केबिनमध्ये सीसीटीव्ही कॅमेरा बसविण्याचे काम सुरू केले आहे. सध्या मध्य रेल्वेच्या २५ लोकलमध्ये ५० सीसीटीव्ही यंत्रणा बसवल्या आहेत. आणखी १५ लोकलसाठी ३० यंत्रणा ऑर्डर करण्यात आल्या आहेत. एका लोकलमधील दोन मोटरमन केबिनसाठी अंदाजे १.२४ लाख रुपयांचा खर्च अपेक्षित असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. पश्चिम रेल्वेच्या २६ लोकलमध्ये ही यंत्रणा बसवण्यात आली आहे.



मुंबई लोकलने प्रवास करताना अनेकदा प्रवाशांचे ट्रेनमधून पडून किंवा रूळ ओलांडताना अपघाती मृत्यू होतात. अनेकदा अपघातांचे कारण स्पष्ट होत नसल्याने रेल्वे प्रशासनाला याची कारणे शोधता येत नाहीत. तसेच प्रवाशांना नुकसानभरपाई देताना रेल्वेला त्यांची बाजू कोर्टामध्ये स्पष्टपणे मांडता येत नाही. आता या कॅमेऱ्याच्या माध्यमातून अपघाताचे नेमके कारण शोधण्यास मदत मिळू शकेल. यामध्ये अपघातादरम्यान बाह्य बाबींचा समावेश आहे का ? प्रवाशांची चूक आहे का ? अपघातावेळी मोटरमनचे लक्ष कुठे होते? त्याने सर्व सूचनांचे पालन करतानाच सर्व सिग्नल पाळले आहेत का ? अशा अनेक बाबी तपासणे शक्य होईल. अपघात झाल्यास मोटरमनची कृती, त्याचा प्रतिसाद हे सर्व सीसीटीव्ही फुटेजमधून तपासले जाऊ शकते. मोटरमनवर असलेल्या तणावपूर्ण परिस्थितीची नोंद ठेवता येते. त्यांच्या अडचणी समजून घेऊन योग्य धोरण ठरवता येणार आहे.

## पियूष गोयल यांच्या जनता दरबाराला उत्स्फूर्त प्रतिसाद

मुंबई, दि. २३ प्रतिनिधी

उत्तर मुंबईचे खासदार आणि केंद्रीय वाणिज्य मंत्री पियूष गोयल यांनी रविवारी आयोजित केलेल्या जनता दरबारात एकूण ९२ तक्रारींवर कार्यवाही करण्यात आली. या प्रकरणांमध्ये महापालिका, म्हाडा, गृहनिर्माण संस्था तसेच स्थानिक पोलिसांकडून दुर्लक्षित करण्यात आलेल्या तक्रारींचा समावेश होता.

कांदिवलीतील लोककल्याण कार्यालयात नियमितपणे ते जनता दरबार घेतात, जिथे नागरिकांच्या तक्रारी ऐकून ते संबंधित सरकारी अधिकाऱ्यांना त्वरित कार्यवाहीचे निर्देश देतात. रविवारच्या जनता दरबारात देखील नागरिकांनी मोठ्या संख्येने अर्ज व निवेदने सादर केली. नागरिकांनी सहकारी गृहनिर्माण संस्थांचे रखडलेले प्रश्न, प्रकल्पग्रस्तांना मिळाली नसलेली नुकसानभरपाई यांसारख्या विविध समस्या मांडल्या. अनेक संस्था आणि संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनीही आपल्या मागण्या व अडचणी गोयल यांच्यासमोर मांडल्या. या दरबारात मालाड पूर्व येथे राहणाऱ्या रिना वर्मा या घरकाम करणाऱ्या महिलेने, सात वर्षांपासून पतीकडून होणाऱ्या मानसिक व शारीरिक छळाची माहिती दिली. पती तिला कामावर जाऊ नये म्हणून घराबाहेरून दरवाजा बंद करतो आणि अनेक वेळा पोलिसांकडे तक्रार करूनही काहीच कार्यवाही झाली नाही, असे तिने निवेदनात नमूद केले. या गंभीर प्रकरणाची दखल घेत खासदार गोयल यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांना त्वरित हस्तक्षेप करण्याचे निर्देश दिले. इतक्या मोठ्या प्रमाणावर नागरिकांनी पुढे येऊन आपली मते मांडणे ही पारदर्शक व उत्तरदायी प्रशासनात त्यांचा विश्वास दर्शवते. कोणत्याही प्रामाणिक तक्रारीकडे दुर्लक्ष होणार नाही आणि प्रत्येक नागरिकाला शासन त्यांच्या पाठीशी असल्याचे वाटले पाहिजे, असे केंद्रीय मंत्री पियूष गोयल यांनी सांगितले.

## डॉ. गोऱ्हे यांची राष्ट्रीय महिला आयोग अध्यक्षा रहाटकर यांच्याशी भेट

मुंबई, दि. २३ प्रतिनिधी

महाराष्ट्र विधान परिषदेच्या उपसभापती आणि स्त्री आधार केंद्राच्या अध्यक्ष डॉ. नीलम गोहे यांची मुंबईत राष्ट्रीय महिला



आयोगाच्या अध्यक्षा आणि भारतीय जनता पक्षाच्या राष्ट्रीय सचिव मा. विजया रहाटकर यांच्याशी सदिच्छा भेट झाली.

सदिच्छा भेटीदरम्यान महिला चळवळीशी निगडित विविध सामाजिक, प्रशासकीय आणि धोरणात्मक मुद्द्यांवर सखोल आणि सकारात्मक चर्चा झाली. डॉ. गोहे यांनी उपसभापती या नात्याने महिला विकास विषयक बैठका व कार्यक्रम यांची माहिती दिली.

महिलांच्या सबलीकरणासाठी राबवण्यात येणाऱ्या उपक्रमांचा आढावा, सामाजिक संस्था व शासकीय यंत्रणांमधील समन्वय, ग्रामीण व शहरी भागांतील महिलांच्या अडचणी, महिला सुरक्षितता, आरोग्य, रोजगार, शिक्षण आणि नेतृत्व विकास या मुद्द्यांवर चर्चा केंद्रित होती. डॉ. गोहे यांनी राज्यस्तरावर तसेच केंद्रस्तरावर महिलांसाठी कार्यरत यंत्रणांमध्ये सहकार्य आणि धोरणात्मक एकवाक्यता वाढवण्याची गरज व्यक्त केली. रहाटकर यांनी महिलांच्या सक्षमी-करणासाठी भाजप कार्यसंघातर्फे राबवण्यात येणाऱ्या योजनांची माहिती देत राष्ट्रीय महिला आयोगाच्या भूमिकेवरही प्रकाश टाकला.

सदिच्छा भेटीच्या निमित्ताने महिला विषयक प्रश्नांवर विविध पक्षांतील व विचारप्रवाहांतील नेतृत्व एकत्र येऊन सकारात्मक चर्चा करत असल्याचे सकारात्मक उदाहरण समाजासमोर आले.

## परीक्षार्थींना 'केवायसी' पूर्ण करणे बंधनकारक

### एमपीएससीचे निर्देश

मुंबई, दि. २३ प्रतिनिधी

राज्यातील विविध परीक्षांमध्ये व भरतीप्रक्रियेत सहभागी होऊ इच्छिणाऱ्या उमेदवारांसाठी आता एक महत्त्वाचा बदल करण्यात आला आहे. आयोगाच्या ऑनलाइन अर्ज प्रणालीमध्ये कोणताही अर्ज करण्यापूर्वी उमेदवारांनी 'केवायसी' प्रक्रिया पूर्ण करणे बंधनकारक करण्यात आले आहे.

एमपीएससीने दिलेल्या माहितीनुसार, उमेदवारांना खालील चारपैकी कोणत्याही एका पद्धतीने ओळख पडताळणी करावी लागणार आहे, आधार ऑनलाइन ई-केवायसी, आधार ऑफलाईन पेपरलेस डिजिटल केवायसी, आधार ऑफलाईन पेपर आधारित केवायसी किंवा नॉन-आधार ऑफलाईन केवायसी. ही प्रक्रिया उमेदवाराने अर्ज करण्यापूर्वी पूर्ण करणे आवश्यक आहे. एकदाच नोंदणी करताना उमेदवाराने आपला मोबाईल नंबर आणि ई-मेल आयडी प्रणालीत नोंदवणे बंधनकारक असून, आधार आधारित ओळख पडताळणीसाठी आधार क्रमांकाशी संलग्न मोबाईल क्रमांकदेखील द्यावा लागणार आहे.

एमपीएससीच्या ऑनलाईन अर्ज प्रणालीमध्ये उमेदवाराच्या खात्यात आधार क्रमांक नोंदविण्याची सुविधा मार्च २०१७ पासूनच उपलब्ध आहे. मात्र आता ती प्रक्रिया सक्तीची करण्यात आली आहे. या व्यवस्थेमुळे उमेदवाराची ओळख अचूकरीत्या अधिप्रमाणित करता येणार आहे. त्यामुळे चुकीच्या माहितीला आळा बसेल. विशेष म्हणजे, विशिष्ट ओळख प्राधिकरण आणि राज्य शासनाने स्पर्धा परीक्षा व भरती प्रक्रियेच्या विविध टप्प्यांवर उमेदवारांचे प्रमाणीकरण करण्यासाठी स्वेच्छेने आधार प्रमाणीकरणास एमपीएससीला अधिकृत मान्यता दिली आहे.

## महत्त्वाच्या बातम्या

### बोरिवलीत गणेश मूर्तिकारांचे संमेलन

मुंबई, दि. २३ प्रतिनिधी

गणेश मूर्तिकारांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत असल्याची दखल घेत या अन्यायाविरोधात यंदाच्या पावसाळी अधिवेशनात आवाज उठवून प्रशासनाचे लक्ष वेधणार असल्याचे तसेच मूर्तिकारांना सर्व परवानग्या चोवीस तासांत मिळाव्यात यासाठी एक खिडकी योजनेचा आग्रह धरू, असे आश्वासन आमदार संजय उपाध्याय यांनी दिले. बोरिवली येथील अटल स्मृती उद्यान येथे बोरिवलीचे आमदार संजय उपाध्याय यांच्या संकल्पनेतून भाजपतर्फे बोरिवलीतील सर्व गणेश मूर्तिकारांचे विशेष संमेलन आयोजित करण्यात आले होते. या संमेलनाला बोरिवलीतील ४० हून अधिक मूर्तिकार, कार्यकर्ते उपस्थित होते. उपस्थित मूर्तिकारांना तुळशीचे रोप देऊन गौरविण्यात आले. यात महिला मूर्तिकारांचाही समावेश होता.

### निवडणूक आयोगाचा निर्णय लोकशाहीच्या विरोधात : आंबेडकर

मुंबई, दि. २३ प्रतिनिधी

निवडणुकांचे फोटो आणि व्हिडीओ केवळ ४५ दिवसांपर्यंतच जतन करून ठेवण्याचा निर्णय केंद्रीय निवडणूक आयोगाने घेतला. मुक्त आणि निष्पक्ष निवडणुका घेण्याची जबाबदारी असलेल्या निवडणूक आयोगानेच पारदर्शकतेच्या विरोधात पाऊल उचलणे हा गंभीर चिंतेचा विषय आहे. हा निर्णय लोकशाही, पारदर्शकता आणि जनतेच्या विश्वासाच्या विरोधात असल्याची टीका वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी रविवारी केली. यासंदर्भात सोशल मीडियावर पोस्ट करत आंबेडकर म्हणाले की, १६ जानेवारी २०२५ रोजी काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांच्यासह इतर नेत्यांना पत्र लिहून महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीतील ७५, ९७,०६७मतांची संध्याकाळी ५ नंतर झालेली वाढ व सुधारित नियमावलीबाबत चिंता व्यक्त केली होती. मात्र, त्यांच्या या सूचनांकडे कोणीही गांभीयनि लक्ष दिले नसल्याची खंत आंबेडकर यांनी या पोस्टमध्ये व्यक्त केली.

### २०१३ च्या पोलीस उपनिरीक्षकांच्या पाल्यांना 'पोलीस पाल्य' दाखला द्यावा

मुंबई, दि. २३ प्रतिनिधी

२०१३ ची अर्हता परीक्षा उत्तीर्ण पोलीस उपनिरीक्षकांच्या पाल्यांना महाराष्ट्र पोलीस भरतीसाठी 'पोलीस पाल्य' असा दाखला द्यावा व याबाबतचा आदेश मुख्यमंत्री कार्यालयाने तत्काळ काढून भरतीची संधी या पाल्यांना मिळवून द्यावी, अशी मागणी राष्ट्र निर्माण संघटनेने मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांना नागपूर येथील निवासस्थानी निवेदनाद्वारे, तर राज्याचे मुख्य सचिव, पोलीस महासंचालक यांच्याकडे ई- मेलद्वारे पाठवले असल्याची माहिती संघटनेचे सचिव निलेश नागोलकर यांनी दिली. निलेश नागोलकर म्हणाले, महाराष्ट्र पोलीस दलात लवकरच पोलीस शिपाई भरती सुरू होणार आहे. त्याकरिता पोलीस पाल्य तयारीला लागले आहेत. पण; काही पोलीस पाल्य यांचे वडील २०१३ अर्हता परीक्षा पास झालेले पोलीस उपनिरीक्षक म्हणून अधिकारी झाले आहेत. त्यांना पोलीस पाल्य दाखला मिळण्यात अडचणी निर्माण होत आहे. याकरीता मुख्यमंत्री तथा गृहमंत्री यांनी गृह पालक या नात्याने पोलीस पाल्य यांची समस्या सोडवून त्यांनाही पोलीस भरतीची संधी उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

### साडेचार लाखांच्या चोरीप्रकरणी केअरटेकर तरुणीला अटक

मुंबई, दि. २३ प्रतिनिधी

मालाड येथील एका फ्लॅटमध्ये केअरटेकर म्हणून काम करताना कपाटातील कॅश आणि सोन्याचे दागिने असा साडेचार लाखांचा मुद्देमाल चोरी करुन पळून गेलेल्या प्रिती ओमकार मालप ऊर्फ प्रिती पाटील या २३ वर्षाच्या तरुणीला दिंडोशी पोलिसांनी अटक केली. यातील तक्रारदार महिला तिच्या कुटुंबीयांसोबत मालाड परिसरात राहते. तिच्यासह तिचे पती एका खासगी कंपनीत कामाला आहेत. वडिलांच्या निधनानंतर तिची आई तिच्यासोबत गेल्या पंधरा वर्षांपासून राहते. तिच्यासाठीच तिने प्रितीला तिच्या घरी केअरटेकर म्हणून कामावर ठेवले होते. १२ जूनला प्रिती सायंकाळीच तिच्या घरातून कोणालाही काहीही न सांगता निघून गेली होती. त्यानंतर कपाटातील दागिने आणि अडीच लाखांची रक्कम गायब झाली.

### शरीरात लपविलेले २३ कोटींचे अमली पदार्थ जप्त, पाच जणांना अटक

मुंबई, दि. २३ प्रतिनिधी

सीमाशुल्क विभाग व महसूल गुप्तवार्ता संचलनालयाने (डीआरआय) अमली पदार्थ तस्करीप्रकरणी छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर तीन कारवायांत २३ कोटी रुपयांचे अमली पदार्थ जप्त केले. पहिल्या कारवाईत थायलंडहून उशांमध्ये लपवून आणलेला १२ किलो हायड्रोपोनिक गांजा हस्तगत केला. दुसऱ्या कारवाईत परदेशी नागरिकाच्या पोटातून कोकेनच्या ६७ कॅप्सूल बाहेर काढल्या, तर तिसऱ्या कारवाईत विमानतळावरील कर्मचाऱ्यांकडून सव्वाचार कोटींचे सोने जप्त केले आहे. बँकॉकहून काही जण गांजा घेऊन येत असल्याची माहिती मिळाली होती. त्यानुसार विमानतळावर शुक्रवारी बँकॉकहून आलेल्या दोघांना सीमाशुल्क विभागाने अडवले. त्यांच्या बॅगेतील उशांच्या कव्हरमध्ये व्हॅक्यूम सील पद्धतीने लपवलेला हायड्रोपोनिक गांजा सापडला. दोन्ही आरोपींकडून ११ कोटी ८८ लाख रुपयांचा ११ किलो ८८१ ग्रॅम वजनाचा गांजा जप्त करण्यात आला. डीआरआय'ने अमली पदार्थाची तस्करी करणाऱ्या आयव्हरी कोस्ट देशाच्या नागरिकाविरोधात १९ जूनला विमानतळावर कारवाई केली. तो सिएरा लिओनहून मुंबई विमानतळावर आला होता. त्याने भारतात ड्रग्ज तस्करीच्या उद्देशाने कॅप्सूल गिळल्याची कबुली दिली. त्याला सरकारी रुग्णालयात दाखल केले असता त्याच्या पोटातून ६७ कॅप्सूल काढल्या. त्यात १,१३० ग्रॅम कोकेन सापडले आहे. आंतरराष्ट्रीय बाजारात त्याची किंमत ११ लाख ३९ हजार रुपये आहे.

### अटल सेतूवरील खड्ड्यांसाठी कंत्राटदाराला २० लाखांचा दंड

मुंबई, दि. २३ प्रतिनिधी

मुंबई आणि नवी मुंबई यांना जोडणाऱ्या शिवडी-न्हावा शेवा अटल सेतूवर पावसाळ्यात पडलेले खड्डे बुजवण्याचे काम कंत्राटदारामार्फत केले जात आहे. या प्रकरणी एमएमआरडीएने कंत्राटदाराला २० लाखांचा दंड ठोठावला आहे. हा पूल वाहतुकीसाठी खुला होऊन केवळ १८ महिने उलटले आहेत. एकूण २२ किमीच्या या पुलाचा १६ किमीचा भाग समुद्रावर बांधण्यात आला असून ६ किमीचा भाग जमिनीवर आहे. एकूण १८ हजार कोटींचा हा प्रकल्प असून नवी मुंबईच्या दिशेला जाणाऱ्या रस्त्यावर खड्डे पडले आहेत. अटल सेतूवरून मोठ्या प्रमाणावर अवजड वाहतूक होते. या वाहनांतून गळणाऱ्या तेलामुळे खड्डे पडले आहेत. एरव्ही खड्डे बुजवण्यासाठी हॉट मिक्सचा वापर केला जातो मात्र आता पावसाळा सुरू असल्याने कोल्ड मिक्स तंत्रज्ञान वापरून खड्डे बुजवले जात आहेत. सध्या कंत्राटदाराचा दोषदायित्व कालावधी सुरू असल्यामुळे त्यांच्याच खर्चातून खड्डे बुजवले जात आहेत. एमएमआरडीएला अतिरिक्त खर्च करावा लागलेला नाही. याउलट कंत्राटदाराला २० लाखांचा दंड ठोठावण्यात आला आहे.

# अंड्याची गरमागरम भजी

झटपट रेसिपी

दोस्तांनो, पावसाळ्यात गरमागरम भजी खायची लहर येते. अशावेळी हॉस्टेलमध्येच तुम्ही भजीचा घाट घालू शकता. बटाटा, कांदा, पालक या भजी आपण नेहमीच खातो. त्यामुळे यंदा अंड्याची भजी ट्राय करायला हरकत नाही.

**साहित्य :** चार उकडलेली अंडी, चार मोठे चमचे बेसन, चिमूटभर मिरपूड, अर्धा चमचा लाल तिखट, अर्धा चमचा ओवा, अर्धा चमचा चाट मसाला, मीठ आणि तेल.

**कृती :** उकडलेल्या अंड्यांचे दोन भाग करा. अंड्यांना मीठ आणि मिरपूड लावून ठेवा. आता एका भांड्यात बेसन घ्या. त्यात लाल तिखट, चवीनुसार मीठ, ओला आणि गरजेनुसार पाणी घालून भजीचं पीठ तयार करा. हे पीठ फार घट्ट आणि सैलही नको. त्यामुळे बेताने पाणी घाला. कढईत तेल गरम करून घ्या. अंड्याचे तुकडे बेसनच्या पिठात घोळवा. हलकेच कढईत सोडा. सोनेरी रंगावर तळून घ्या. ही भजी चटणी किंवा सॉससोबत खा.






## फंडू एसएमएस

धडकने लगे दिल की तारों की
दुनिया जब तुम मुस्कुरा दो,
संवर जाए हम बेकरारों की
दुनिया जब तुम मुस्कुरा दो।

उनकी चाहत में हम
कुछ यूं बंधे हैं।
वो साथ भी नहीं,
हम अकेले भी नहीं।

खामोश सा शहर और
गुफ्तगू की आरजू,
हम किससे करे बात
कोई बोलता ही नहीं।

# परदेशी नोकरी सोडून सुरू केला दह्याचा ब्रँड



अचिव्हर

अनेक लोक परदेशात चांगली नोकरी मिळवून तिथेच स्थायिक होण्याचे स्वप्न पाहतात, पण केरळमधील रहिवासी नहज बशीर यांनी परदेशातील नोकरी सोडून भारतात परतण्याचा निर्णय घेतला आणि दही बनवण्याचा व्यवसाय सुरू केला. सुरुवातीला त्यांना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागले, परंतु कठोर परिश्रमाने नहजने व्यवसायात यश मिळवले. आज नहज बशीर त्यांच्या ' क्रॅनबेरी' या ब्रँडमधून दरवर्षी १५ कोटी रुपयांची कमाई करत आहेत. इतकेच नाही तर अंबानी कुटुंबदेखील क्रेम्बेरीचे ग्राहक आहे. नहज बशीर यांचा जन्म केरळमध्ये झाला. त्यांचे कुटुंब टिश्यू मॅन्युफॅक्चरिंग व्यवसाय करत असे. वयाच्या अवघ्या २० व्या वर्षी नहजला कतारमध्ये नोकरी मिळाली, पण त्याला स्वतःचा व्यवसाय सुरू करायचा होता. अशा परिस्थितीत नहजने नोकरी सोडण्याचा निर्णय घेतला आणि तो भारतात परतला.

**कुटुंब नाराज; पण**

नहजचे कुटुंब त्याच्या या निर्णयावर खूश नव्हते, मात्र नहजच्या आईने त्याला पाठिंबा दिला. कतारमध्ये नोकरी करताना नहज भारतात यायचा त्यावेळी भारतात चांगल्या आणि आंबट दह्याची मोठी कमतरता असल्याचे त्याला जाणवायचे. नहजला कतारमध्ये मिळणारे दही आवडले. त्यातूनच त्याला दह्याचा व्यवसाय सुरू करण्याची कल्पना सुचली. २०२० मध्ये नहजने क्रॅनबेरी नावाची कंपनी सुरू केली.

**दही ब्रँड यशस्वी**

ही कंपनी अनेक चवींसह विविध प्रकारचे दही बनवते. हळूहळू, नहजचा ब्रँड यशस्वी झाला. नहज स्वतः मॉलमध्ये जाऊन दह्याचे नमुने वाटून लोकांना त्याचे उत्पादन सादर करत असे. अल्पावधीतच नहाजचे दही खूप लोकप्रिय झाले. अंबानी कुटुंबदेखील क्रॅनबेरीचे ग्राहक आहे. क्रॅनबेरीने अंबानी कुटुंबातील दोन्ही मुलांच्या लग्नात दहा हजारांहून अधिक दह्याचे पॅकेट डिलिव्हर केले होते. नहाज या व्यवसायातून दरवर्षी १५ कोटी रुपयांपर्यंत कमाई करत आहे.

## हाउ टू

### ऑन करा गेस्ट मोड



आपला स्मार्टफोन इतरांच्या हातात देण्याआधी छोटं सेटिंग करून बघा. अँड्रॉइड स्मार्टफोनमध्ये गेस्ट मोड असतो. तो ऑन केल्यानंतर दुसरं कोणी तुमचे फोटो किंवा इतर चॅट बघू शकत नाही. तुमचा फोन अगदी नव्यासारखा होतो. हा मोड ऑफ केल्यानंतर स्मार्टफोन पुन्हा आधीसारखा होतो. यासाठी फोन सेटिंग्जमध्ये जा. इथे युजर अकाउंट्स हा ऑप्शन्स दिसेल. या ऑप्शनमध्ये गेस्ट मोड दिसेल. हा मोड ॲक्टिवेट करून तुम्ही इतरांना स्मार्टफोन द्या.

# हा गुंता कधी सुटेल?

मॅच मेकिंग



मी २८ वर्षांची तरुणी असून माझं एका मुलावर प्रेम आहे. पण पालकांना तो आवडत नसल्यामुळे त्यांनी माझं लग्न दुसऱ्या मुलाशी ठरवलं आहे. याबाबत मी माझ्या प्रियकराला सांगितलं. हे नातं तोडायचं ठरवलं. पण मी तुझ्याशिवाय राहू शकत नाही, असं त्याचं म्हणणं आहे. या सगळ्या परिस्थितीसाठी तो मला जबाबदार धरतो आहे. या सगळ्याचा मला खूप ताण आला आहे. मी आईवडिलांच्या विरोधात जाऊ शकत नाही. प्रियकरालाही सोडू शकत नाही. मी काय करू?

– तुझी सध्याची मनस्थिती खूप गुंतागुंतीची असणार यात शंका नाही. या नात्याबद्दल तू आईशी बोललीस. तिच्याकडून तुला काहीच प्रतिसाद मिळाला नाही. अशा परिस्थितीत तू कुटुंबातल्या इतर सदस्यांचा आधार घेऊ शकतेस. तुझ्या वडिलांशी स्पष्टपणे बोलू शकणाऱ्या व्यक्तीला हा गुंता सांग. तुझा प्रियकर किंवा त्याच्या कुटुंबियांना यासाठी पुढाकार घ्यायला सांग. या नात्याबद्दल तुझे पालक साशंक असतील. ते तुला काही प्रश्न विचारतील. या प्रश्नांची शांतपणे उत्तरं दे. त्यांच्या सगळ्या शंका दूर कर. याआधी तुझ्या प्रियकराला विश्वासात घे, त्याच्याशी स्पष्टपणे बोल. गरज पडली तर समुपदेशकांची मदत घे.

# बेंगळुरूजवळ काय पाहाल?



भटकंती

बेंगळुरू हे सर्वात जास्त गर्दी असलेल्या शहरांपैकी एक आहे. येथील लोक सकाळपासून रात्री उशिरापर्यंत कामात व्यस्त असतात. पण या व्यस्ततेतून वेळ काढून काही लोक सुट्टीचा आनंद घेण्यासाठी कुटुंबासह किंवा मित्रमंडळींसह बाहेर फिरायला जाण्याचा प्लॅन करतात. तुम्ही बाहेर फिरायला जात असाल तर बेंगळुरू शहराला एकदा भेट द्याच. इथे भेट देण्यासाठी बेंगळुरू पॅलेस, लालबाग बोटॅनिकल गार्डन आणि उलसूर तलाव अशी प्रसिद्ध ठिकाणे आहेत.

बेंगळुरू पासून सुमारे १०० किलोमीटरपर्यंतच्या अंतरावर असलेल्या या सुंदर ठिकाणांना भेट देण्याचा प्लॅन करू शकता. येथील नैसर्गिक दृश्ये खूप मनमोहक आहेत. निसर्गाच्या सांनिध्यात राहून नेचर फोटोग्राफी करायला आवडत असेल, तर ही ठिकाणे योग्य आहेत.

**नंदी हिल्स**

नंदी हिल्स बेंगळुरूपासून सुमारे ६० किलोमीटर अंतरावर आहे. इथे पोहोचण्यासाठी एक ते दोन तास लागू शकतात. चिकबल्लापूर रेल्वे स्टेशन हे नंदी हिल्सपासून सर्वात जवळचे रेल्वे स्टेशन आहे. इथून ते नऊ किलोमीटर अंतरावर आहे. इथे निसर्गाची सुंदर दृश्ये पाहायला मिळतात. सकाळी ६ ते ६.३० दरम्यान सूर्योदयाचे अद्भुत दृश्य पाहता येईल. या ठिकाणी देवनहल्ली किल्ला पाहू शकता आणि भोगानंदीश्वर मंदिराला भेट देऊ शकता.

**स्कंदगिरी**

स्कंदगिरी हे एक अतिशय प्रसिद्ध ठिकाण आहे. ते बेंगळुरूपासून ६२ किलोमीटर अंतरावर आहे. ट्रेकिंगची आवड असणाऱ्यांनी या ठिकाणाला भेट द्यायलाच हवी. यासोबतच येथील सूर्योदय पाहण्याची संधी गमावू नका. तुम्हाला इथे ॲडव्हेंचरस ॲक्टिव्हिटी करण्याची संधीदेखील मिळू शकते. स्कंदगिरी हिल्सच्या माथ्यावर भगवान शंकराचे मंदिर आहे.

**चुंची धबधबा**

बेंगळुरू ते चुंची फॉल्स हे अंतर सुमारे ८० ते ९० किलोमीटर आहे. कर्नाटकातील कनकपुरा येथून मेकेदाटू आणि संगमला जाताना हा धबधबा दिसेल. येथील नैसर्गिक सौंदर्य मनमोहक आहे. हे एक परिपूर्ण असे पिकनिक स्पॉट आहे.

## ॲप वर्ल्ड




### घरीच करा मेडिटेशन

दोस्तांनो, सध्याच्या काळात फिट राहणं खूप गरजेचं आहे. योगा, मेडिटेशनमुळे तुम्ही शारीरिकच नाही तर मानसिकदृष्ट्याही फिट रहाता. काही ॲप्स डाउनलोड करून तुम्ही फिटनेसचे धडे घेऊ शकता. सिंपल हॅबिट: मेडिटेशनच्या मदतीने तुम्ही आरामात मेडिटेशन करू शकता. जगभरातली तज्ज्ञमंडळी तुम्हाला मार्गदर्शन करतील. 'काम' या ॲपमध्ये मेडिटेशनची विविध सत्र देण्यात आली आहे. त्यानुसार तुम्ही किती वेळ मेडिटेशन करायचं हे ठरवू शकता. 'ओक' हे ॲप मेडिटेशन आणि श्वसनाच्या व्यायामांच्या मार्गदर्शनाचं उत्कृष्ट माध्यम आहे.

## टेक गाईड

### अशी थांबवा प्री-इन्स्टॉल्ड ॲप्स




स्मार्टफोनमध्ये काही प्री- इन्स्टॉल्ड ॲप्स असतात. ती अनइन्स्टॉलही करता येत नाहीत. यातली बरीच ॲप्स फोनमधली स्पेस व्यापतात. अशा ॲप्सचं कार्य थांबवण्यासाठी काय करता येईल, याविषयी...अशी ॲप्स ऑफ करता येतात. यासाठी फोन सेटिंग्जमध्ये जनरल टॅबवर टॅप करा. मग 'ॲप्स अँड नोटिफिकेशन' सिलेक्ट करा. इथे 'अनइन्स्टॉल' आणि 'फोर्स स्टॉप' असे दोन पर्याय दिसतील. काही ॲप्ससाठी अनइन्स्टॉल पर्यायचा वापर करता येणार नाही. अशावेळी फोर्स स्टॉपचा पर्याय निवडता येईल. यानंतर ते ॲप फोनमध्ये दिसणार नाही.

## सोशल मिडिया




### इन्स्टा स्टोरी बनवा आकर्षक

सध्या इन्स्टाग्राम स्टोरीजची चलती आहे. तुमच्या स्टोरीज अधिक आकर्षक पद्धतीने सादर करून अधिकाधिक फॉलोअर्स मिळवता येतील. यासाठी तुमच्या स्टोरीला साजेसं संगीत जोडा. इन्स्टाग्रामचं म्युझिक फीचर यासाठी उपयोगी पडेल. इंस्टाग्राममध्ये स्टोरीसोबत एखादं कोडं जोडण्याची सोय आहे. त्याचा वापर करा. फॉलोअर्ससाठी प्रश्नोत्तराचं सत्र ठेवा. तुमच्या स्टोरीबाबत इतरांची मतं घेता येतील. यामुळे तुमची स्टोरी जास्तीत जास्त फॉलोअर्सपर्यंत पोहचू शकेल.

# लावा व्यायामाची सवय

फिटनेस फंडा



उद्यापासून व्यायाम सुरू करू असं म्हणणाऱ्यांचा उद्या कधीच येत नाही. तुम्हीही व्यायाम उद्यावर ढकलताय का? सकाळी उठून जीममध्ये जाणं तुमच्यासाठी खूप मोठं आव्हान आहे का? सकाळी मस्त ताणून द्यायची, आराम करायचा असं तुम्हाला वाटत असेल तर लवकर जागे व्हा. सकाळी उठून व्यायामाला सुरूवात करा. ही सवय लावून घेण्यासाठी काय करायचं याविषयी...

* सोशल मीडियावर काही वेळ घालवल्याशिवाय झोप येत नसेल तर तुम्हाला ही सवय बदलायला हवी. सोशल मीडियामुळे तुमचं वजन कमी होणार नाही. मात्र जीममध्ये घाम गाळल्यामुळे तुम्ही नक्कीच फिट व्हाल. सकाळी लवकर उठण्यासाठी रात्री लवकर झोपायला हवं. आठ तासांची शांत झोप घेतल्यानंतर सकाळी ताजंतवानं वाटतं. त्यामुळे दररोज लवकर उठण्याची सवय लावा.

* जीमला जाताना एखाद्या मित्र किंवा मैत्रिणीला सोबत घ्या. कोणीतरी सोबत असेल तर तुम्हालाही जीमला जाण्यात रस वाटेल. मस्त गप्पा मारत जीममध्ये जाण्याचा आनंद वेगळाच असतो.

* जवळची जीम शोधा. लांबवरच्या जीममध्ये जायचा खूप कंटाळा येतो. अशावेळी जवळच्या जीमचं सदस्यत्त्व घेतलं तर तुमचा वेळही वाचू शकेल.

* आपल्याला वजन कमी करायचं आहे असा दृढनिश्चय करा. एखाद्या दिवशी आपल्याला खूप कंटाळा येईल. पण हा कंटाळा बाजूला ठेऊन व्यायाम करायला जा. कंटाळ्यापेक्षाही व्यायाम जास्त महत्त्वाचा आहे.

* तुमचं वजन एका दिवसात वाढलेलं नाही. तसंच ते पटकन कमीही होणार नाही. त्यामुळे या प्रक्रियेसाठी थोडा वेळ द्या. झटपट निकालांची अपेक्षा करू नका.

# स्टायलिश आणि कम्फर्टेबल जॅकेट्स

फॅशन पॅशन



लग्नापासून पार्टीपर्यंत आणि कोणत्याही प्रसंगी जॅकेट घातले जातात. लेदर फॅब्रिकपासून पॉलिएस्टर मटेरियलपर्यंत बनवलेले जॅकेट उबदारपणा देते. जॅकेट कोणत्याही वयोगटातील लोकांसाठी पहिली पसंती आहेत. यात रेग्युलर फिट प्रकार मिळतो. त्यामुळे शार्प लूक मिळतो.

प्रीमियम फॅब्रिक जॅकेट खरेदी करताना लोकांची अनेकदा फसवणूक होते. सॉलिड पॅटर्न असलेले हे जॅकेट लग्न समारंभापासून पार्टी आणि दैनंदिन पोशाखांपर्यंत सर्व ठिकाणी वापरले जातात. ही जॅकेट्स चांगला लूक देतात. विविध रंग आणि आकारांनुसार घालू शकता. प्रवास करताना आणि जिम करताना ती आरामदायी असतात. जॅकेट सॉफ्ट फिनिशसह एलिगंट आणि समृद्ध लूक देतात. सॉलिड पॅटर्न असलेले जॅकेट्स तुम्हाला पार्टी, लग्न, प्रसंगी आणि कार्यक्रमांमध्ये प्रभावी बनवतात. ते फक्त एकाच वॉशमध्ये चमकदार स्वच्छ होतात.

मेन व्हर्सिटी स्टायलिश लेटरमन लाँग स्लीव्हज विंटर जॅकेट हे जॅकेट लांब बाहीमध्ये येते. ते तुम्हाला नियमित शैलीत डॅशिंग लूक देते. त्यात झिप क्लोजर प्रकार आहे. तो तुम्हाला चांगली पकड देतो. स्टाईल वाढवण्यासाठी हे जॅकेट अनेक रंगांच्या पर्यायांमध्ये येतात. पार्टी ते ऑफिस आणि रेग्युलर या जॅकेटना पर्याय नाही. यात साइड पॉकेट्स असतात. त्यात तुम्ही आवश्यक गोष्टी ठेवू शकता. तुम्हाला डॅशिंग बनवण्यासाठी, त्याच्या दोन्ही साइड स्लीव्हजना वेगवेगळे रंग देण्यात आले आहेत.

# कला शाखेतील युवक-युवती होऊ शकतात पायलट

करियरवाटा



विमान चालवण्याचे, आकाशात उंच भरारी घेण्याचे स्वप्न अनेकजण बघतात, मात्र आतापर्यंत या स्वप्नासाठी एक मोठी अट होती. ती म्हणजे या क्षेत्रात जाण्यासाठी बारावी मध्ये विज्ञान शाखा असावी लागते. त्यामुळे अनेक कला आणि वाणिज्य शाखेतील हुशार विद्यार्थी या क्षेत्रात जाण्यापासून वंचित राहायचे. मात्र आता ही परिस्थिती बदलण्याची शक्यता निर्माण झाली आहे. हवाई वाहतुकीचे नियमन करणाऱ्या भारताच्या सर्वोच्च संस्थेने (डीजीसीए – डिरेक्टोरेट जनरल ऑफ सिव्हील एव्हिएशन) एक महत्त्वपूर्ण शिफारस केली आहे. त्यामुळे आता कला आणि वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांनाही कमर्शिल पायलट परवान्यासाठी प्रशिक्षण घेता येणार आहे.

'डीजीसीए' ने हा प्रस्ताव नागरी उड्डाण मंत्रालयाकडे पाठवला आहे. मंत्रालयाकडून मंजुरी मिळाल्यानंतर हा प्रस्ताव कायदा मंत्रालयाकडे जाईल आणि त्यानंतर अधिकृतपणे लागू होण्याची शक्यता आहे. या नव्या नियमाच्या अंमलबजावणीने १२ वी उत्तीर्ण, वैद्यकीयदृष्ट्या सक्षम आणि इतर आवश्यक परीक्षा उत्तीर्ण केलेले सर्व शाखांचे विद्यार्थी पायलट प्रशिक्षणासाठी पात्र ठरतील.

**३० वर्षांनंतर मोठा बदल**

१९९० च्या दशकापासून 'सीपीएल' प्रशिक्षण फक्त विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांसाठीच मर्यादित होते. यामुळे कला आणि वाणिज्य शाखांच्या अनेक हुशार विद्यार्थ्यांना पायलट होण्याची संधी मिळत नव्हती. गेल्या काही वर्षांमध्ये कला व वाणिज्यच्या विद्यार्थ्यांना 'ओपन स्कूल'मध्ये जाऊन भौतिकशास्त्र आणि गणिताची परीक्षा पुन्हा द्यावी लागत होती.

**वाढती मागणी आणि तयारी**

'डीजीसीए'ने या नव्या नियमामुळे पायलट होण्याची इच्छा असणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या मोठ्या प्रमाणावर वाढेल, असा अंदाज व्यक्त केला आहे. त्यामुळे या वाढलेल्या मागणीला तोंड देण्यासाठी आणि प्रशिक्षणाचा दर्जा टिकवण्यासाठी भारतातील 'फ्लायिंग स्कूल्स'ना अधिक सक्षम करण्याच्या योजना सुरू करण्यात आल्या आहेत. 'डीजीसीए'चे अध्यक्ष फैज अहमद किदवई यांनी 'फ्लायिंग स्कूल्स'ना वेबसाइटवर प्रशिक्षणाचा कालावधी, उपलब्ध विमानांची संख्या, प्रशिक्षकांची उपलब्धता आणि सिम्युलेटरची स्थिती यासारखी माहिती पारदर्शकपणे प्रदर्शित करण्याचे आदेश दिले आहेत.

**पायलट बनण्याचे स्वप्न आता सर्वांसाठी!**

हा निर्णय भारतातील विमानचालन क्षेत्रात समावेशकता वाढवण्याचा एक मोठा टप्पा ठरणार आहे. यामुळे देशातील विमानचालन क्षेत्रालाही मोठा फायदा होण्याची शक्यता आहे, कारण या नव्या धोरणामुळे अधिक प्रमाणात प्रशिक्षित, कुशल आणि विविध पार्श्वभूमीचे पायलट तयार होतील.

# पाण्यापासून मोबाईलचे संरक्षण करायचेय ?

भटकंती



पावसाळा सुरू झाला आहे. देशभरात अनेकठिकाणी जोरदार पाऊस पडत आहे. भारतीय हवामान खात्याने २० हून अधिक भागांत मुसळधार पावसाचा इशारा दिला आहे. यात उत्तराखंड, बिहार, पश्चिम बंगाल, सिक्कीम आणि ईशान्य भारताचा समावेश आहे. अशा वेळी ऑफिस, कॉलेज किंवा बाहेर जाताना फोनचे पाण्यापासून संरक्षण करणे गरजेचे आहे. पावसात फोन खराब होऊ नये, यासाठी पाच सोप्या टिप्स जाणून घ्या.

१. पावसाळ्यात वॉटरप्रूफ फोन केस घेणे महत्त्वाचे आहे. या फोन केसला पाणी आणि ओलाव्यापासून वाचवण्यासाठी बनवलेले असते. बाजारात अनेक प्रकारच्या वॉटरप्रूफ केस उपलब्ध आहेत. तुमच्या फोन मॉडेलला सुट होईल अशी केस निवडा. यामुळे पाण्यामुळे होणारे नुकसान टाळता येईल.

२. वॉटरप्रूफ केस वापरणे शक्य नसेल तर फोन सीलबंद वॉटरप्रूफ पाऊचमध्ये ठेवा. पाऊच पूर्णपणे बंद होत आहे आणि पाणी आत जाणार नाही, याची खात्री करा. पाऊचमध्ये सिलिका जेलचे छोटे पॅकेट ठेवा. ते ओलावा शोषून घेईल. पाऊच स्वस्त आणि प्रभावी पर्याय आहे.

३. पावसात फोनचे नुकसान टाळण्याचा सर्वात सोपा मार्ग म्हणजे पावसात फोन वापरू नका. फोन खिशात किंवा बॅगेत ठेवा. कॉल किंवा मेसेज पाठवायचा असेल, तर थांबून कोरड्या जागेची निवड करा. पाण्याच्या संपर्कात फोन येणे टाळा.

४. चुकून फोन ओला झाला, तर घाबरू नका. मऊ कापडाने किंवा टिश्यू पेपरने फोन पुसा. पाणी शोषण्यासाठी फोन तांदळाने भरलेल्या भांड्यात २४ तास ठेवा. तांदूळ ओलावा शोषून घेतात. यामुळे फोनचे नुकसान टाळता येईल. फोन बंद करून बॅटरी काढता येत असेल, तर काढा.

५. फोन खरेदी करताना त्याची आयपी रेटिंग तपासा. आयपी ६७ किंवा आयपी ६८ रेटिंग असलेले फोन पाणी आणि धुळीपासून सुरक्षित असतात. असे फोन पावसात किंवा पाण्याच्या संपर्कात आले, तरी खराब होण्याची शक्यता कमी असते. नवीन फोन घेताना हे रेटिंग नक्की तपासा.



# सेन्सेक्समध्ये 511 अंशांची घसरण

## क्रूड ऑईल आणि युद्धामुळे शेअर बाजारात दबाव

मुंबई, दि. २३ प्रतिनिधी

इराण-इस्रायल युद्धामुळे क्रूड ऑईलच्या दरामध्ये मोठी उसळी पाहायला मिळत असून त्यामुळे सोमवारी सेन्सेक्समध्ये ५११ अंशांची घसरण झाली आणि निफ्टी २४,९७१ या स्तरावर बंद झाला, तर आयटी क्षेत्रात घसरण पाहायला मिळाली. निफ्टी ५० निर्देशांक सोमवारी महत्त्वाच्या २५,००० च्या स्तराखाली घसरला. ही घसरण प्रामुख्याने तंत्रज्ञान आणि ऑटो कंपन्यांच्या शेअर्समध्ये विक्री झाल्यामुळे झाली. दोन्ही बेंचमार्क निर्देशांकांमध्ये घसरण नोंदवली गेली. सोमवारी सेन्सेक्स ८१,७०४ या स्तरावर उघडला होता आणि दिवसअखेर ०.६२ टक्क्यांच्या घसरणीसह ८१,८९६ च्या स्तरावर बंद झाला. निफ्टी ५० सोमवारी २४,९३९ वर उघडला होता आणि ०.५६ टक्क्यांच्या घसरणीसह २४,९७१ वर बंद झाला.

या घसरणीच्या काळातही बीएसई मिडकॅप आणि स्मॉलकॅप निर्देशांकांनी चांगली कामगिरी केली. मिडकॅप निर्देशांकात ०.२० टक्क्यांची आणि स्मॉलकॅप निर्देशांकात ०.५७ टक्क्यांची वाढ नोंदवली गेली. बीएसईवर सूचीबद्ध कंपन्यांचे एकूण बाजार भांडवल मूल्य सुमारे ४४८ लाख कोटी रुपये इतके होते, ज्याचे श्रेय मिड आणि स्मॉल कॅप क्षेत्रातील वाढीस जाते.

निफ्टी ५० मधील सर्वाधिक वाढ नोंदवणाऱ्या शेअर्समध्ये ट्रेंट हा टॉपवर होता, ज्यामध्ये ३.७८ टक्क्यांची वाढ झाली. त्यानंतर भारत इलेक्ट्रॉनिक्समध्ये ३.१ टक्क्यांची, हिंडलकोमध्ये १.८९ टक्क्यांची, बजाज फायनान्समध्ये १.१७ टक्क्यांची आणि अदानी एंटरप्रायझेसमध्ये ०.९७ टक्क्यांची वाढ पाहायला मिळाली. निफ्टी ५० मधील सर्वाधिक तोटा सहन करणाऱ्या शेअर्समध्ये इन्फोसिसचा क्रम पहिला होता, जो २.४ टक्क्यांनी घसरला. त्यानंतर एलअँडटीत २.१४ टक्क्यांची, एचसीएल टेकमध्ये २.११ टक्क्यांची, हिरो मोटोकॉर्पमध्ये १.९७ टक्क्यांची आणि महिंद्रा अँड महिंद्रामध्ये १.५६ टक्क्यांची घसरण झाली.

सेन्सेक्स 81,896

निफ्टी 24,971


सेक्टोरल निर्देशांकांमध्ये सर्वाधिक नफा निफ्टी मीडियाला झाला, ज्यात ४.३९ टक्क्यांची वाढ झाली. त्यानंतर निफ्टी इंडिया डिफेन्समध्ये २.१४ टक्क्यांची, निफ्टी कॅपिटल मार्केटमध्ये १.९४ टक्क्यांची, निफ्टी मेटलमध्ये ०.६६ टक्क्यांची आणि निफ्टी इंडिया टुरिझममध्ये ०.४७ टक्क्यांची वाढ झाली. सर्वाधिक तोटा निफ्टी आयटीला झाला, जो १.४८ टक्क्यांनी घसरला. त्यानंतर निफ्टी ऑटोमध्ये ०.९२ टक्क्यांची, निफ्टी एफएमसीजीमध्ये ०.७४ टक्क्यांची आणि निफ्टी सर्व्हिसेस सेक्टरमध्ये ०.६० टक्क्यांची घसरण झाली.

# अमेरिकेला गंभीर परिणाम भोगावे लागणार

## इराणच्या लष्करी प्रवक्त्याचा अमेरिकेला कडक इशारा

तेहरान, दि. २३ वृत्तसंस्था

गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या इराण-इस्रायल लष्करी संघर्षात काल अमेरिकेने उडी घेतली असून, इराणच्या अणु प्रकल्पांवर हवाई हल्ले केले आहेत. अमेरिकेच्या या हल्ल्यांवर जगभरातून प्रतिक्रिया उमटत आहेत. इराणनेही अमेरिकेच्या या हल्ल्यांना प्रत्युत्तर देणार असल्याचे म्हटले आहे. अशात आता इराणच्या लष्करी प्रवक्त्याने सोमवारी अमेरिकेला कडक इशारा दिला आहे.



एका व्हिडिओ निवेदनात इराणच्या लष्करी प्रवक्त्याने म्हटले आहे की, अमेरिकेच्या हल्ल्यांमुळे इराणकडे कायदेशीरपणे हल्ले करण्याचे पर्याय वाढले आहेत. इराणच्या खातम अल-अंबिया केंद्रीय लष्करी मुख्यालयाचे प्रवक्ते इब्राहिम झोलफकारी यांनी म्हटले आहे की, अमेरिकेला त्यांच्या कृतींचे गंभीर परिणाम भोगावे लागणार आहेत. यावेळी त्यांनी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचा 'गॅम्बलर' असा उल्लेख करत बदला घेण्याची शपथ घेतली.

झोलफकारी यांनी त्यांच्या व्हिडिओ निवेदनाच्या शेवटी इंग्रजीत म्हटले की, "गॅम्बलर मिस्टर ट्रम्प, हे युद्ध तुम्ही सुरू केले असेल, पण ते संपवणार आम्हीच."

दरम्यान, इराणच्या लष्कराने आधीच सांगितले आहे की, ते त्यांच्या अणु प्रकल्पांवर अमेरिकेने केलेल्या हल्ल्यांना प्रत्युत्तर देतील.

यापूर्वीच्या एका निवेदनात संयुक्त राष्ट्रांमधील इराणचे राजदूत अमीर सईद इरावनी यांनी म्हटले आहे की, फोर्डो, नतान्झ आणि इस्फहान अणु प्रकल्पांवरील अमेरिकेच्या हल्ल्यांना कधी आणि कसे प्रत्युत्तर द्यायचे, हे इराणी सैन्य ठरवेल.

दरम्यान, अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी असा दावा केला आहे की, इराणच्या अणु प्रकल्पावर त्यांनी केलेल्या हल्ल्यांमुळे इराणचे मोठे नुकसान झाले आहे.

ट्रम्प असा दावा करत असले तरी, उपग्रह छायाचित्रांमध्ये इराणच्या अणु प्रकल्पांचे किती प्रमाणात नुकसान झाले आहे, हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. याचबरोबर, अनेक तज्ज्ञांचे म्हणणे आहे की, इराणने अणु प्रकल्पांमधील युरेनियम हवाई हल्ल्यांच्या आधीच हलवून अमेरिका आणि ट्रम्प यांना वेड्यात काढले असावे.

# सोनम रघुवंशीला मदत करणाऱ्या वॉचमनलाही अटक

इंदूर, दि. २३ वृत्तसंस्था

राजा रघुवंशीची हत्या होऊन आज महिना पूर्ण झाला. दरम्यान सोनम रघुवंशी राजाची हत्या घडवून आणल्यानंतर इंदूरमधल्या ज्या फ्लॅटवर येऊन लपली होती त्या प्रकरणात पोलिसांनी प्रॉपर्टी डीलर आणि वॉचमनला अटक केली आहे. त्यामुळे आता राजाच्या हत्या प्रकरणात अटक करण्यात आलेल्या आरोपींची संख्या ही सात झाली आहे. सिलोम जेम्सला रविवारी अटक करण्यात आली. खरंतर सिलोम जेम्स हा भोपाळला पळून जाण्याच्या बेतात होता पण त्याला पोलिसांनी अटक केली. तसंच इमारतीच्या वॉचमनलाही पोलिसांनी अटक केली आहे. बलवीर अहिरवर असं या वॉचमनचं नाव आहे.



राजाची हत्या केल्यानंतर सोनम ज्या इमारतीत लपली होती त्याच इमारतीचा हा वॉचमन आहे. तो सुतारकामही करतो अशी माहिती पोलिसांनी दिली. बलवीर हा कृष्ण विहार सोसायटीत वॉचमन म्हणून काम करतो आणि तो छोटंमोठं सुतारकामही करतो आम्ही त्याला अटक केली आहे अशी माहिती पोलिसांनी एएनआयला दिली. पोलिसांनी बलवीर आणि सिलोम जेम्स या दोघांनाही न्यायालयात हजर केलं होतं. त्यांना सात दिवसांची पोलीस कोठडी न्यायालयाने सुनावली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार सिलोम जेम्सकडे सोनमने एक पेटी दिली होती. त्या पेटीत दागिने, लॅपटॉप आणि राज कुशवाहाने जे हत्यार आणलं होतं ते असू शकतं. ही पेटी सिलोमने नष्ट केली आहे. त्यातल्या वस्तू कुठे आहेत? याची चौकशी आता पोलीस करत आहेत. सिलोम जेम्सने पोलिसांना त्या ठिकाणी नेलं होतं जिथे त्याने ही पेटी जाळली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार तिथे त्यांना लॅपटॉप किंवा दागिने जाळल्याच्या कुठल्याही खुणा किंवा अवशेष मिळाले नाहीत. त्यामुळे आता पेटीतलं सामान नेमकं कुठे आहे? याची चौकशी सुरू आहे. विशाल चौहानने १७ हजार रुपये प्रति महिना भाडे तत्त्वावर हा फ्लॅट घेतला होता. २३ मे रोजी म्हणजेच आजपासून महिन्याभरापूर्वी राजा रघुवंशीची हतया करण्यात आली. त्याचा मृतदेह २ जून रोजी आढळून आला होता. राजाची हत्या कशी करायची हे सोनम आणि तिचा बॉयफ्रेंड राज कुशवाहा या दोघांनी आधीच कट करून ठरवलं होतं.

# टेकऑफ घेण्याआधीच विमानात तांत्रिक बिघाड

## पायलटच्या सतर्कतेमुळे १७७ प्रवासी सुरक्षित

चंदीगड, दि. २३ वृत्तसंस्था

अहमदाबाद विमान दुर्घटनेनंतर अनेकांच्या मनात विमान प्रवासाबद्दल धडकी भरली आहे. अलीकडेच चंदीगडच्या शहीद भगत सिंग आंतरराष्ट्रीय विमानतळावर मोठी दुर्घटना टळली. याठिकाणी लखनौला जाणाऱ्या इंडिगोच्या विमानात टेकऑफ होण्याआधीच तांत्रिक बिघाड लक्षात आला. पायलटच्या सतर्कतेमुळे विमान उड्डाण वेळीच रोखले आणि विमानातील १७७ प्रवाशांना सुरक्षित बाहेर काढण्यात आले. बोर्डिंगनंतर विमानाचे उड्डाण रद्द केल्याने प्रवाशांमध्ये मोठी नाराजी पसरल्याचे दिसून आले. जवळपास १ तास विमान उड्डाण खोळंबले तरीही प्रवाशांना योग्य ती माहिती दिली नाही. ही फ्लाईट सकाळी 7.10 मिनिटांनी रवाना होणार होती. सर्व प्रवासी बोर्डिंग करून विमानात बसले होते. विमान हळूहळू पार्किंग





एरियातून रनवेच्या दिशेने जात होते तेव्हा पायलटला विमानातील तांत्रिक बिघाड लक्षात आला. सुरक्षेला प्राधान्य देत पायलटने तात्काळ हे विमान रनवेवरून पुन्हा पार्किंगच्या परिसरात आणले आणि सर्व प्रवाशांना सुरक्षितपणे विमानातून खाली उतरवण्यात आले. त्यानंतर फ्लाईट अचानक रद्द करण्यात आली. प्रवाशांनाही १ तास कुठलीही माहिती न दिल्याने विमानतळावरच गोंधळ उडाला.

या प्रकारामुळे लहान मुले, वृद्ध प्रवासी, महिला त्रस्त असल्याचे दिसून आले. काही प्रवासी जमिनीवर बसूनच पुढच्या सूचनेची वाट पाहत होते. एका प्रवाशाने सोशल मीडियावर त्याची व्यथा मांडत पंतप्रधान कार्यालयाकडे मदतीची मागणी केली. बोर्डिंग झाल्यानंतर विमानाचे उड्डाण रद्द होणे हे केवळ गैरसोयीचेच नाही तर मानसिक ताण देखील वाढवते. बोर्डिंगनंतर उड्डाण रद्द केले परंतु कुठल्याही वरिष्ठ अधिकाऱ्याने समोर येऊन वस्तूस्थितीची माहिती दिली नाही. १ तासाहून अधिक वेळ झाला तरीही कुणी काही सांगण्यास तयार नाही असं प्रवाशाने सांगितले.

# गुजरातची जनता भाजपला कंटाळली

## विसावदर मतदारसंघ जिंकल्यानंतर केजरीवाल यांची पोस्ट

जुनागढ, दि. २३ वृत्तसंस्था

आम आदमी पक्षाचे उमेदवार गोपाल इटालिया यांनी जुनागढ जिल्ह्यातील विसावदर मतदारसंघातून विजय मिळवला. त्यांनी भाजप उमेदवार किरीट पटेल यांचा पराभव केला आहे. भाजपाचा बालेकिल्ला असलेल्या गुजरातमध्ये विसावदर मतदारसंघात आपने त्यांचे वर्चस्व कायम ठेवले. या विजयानंतर आपचे अध्यक्ष अरविंद केजरीवाल यांनी ट्विटरच्या माध्यमातून भाजपला टोला लगावला. गुजरातमधील जनता आता भाजपला कंटाळली आहे, असे त्यांनी सोशल मीडियावर पोस्ट केले.

अरविंद केजरीवाल यांनी आपल्या अधिकृत एक्स हँडलवरून केलेल्या पोस्टमध्ये असे म्हटले आहे की, "गुजरातमधील विसावदर मतदारसंघ आणि पंजाबमधील लुधियाना पश्चिम मतदारसंघात आम आदमी पक्षाच्या दमदार विजयाबद्दल तुम्हा सर्वांचे खूप खूप अभिनंदन. गुजरात आणि पंजाबमधील जनतेचे खूप खूप अभिनंदन आणि खूप खूप आभार. दोन्ही ठिकाणी गेल्या निवडणुकीच्या तुलनेत विजयाचे अंतर जवळजवळ दुप्पट झाले आहे. यावरून असे दिसून येते की, पंजाबमधील जनता आमच्या सरकारच्या कामावर खूप खूश आहे. त्यांनी आम्हाला २०२२ पेक्षा जास्त मतदान केले. गुजरातमधील जनता आता भाजपला कंटाळली आहे आणि त्यांना आम आदमी पक्षाकडून अपेक्षा आहे. दोन्ही ठिकाणी काँग्रेस आणि भाजप दोघांनीही एकत्र निवडणुका लढवल्या. दोघांचेही उद्दिष्ट आप पक्षाला हरवण्याचे होते. पण लोकांनी दोन्ही ठिकाणी या दोन्ही पक्षांना नाकारले."

दरम्यान, डिसेंबर २०२३ मध्ये भूपेंद्र भयानी यांनी राजीनामा देऊन सत्ताधारी भाजपमध्ये प्रवेश केला. तेव्हापासून विसावदर मतदारसंघातील जागा रिक्त होती. १९ जून रोजी झालेल्या पोटनिवडणुकीत विसावदर मतदारसंघात ५६.८९ टक्के मतदान झाले. तर, आज निकाल जाहीर झाला. निवडणूक आयोगाने दिलेल्या माहितीनुसार, गोपाल इटालिया यांना ७५ हजार ९४२ मते मिळाली. तर, त्यांचे जवळचे प्रतिस्पर्धी आणि भाजपचे उमेदवार किरीट पटेल यांना ५८ हजार ३८८ मते मिळाली. अशाप्रकारे, गोपाल इटालिया यांनी किरीट पटेल यांचा १७ हजार ५५४ मतांनी पराभव केला.

# कंबरदुखी आणि गुडघेदुखीवर विनाशस्त्रक्रिया उपचार

**बदलत्या जीवनशैलीमुळे ऐन तारुण्यात अनेक प्रकारचे आजार उदभवतात. आहाराची चुकीची पद्धत,प्रचंड धावपळ,दगदग आणि मुख्य म्हणजे शारीरिक श्रम अर्थात व्यायामाचा अभाव या कारणामुळे हल्ली अनेक तरुणांमध्ये देखील ऐन तिशीत कंबरदुखीचा आणि गुढगेदुखीचा आजार सुरू होताना दिसतोय. हाडांचे हे विकार सुरू होण्याचं मुख्य कारण म्हणजे मणक्याची चकती सरकणे आणि त्यामुळे मग कंबरेत प्रचंड वेदना सुरू होतात. गुडघ्याची वाटी देखील सरकते त्यातील वंगण कमी झाल्यामुळे देखील गुढगेदुखीचा आजार उदभवतो.परंतु, हाडाचे विकार म्हंटल कि, ते बरे करण्यासाठी फक्त शस्त्रक्रियाच असा एक गैरसमज जनमानसात रूढ असतो. खरं तर हाडाचे ९९ टक्के आजार हे शस्त्रक्रियेविना बरे होऊ शकतात हे सत्य आहे ते कसे?हेच जाणून घेण्यासाठी सुप्रसिद्ध अस्थिव्यंगविकार तज्ज्ञ डॉ.श्रीकृष्ण ढोणे यांच्याशी साधलेला संवाद.**

१]गुढगेदुखी किंवा कंबरदुखी म्हटलं कि शस्त्रक्रियाच असा एक समज जनमानसात दिसतो परंतु, हे दुखणे विना शत्रक्रिया बरे होऊ शकते याची पार्शवभूमी नेमकी काय सांगाल?

शत्रक्रिया किंवा सर्जरी हे वैद्यकशास्त्राने आपल्याला दान दिलेले आहे. भाजीमध्ये आपण मीठ किंवा साखर अगदी चिमूटभर टाकतो अगदी तेवढाच शस्त्रक्रियेचा वापर करायचा असतो. हाडांचे जे आजार असतात त्यावर उपचारांचे सर्व मार्ग हाताळून पाहिल्यानंतर अगदी शेवटचा मार्ग म्हणजे शस्त्रक्रिया आहे. कंबर दुखी किंवा गुढगेदुखी का होते?तर शारीरिक व्यायामाचा अभाव,अरबट चरबट खाणे,मद्यपान,धूम्रपान अशी विविध व्यसन यामुळे पोटाचा घेर वाढतो.वजन प्रचंड वाढते आणि कम्बर दुखी किंवा गुढगेदुखी सुरू होते.म्हणूनच जर आहार पद्धती बदलली,.दररोज व्यायाम नियमित केला बैठका काढल्या,आणि औषधांच्या मात्रा घेऊन या सर्व उपायांनी वजन नियंत्रित केले कि आपोआप कम्बर दुखी चा किंवा गुढगेदुखीचा त्रास संपवता येतो. आपल्या मणक्यांमध्ये ५ चकत्या आहेत. दुखणे वाढले कि, एक काढून टाकतो परंतु बाकीच्या चार चकत्या सुरळीत राहण्यासाठी वजन नियन्त्रित कारण गरजेच असत.

२]कंबरदुखीचा ज्यांना त्रास असतो त्यांच्या मणक्याची चकती सरकते ती पुन्हा व्यवस्थित करता येते का?

होय सरकलेली मणक्याची चकती पूर्ववत करण्यासाठी रुग्णाला ट्रॅक्शन चा उपचार अतिशय योग्य असतो . यामध्ये रुग्णाच्या कमरेला पेल्वीस पासून अर्ध्या बाजूला वर आणि खाली सुमारे २५ ते ३० किलो वजन बांधतात.यादरम्यान रुंगांचे जेवण कमी केलं जात. हा उपचार दोन तीन दिवस केला कि रुग्णाचे वजन कमी होते आणि त्याचे दुखणे देखील कमी होते. हा आपल्याकडचा खूप प्रभावी उपचार आहे.



३]इंडियन मेथड ऑफ म्यानिप्युलेशन ऑफ स्पाईन म्हणजे काय?

हि उपचार पद्धती म्हणजे रुग्णांकरिता एक सिक्रेट आहे. जेंव्हा रुग्ण पाठदुखीचा किंवा कंबर दुखीचा आजार घेऊन रुग्णलयात येतात तेंव्हा आम्ही त्याची त्याचे दोन्ही पाय पोटाजवळ घेऊन पाठ मोडतो त्यामुळे कट्कन आवाज येतो.जी सरकलेली डिस्क असते ती यामुळे पूर्ववत होते आणि ती आत जाते. या उपचारामुळे रुग्णाला देखील आनंद होतो त्याचे दुखणे अचानक बंद झाल्यामुळे.

४]अनेक वयोवृद्धाना गुढगेदुखी आणि कंबरदुखीचा आजार असतो तो बरा करण्यासाठी उपाय काय?आणि पाठीचे स्नायू मजबूत केले तर हाडांची दुखणी कमी करता येतात का?

ज्यांचं वय ७० च्या पुढे आहे अशा वयोवृद्ध रुग्णांना कंबरदुखी आणि गुढगेदुखीचा आजार हा कॉमन असतो. अशा रुग्णांना गुढग्यामध्ये किंवा कंबरेत स्टिरॉइड चे इंजेक्शन देऊन हे दुखणे थांबवता येते. मात्र त्याच बरोबर अशा वयोवृद्धांनी आणि खरं तर सर्वच वयोगटातील रुग्णांनाही नियमित जलतरण करायला हवे. योगासन त्यातही सर्वांगासन नियमित करायला हवे. शारीरिक व्यायाम जोर बैठका काढायला हव्यात. भरपूर चालायला हवं आणि दररोज झोपताना पायांच्या मध्ये लोड घेऊन झोपायचे यामुळे कंबरदुखी आणि गुढगेदुखीचा त्रास थांबवता येतो. आपल्या शरीराची रचना पहिली तर ३० टक्के हाड आणि ७० टक्के स्नायू असतात. शरीराचा संपूर्ण भार आपले स्नायूंचं पेलत असतात. जस स्कुटर किंवा गाडीला मेन्टेन्स महत्वाचा असतो तद्वतच आपल्या शरीरातील स्नायूंची काळजी घेणं महत्वाचं असत.त्यासाठीच दररोज व्यायाम करावा. केवळ कॅल्शिअम च्या गोळ्या घेऊन उपयोग नाही.

हॅलो डॉक्टर

लोकारोग्य

# माझ्या शेतात मी सीएनजी ट्रॅक्टर वापरतो

## लवकरच देशात सीएनजीवरील ट्रॅक्टर - गडकरी

पुणे, दि. २३ प्रतिनिधी

केंद्रीयमंत्री नितीन गडकरी यांच्याकडून सातत्याने नवसंकल्पना आणि नवतंत्रज्ञान अवगत करण्याचा प्रयत्न केला जातो. तसेच, नवतंत्रज्ञान वापराचा सल्लाही ते देत असतात. देशातील दळणवळण अधिक गतीमान व्हावं आणि प्रवासी, नागरिकांना कमी खर्चात वाहने, इंधन उपलब्ध होण्यासाठीचाही त्यांचा प्रयत्न असतो. आता, पुणे येथील आंतरराष्ट्रीय टनेल वर्कशॉप परिषदेत बोलताना त्यांनी टनेल बनविण्याच्या तंत्रज्ञानाबद्दल माहिती दिली. तर, आता शेतीसाठी लागणारे ट्रॅक्टरदेखील आपण इलेक्ट्रिक, इथेनॉल, सीएनजीवर चालणारे बनवत आहोत. माझ्या शेतात मी सीएनजी ट्रॅक्टर वापरत आहे, शेतीमध्ये आपल्याला अशा गोष्टींचा वापर करावा लागणार आहे, असेही गडकरी येथील कार्यक्रमात बोलताना म्हटले.

देशात टनेल बनवणं हे भविष्याच्या बाबतीत खूप फायद्याचं ठरेल, येणाऱ्या काळात देशात ३ लाख करोड रुपयांची टनेल आपण बनवणार आहेत. आपल्या देशात बोगद्याची मशिन आपल्याला बनवावी लागेल. कारण, सध्या टनेल (बोगदा) बनवण्याची मशीन फक्त चीनमध्ये बनते, सध्या चीनकडून आपण हे घेऊ शकत नाही, त्याची कारणं तुम्हाला माहिती आहेत, असे म्हणत केंद्रीयमंत्री नितीन गडकरी यांनी देशात अधिकाधिक बोगदे बनविण्याची गरज असल्याचे म्हटले. तसेच, यात आपल्याला सुरक्षा देखील पाहावी लागेल, असेही त्यांनी म्हटले.

टनेल बोगदे बनवताना आपली सुरक्षा महत्वाची आहे, अनेक घटना देशात दुर्दैवी घडल्या त्यात आपल्याला आता एआय आणावा लागेल तर आपण पुढ जाऊ शकतो. नवीन मशिन दुसऱ्या देशातून विकत घेणं थोडं महागाचं ठरत आहे. आपल्याला याचे उत्पादन आपल्याच देशात करावे लागेल, मशीन आपल्याला इथंच बनवाव्या लागतील, असेही नितीन गडकरी यांनी म्हटलं. आता सगळीकडे हायड्रोजन, इथॅनल या इंधनाचा वापर आपल्याला करावा लागेल. यात मी खूप काम करत आहे, आपल्याला मिळून यात काहीतरी करायला हवं. आता ट्रॅक्टर देखील आपण इलेक्ट्रिक, इथेनॉल, सीएनजीवर चालणारे आपण बनवत आहोत. माझ्या शेतात मी सीएनजी ट्रॅक्टर वापरत आहे, शेतीमध्ये आपल्याला अशा गोष्टींचा वापर करावा लागणार आहे, असे गडकरी यांनी म्हटले.

# विदर्भामध्ये शाळेची पहिला घंटा वाजली, पण सरकारचा निषेध म्हणून शेकडो शाळा बंद

नागपूर, दि. २३ प्रतिनिधी

विदर्भातील बहुतांश शाळा या आजपासून सुरू झाल्या आहेत. उन्हाळ्याच्या सुट्ट्या संपल्यानंतर शाळेत जाण्यासाठी अनेक विद्यार्थ्यांना उत्सुकता लागलेली होती. तर दुसरीकडं नागपूरसह विदर्भातील शेकडो शाळांमध्ये आज शुकशुकाट दिसून आला. विदर्भातील काही शिक्षण संस्था चालकांनी आज एका दिवसासाठी राज्य सरकारला विरोध दर्शवण्यासाठी त्यांच्या शाळा सुरू केल्या नाहीत.

उन्हाळ्याच्या प्रदीर्घ सुट्टीनंतर विदर्भातील शाळा आजपासून सुरू झाल्या आहे. सुट्टीनंतर आज मुलांच्या किलबिलाटाने शाळा



पुन्हा गजबजल्या आहेत. तब्बल दीड-दोन महिन्यांनी वर्ग मित्र, मैत्रिणींची भेट होणार, आवडते शिक्षक आणि शिक्षिकांनाही भेटण्याचा आनंद मुलांमध्ये दिसत होता. तर शाळांनी विद्यार्थ्यांच्या स्वागताची जय्यत तयारी केली आहे. नागपूरातील अनेक शाळांमध्ये तर विद्यार्थ्यांचे औक्षण करत आणि ढोल वाजवत व पुष्पवृष्टी करत स्वागत करण्यात आले. तसंच शाळांमध्ये आकर्षक सजावट करण्यात आली होती.

शाळांना राज्य सरकारकडून मिळणारे वेतन अनुदान हे काही वर्षांपासून अनियमित पद्धतीनं दिलं जात आहे. आरटीई अंतर्गत मिळणारे शेकडो कोटी रुपयांचा अनुदान थकलेलं आहे. तसंच शाळा चालवण्यासाठी आवश्यक असलेला इतर खर्चही सरकारकडून दिला जात नाही. त्यामुळं, शाळा चालवणं शिक्षण संस्था चालकांसाठी कठीण होऊन बसल्याचा आरोप करत महाराष्ट्र राज्य शिक्षण संस्था महामंडळानं आज एका दिवसासाठी शाळा बंद ठेवण्याचा आवाहन केलं होतं. या आवाहनाला प्रतिसाद म्हणून आज नागपूरसह विदर्भातील शेकडो शाळांनी त्यांच्या शाळा एका दिवसासाठी बंद ठेवल्यानं पहिल्या दिवशी काही शाळा भरू शकलेल्या नाहीत.

# बंजारा हिल्स अंकुरा हॉस्पिटलमध्ये स्पायना बिफिडा रुग्णांवर यशस्वी शस्त्रक्रिया

जनआरोग्य

बंजारा हिल्स येथील अंकुरा हॉस्पिटलने न्यूरोगॅस्ट्रोएन्टेरोलॉजी केअरमध्ये एक ऐतिहासिक प्रगती करत, एक अग्रगण्य, किमान आक्रमक प्रक्रिया यशस्वीरित्या पार पाडली आहे ज्यामुळे स्पायना बिफिडा या जन्मजात आजाराने ग्रस्त असलेल्या ३२ वर्षीय महिलेला स्वातंत्र्य आणि प्रतिष्ठा परत मिळाली आहे. ही एक जन्मजात स्थिती होती ज्यामुळे जन्मापासूनच आतडे आणि मूत्राशयात गंभीर बिघाड झाला होता.



पूर्णवेळ कार्यरत असलेली ही रुग्णा, आतडे बाहेर काढण्यासाठी तिच्या पालकांवर बराच काळ अवलंबून होती. दहा वर्षांपूर्वी दुसऱ्या एका सुविधेत करण्यात आलेली मागील शस्त्रक्रिया अँटिग्रेड कॉन्टिनन्स एनीमा अयशस्वी झाली होती, ज्यामुळे तिला काळजीवाहकांकडून चालवल्या जाणाऱ्या मॅन्युअल एनिमावर अवलंबून राहावे लागले.

शाश्वत उपाय शोधण्यासाठी, तिने अंकुरा हॉस्पिटलमधील बालरोग शस्त्रक्रिया आणि बालरोग मूत्रविज्ञानाचे मुख्य सर्जन डॉ. व्हीव्हीएस चंद्रशेखरम यांच्याकडे जाण्याचा मार्ग स्वीकारला. सर्वसमावेशक मूल्यांकनानंतर, बहुविद्याशाखीय पथकाने एक नवीन, कमीत कमी आक्रमक प्रक्रिया प्रस्तावित केली.असे म्हटले जाते की ही भारतातील पहिलीच प्रक्रिया होती. या पद्धतीमध्ये फक्त कोलोनोस्कोपिक मार्गदर्शन वापरून सेकम (मोठ्या आतड्याच्या सुरूवातीला) मध्ये PEG (पर्क्युटेनियस एंडोस्कोपिक गॅस्ट्रोस्टोमी) ट्यूब टाकणे समाविष्ट होते. या पद्धतीमुळे पारंपारिक शस्त्रक्रिया किंवा चीरांची आवश्यकता दूर झाली, ज्यामुळे रुग्णाला स्वतंत्रपणे तिचे आतडे फ्लश करता आले.

# बहुगुणी कांदा

आरोग्यम् धनसंपदा

कांदे विविध प्रकारचे आरोग्य फायदे देतात कारण ते जीवनसत्त्वे, खनिजे आणि फायबरचे चांगले स्रोत आहेत. तुम्ही ते कोणत्याही स्वरूपात खाऊ शकता, मग ते कच्चे कांदे असोत किंवा शिजवलेले असोत, अनेक आरोग्यदायी फायदे मिळवण्यासाठी कांदा महत्वाचा आहे. कांद्याचे अर्क बहुतेक प्रकारचे जीवाणू निष्क्रिय करतात. ते तुमच्या त्वचेला जळजळ करणारे बॅक्टेरिया साफ करण्यास मदत करतात. कांद्यामुळे मुरुम, जिवाणू किंवा बुरशीजन्य संसर्ग आणि त्वचेच्या डागांवर उपचार करण्यात मदत होऊ शकते. याव्यतिरिक्त, कांद्याचे मुखवटे त्वचेला मॉइस्चराइज आणि उजळ करू शकतात.शतकानुशतके, कांद्याचा वापर प्रतिबंधात्मक औषध म्हणून केला जात आहे. ते मॅंगनीजमध्ये समृद्ध आहेत जे विरूद्ध संरक्षण देते थंड आणि फ्लू. कापलेल्या कांद्यामुळे रोगजनकांच्या वाढीस प्रतिबंध करणारे संयुगे बाहेर पडतात आणि कापलेल्या कांद्यामधून निघणारा रस अनेक प्रकारच्या सूक्ष्मजीवांची वाढ नष्ट करू शकतो. फायद्यांमध्ये फ्लेव्होनॉइड क्वेर्सेटिनचा समावेश होतो, जो कर्करोगास कारणीभूत घटकांची क्रिया किंवा निर्मिती रोखण्यासाठी ओळखला जातो. म्हणून, क्वेर्सेटिन युक्त आहार घेतल्यास विकास होण्याचा धोका कमी होतोफुफ्फुसाचा कर्करोग. कांद्यामध्ये अँटिऑक्सिडंट्स आणि इतर घटक असतात जे ट्रायग्लिसराइड्स कमी करतात. याव्यतिरिक्त, त्यांच्याकडे दाहक-विरोधी गुणधर्म आहेत जे उच्च रक्तदाब कमी करतात, हृदयरोगाचा धोका कमी करतात आणि रक्ताच्या गुठळ्या टाळतात. कांद्याच्या फायद्यांमध्ये ऑर्गेनोसल्फर संयुगे समाविष्ट आहेत जे त्यांचे वैशिष्ट्यपूर्ण वास आणि चव देतात.



संकलन –संयोजन
सुबोध रणशेवरे
संपर्क -९८३३१४६३५६
ईमेल -subodh.ranshevre @rediffmail.com

# इस्त्रायल-इराण संघर्षात पंतप्रधानांनी नैतिक धैर्य दाखववे - जयराम रमेश

नवी दिल्ली, दि. २३ वृत्तसंस्था

मोदी सरकारने इराणच्या अण्वस्त्र तळांवर आणि इस्त्रायली आक्रमकतेवर अमेरिकेच्या हल्ल्यांचा निषेध केलेला नाही. पंतप्रधान नरेंद्र मोदी गाझामधील हत्याकांडातही शांत आहेत, असं म्हणत काँग्रेसनं केंद्रातील मोदी सरकारविरोधात जोरदार हल्लाबोल केलाय. आता सरकारने पूर्वीपेक्षा अधिक नैतिक धैर्य दाखवणे आवश्यक असल्याचं मतंही विरोधी पक्ष असलेल्या काँग्रेसचे सरचिटणीस जयराम रमेश यांनी मांडलंय.



इराणशी मुत्सद्दी चर्चा व्हावी, असंही जयराम रमेश यांनी अधोरेखित केलंय. अमेरिकेने रविवारी पहाटे इराणमधील फोर्डो, नटान्ज आणि इस्फहान या तीन युरेनियम समृद्ध केंद्रांवर हल्ला केला. इराण आणि इस्त्रायलमधील लष्करी संघर्ष गेल्या १० दिवसांपासून सुरू आहे. एक्सवर पोस्ट करताना जयराम रमेश म्हणाले की, इराणवर अमेरिकन हवाई दलाचा वापर करण्याचा ट्रम्प यांचा निर्णय म्हणजे इराणशी चर्चा सुरू ठेवण्याच्या गोष्टीची चेष्टा आहे. काँग्रेसने त्वरित मुत्सद्दीपणा आणि इराणशी वाटाघाटी करण्याची आवश्यकता असल्याचं अधोरेखित केलंय. आतापर्यंत भारत सरकारने अधिक नैतिक धैर्य दाखवणे गरजेचे आहे, असंही काँग्रेसच्या नेत्याने असेही म्हटलंय.

मोदी सरकारने अमेरिकन बॉम्ब हल्ला आणि इस्त्रायलीच्या आक्रमणांवर टीका केली नाही किंवा त्यांचा निषेध केला नाही. गाझामध्ये पॅलेस्टाईन लोकांवर केलेल्या हत्याकांडावरही मोदी सरकारनं मौन धारण केलंय.

महासागर MUMBAI
RNI No.: MAHAMAR/2016/79101
Printed, published and owned by Shrikrishna Tansukhdas Chandak at S. R. publication, Mohan - Arjun Compund, Godown No. 8, 9 & 10, Near Ghartan Pada, Vaishali Nagar Last Bus Stop, Dahisar (E),Mumbai - 400068 and Published From Bora Bazar Street,Fort, Mumbai -400001. Editor - SHRIKRISHNA TANSUKHDAS CHANDAK

महासागर मुंबई
हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी एस. आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंपाऊंड, गोडावून नं. ८,९,१०, घरटन पाडा जवळ, वैशाली नगर लास्ट बस स्टॉप, दहिसर ईस्ट, मुंबई- ४०००६८ येथे छापून बोरा बाजार स्ट्रीट, फोर्ट, मुंबई- ४०० ००१ येथे प्रसिद्ध केले. संपादक : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक (मो. ९९२२९७००२३) Email : mumbaimahasagar@gmail.com
RNI No.: MAHAMAR/2016/79101